


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, रविवार १९ आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४




# यात्रेहून परतणारे ९ भाविक ठार



## ■ वाशिमजवळ इनोव्हा कार डिव्हायडरला आदळली ■

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात दीपोत्सवाला सुरुवात झाली आहे. (१८ ऑक्टोबर) धनत्रयोदशी असल्याने अनेकजण मंदिरात दर्शनासाठी जात आहेत. पण याच धनत्रयोदशीच्या दिवशी राज्यात दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्याचे कारण म्हणजे राज्यात २ भीषण अपघातांमध्ये एकूण ९ जण ठार झाले आहेत. नंदुरबार-अस्तंबा यात्रेवरून परत येणा-या भाविकांवर काळाने घाला घातला आहे, भाविकांच्या पिकअप ट्रकला अपघात होउन ६ जण ठार झाले तर दुसरीकडे समृद्धी महामार्गावर वाशिमजवळ इनोव्हा कारचा भीषण अपघात झाला असून त्यात ३ ठार झाले आहेत. या दोन्ही अपघातांमुळे हळहळ व्यक्त होत असून अनेक जण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सणासुदीच्या काळात अपघातांचे सत्र सुरूच असून अनेक निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागल्याचे समोर आले आहे. अस्तंबा यात्रेवरून परत येणा-या भाविकांवर काळाने झडप घातली. यात्रेहून परत येणा-या भाविकांच्या पिकअप गाडीला अपघात झाला आहे. चांदशैली घाटात वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला, त्यामध्ये ६ भाविकांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तर १० पेक्षा अधिक भाविक गंभीर जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. अपघात स्थळी भयानक दृश्य असून तिथे मदत कार्य सुरू आहे. जखमींना तळोदा उपजिल्हा रुग्णालयात हलवण्याची कार्यवाही सुरू असून तिथे उपचार करण्यात येतील. अपघाताचे वृत्त समजताच पोलिस यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली.तर वाशिम जिल्ह्यातील मालेगाव ते जउळका दरम्यानच्या समृद्धी महामार्गावरील डव्हा पेट्रोल पंपाजवळ रात्री अडीचच्या दरम्यान भीषण अपघात घडला आहे. मुंबईवरून नागपूरच्या दिशेने जाणा-या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने भरधाव असलेली कार थेट डिव्हायडरवर जाउन आदळली. यात ३ ठार झाले.

## समृद्धीवर दोन विदेशी पर्यटक ठार

**अकोला/प्रतिनिधी :** मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर विदेशी पर्यटकांचा बळी गेला. वाशीम जिल्ह्यात डव्हा-जउळका दरम्यान चॅनल क्रमांक २३२ वर शनिवारी पहाटेच्या सुमारास मोटारीच्या भीषण अपघातात म्यानमार देशातील दोन पर्यटकांचा मृत्यू झाला. या अपघातात एक जण गंभीर जखमी झाला असून चार जण किरकोळ जखमी आहेत. म्यानमार येथील विदेशी नागरिक भारतात पर्यटनासाठी आले होते. देशांतर्गत पर्यटनादरम्यान ते मुंबईहून जगन्नाथपुरी दर्शनाला मोटारीने (क्र.एमएच ०१ बीबी १२१५) जात होते. समृद्धी महामार्गावर डव्हा ते जउळकादरम्यान मोटारीच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. मोटार थेट रस्त्याच्या दुभाजकावर जाउन आदळली. भरधाव वेगातील मोटारीचा भीषण अपघात घडला. हा अपघात एवढा भीषण होता की मोटारीचा पुढचा पुढचा भाग पूर्णतः चक्काचूर झाला. या अपघातात मिन ऑग (वय ३३), मिन चित ऑग (वय १३) यांचा मृत्यू झाला आहे, तर एक जण गंभीर जखमी आहे. चार जण किरकोळ स्वरूपाचे जखमी झाले. अपघातातील जखमींना उपचारार्थ तत्काळ वाशीम येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेची माहिती बचाव पथक व पोलिसांना देण्यात आली. जउळका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेउन पंचनामा केला.

## महामार्गावर अपघातांची ‘समृद्धी’

मुंबई ते नागपूर असा ७०१ किलोमीटरचा प्रवास अवघ्या आठ तासांत पार करण्याचे उद्दिष्टे ठेउन हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग तयार झाला. दहा जिल्ह्यांमधील ३९० गावांना हा महामार्ग जोडतो. अत्याधुनिक पद्धतीने समृद्धी द्रुतगती महामार्ग तयार केल्या गेला आहे. नियमित घडणा-या अपघातांमुळे मात्र या महामार्गाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह लागले. अपघातासाठी मानवी चुकांसह विविध कारणे समोर आली आहेत. यासाठी उपाययोजना देखील करण्यात आल्या. मात्र, तरी देखील अपघाताचे प्रमाण कमी झालेले नाही. समृद्धी महामार्गावरील अपघात रोखण्याचे मोठे आव्हान यंत्रणेपुढे निर्माण झाले.

## चालकाची डुलकी अन् अपघाताचा अनर्थ

समृद्धी महामार्गावरील प्रवास विनाअडथळा पूर्ण होतो. त्यामुळे वाहन चालक देखील निर्धास्त राहतात. लवकर प्रवास पूर्ण करण्यासाठी चालक थांबा न घेता अनेक तास वाहन चालवत असतात. थकव्यामुळे चालकाला डुलकी लागून अपघाताचा अनर्थ घडतो. बहुतांश अपघात हे चालकाला डुलकी लागल्यामुळेच घडल्याचे समोर आले. त्यामुळे समृद्धी महामार्गावरून प्रवास करतांना चालकाने योग्य ती काळजी घेण्याची आवश्यकता प्रामुख्याने दिसून येते. अपघात टाळण्यासाठी चालकाने सतर्क राहण्याची गरज आहे.

## सोन्याचे दर घसरले प्रतितोळा तीन हजारांची घसरण

**जळगाव /प्रतिनिधी-**जळगावच्या सराफ बाजारात सोने आणि चांदीच्या दरांमध्ये घसरण झाली आहे. सोन्याचे दर प्रतितोळा ३००० रु पयांनी घसरले आहेत. तर चांदीचे दर



देखील किलोमागे ५००० रु पयांनी कमी झाले आहेत. धनत्रयोदशीनिमित्त जळगावच्या सराफ बाजारात सोने खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. सोने-चांदीचे दर काहीसे कमी झाले असले तरी येत्या काळात मात्र सोने आणि चांदीचे दर वाढत राहतील अशी माहिती सराफ व्यावसायिकांनी दिली आहे. सराफ बाजारात धनत्रयोदशीच्या दिवशी आज सोन्याच्या आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. सोन्याचे दर विना जीएसटी एक लाख २८ हजार ३०० रु पयांवर आले आहेत तर चांदीचे दर विना जीएसटी १ लाख ७० हजार रु पयांवर आले आहेत. हे दर आज जरी कमी झाले असले तरीही ते वाढण्याची शक्यता आहे.

## मतदार याद्यांमधील घोळ तपासणार

### मुख्य निवडणूक अधिका-यांकडून चौकशीचे आदेश




**मुंबई/प्रतिनिधी :** राज आणि उद्धव ठाकरेंसह महाविकास आघाडीतील नेत्यांनी मतदार यादीतील अनियमिततेबाबत सातत्याने आवाज उठवल्यानंतर अखेर मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कलिंगम यांनी जिल्हा निवडणूक अधिका-यांना चौकशीचे आदेश दिले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील मतदार यादीतील घोळ सातत्याने समोर येत आहेत.लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील मतदार यादीतील त्रुटींवर वारंवार बोट ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील विरोधी नेत्यांनी राज्य आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या अधिका-यांची दोनवेळा भेट घेउन पुराव्यासह तक्रारी मांडल्या होत्या.मुख्य निवडणूक आयुक्तांनी जिल्हाधिका-यांना मतदार यादीतील त्रुटींची चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. यामध्ये एकाच मतदारसंघात एकाच व्यक्तीचे नाव दोन ठिकाणी नोंदले गेले आहे का, याची तपासणी होईल. दोषी आढळणा-या अधिका-यांवर कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. दिवाळीमुळे हा अहवाल पुढील आठवड्यात सादर होण्याची शक्यता आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो विरोधी पक्षाच्या नेत्यांना उपलब्ध करून दिला जाणार आहे.

## राज्यातील 38 हजार कंत्राटी कर्मचा-यांचे मानधन थकित!

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी अधिकारी आणि कर्मचा-यांना मागील दोन महिन्यांचे मानधन मिळालेले नाही. राज्यातील अशा कर्मचा-यांची संख्या ३८ हजारांवर आहे. यामुळे या कर्मचा-यांच्या दिवाळी सणावर दुःखाचे सावट निर्माण झाले आहे. त्याचबरोबर थकित मानधनासाठी तातडीने जिल्हास्तरावर अखर्चित असणारा १५ वा वित्त आयोगाचा निधी वापरण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी संघटनेकडून आरोग्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.



राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकता संघाच्या वतीने मागील आठवड्यातच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना निवेदन देण्यात आले होते. त्यामध्ये म्हटले आहे की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नवीन ई स्पर्श संगणक प्रणाली कार्यरत करण्याची कार्यवाही राज्यस्तरावरून सुरू करण्यात आली आहे. मात्र, ही संगणक प्रणाली दिवाळीपर्यंत कार्यान्वित होणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही. त्यातच या अभियानांतर्गत राज्यातील कंत्राटी कर्मचा-यांचे ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्याचे मानधन थकित आहे. हे मानधन दिवाळीपूर्वी कर्मचा-यांना मिळणे आवश्यक आहे. त्यातच प्रत्येक जिल्ह्यात १५ वा वित्त आयोगाचा पुरेसा निधी शिल्लक आहे. त्यामुळे कर्मचा-यांचा दिवाळी सण, बँक कर्ज हप्ते, दैनंदिन घरगुती तसेच शैक्षणिक खर्चही आहे. हे विचारात घेउन कर्मचा-यांच्या मानधनासाठी तातडीने १५ वा वित्त आयोग निधी वापरण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी आहे.

## 'थार'च्या धडकेत पती-पत्नी आणि 2 मुलांचा मृत्यू

### *दिवाळीसाठी गावी निघाले अन् एका क्षणात संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त!*

**भरतपूर/वृत्तसंस्था :** सगळीकडे दिवाळीची धामधूम सुरू असताना एका भीषण अपघातात संपूर्ण कुटुंबाचा जीव गेला. शनिवारी झालेल्या थार-दुचाकीच्या अपघातात पती-पत्नी आणि दोन मुले ठार झाले. राजस्थानातील भरतपूर जिल्ह्यात ही घटना घडली. नदबई-जनूथर मार्गावर थार गाडीने दुचाकीला उडवले. या घटनेनंतर संतप्त लोकांनी थार कारला आग लावत जाळले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३२ वर्षीय नटवर सिंह, त्यांची २८ वर्षीय पत्नी पूजा देवी, चार वर्षांची मुलगी परी आणि दोन वर्षांचा मुलगा दीपक यांच्यासह दिवाळी साजरी करण्यासाठी सासरी जात होते. भरतपूर जिल्ह्यातील नदबई-जनूथर मार्गावरून दुचाकीने जात असताना लुहासा गावाजवळ त्यांचा अपघात झाला. वेगात असलेल्या थार गाडीने त्यांच्या दुचाकीला उडवले. ही धडक इतकी भीषण होती की, अपघातानंतर दुचाकीने पेट घेतला. घटनेची माहिती मिळताच पोलीस तिथे आले. अपघातातील जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले.

## अफगाणिस्तानकडून राष्ट्रप्रेमाचे धडे घ्या

### ■ पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास नकार,
### ■ खा.चतुर्वेदींचा BCCI-सरकारला टोला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील सीमेवर तणाव वाढत चालला आहे. दोन्ही देशांनी शुक्रवारी परस्पर संमतीने ४८ तासांचा युद्धविराम वाढवण्यावर सहमती दर्शवली. पण काही तासांनंतरच, तालिबानने अफगाणिस्तानच्या पक्तिका प्रांतात पाकिस्तानवर हवाई हल्ले केल्याचा आरोप केला. पाकिस्तानने पक्तिका प्रांतातील अनेक जिल्ह्यांमध्ये हवाई हल्ले केले ज्यात तीन अफगाण क्रिकेटपटूही मारले गेले. यानंतर पाकिस्तान आणि श्रीलंकेसोबत होणा-या आगामी मालिकेत सहभागी न होण्याचा निर्णय अफगाणिस्तानने घेतला आहे. यावरुनच ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी अफगाणिस्तानकडून शिकण्याचा सल्ला देत केंद्र सरकार आणि बीसीसीआयला टोला लगावला आहे.पाकिस्तानने शस्त्रसंधी मोडून केलेल्या हवाई हल्ल्यात अफगाणिस्तानचे तीन क्रिकेटपटू मारले गेल्यामुळे, अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने नोव्हेंबरमध्ये पाकिस्तानविरुद्धची रावळपिंडी आणि लाहोर येथे होणारी टी-२० मालिका रद्द करण्याचा निर्णय घेतला. या घटनेनंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि केंद्र सरकारला खेळापेक्षा देशाला प्राधान्य कसे द्यावे याचे धडे अफगाणिस्तानकडून घेण्याचा सल्ला दिला आहे.या घटनेनंतर प्रियांका चतुर्वेदी यांनी पाकिस्तानवर जोरदार टीका केली. त्यांनी पाकिस्तानच्या लष्कराला भ्याड म्हटले आणि त्यांच्या कृतीवर तीव्र संताप व्यक्त केला.

## पंढरपूर : विठ्ठल मंदिरातील कर्मचा-यांना चिकन मसाल्याच्या पाकिटांचे वाटप, वारकरी संतापले

**सोलापूर/प्रतिनिधी :**देशभरात दिवाळीला सुरुवात झाली आहे. दिवाळीनिमित्त अनेक कंपन्या आपल्या कर्मचा-यांना काहीतरी भेट देत असतात. मात्र पंढरपूरमधून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वारकरी संप्रदायात शाकाहार हा सर्वश्रेष्ठ हार मानला जातो. मांसाहार, मद्यपान अशा गोष्टींना वारकरी सांप्रदाय विठ्ठल भक्तांमध्ये थारा नाही. मात्र पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात काम करणा-या कर्मचा-यांना बीव्हीजी कंपनीकडून चिकन मसाला भेट देण्यात आला आहे. त्यामुळे वारक-यांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. विठ्ठल मंदिरामध्ये बीव्हीजी कंपनीकडून आउट सोर्सिंग पद्धतीने सुरक्षारक्षक व इतर कर्मचारी पुरवले जातात. याच कर्मचा-यांना दिवाळी भेट म्हणून चिकन मसाला देण्यात आला. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सध्या वारकरी संप्रदायातून चिकन मसाल्याच्या भेटवस्तूबाबत संताप व्यक्तकेला जात आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने देखील या कंपनीवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला असून कंपनीला नोटीस बजावली आहे.विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी ही माहिती दिली आहे.



कंपनीला नोटीस-या प्रकाराबाबत बोलताना विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी म्हटले की, आता दिवाळी सणाला सुरुवात झालेली आहे, मोठ्या प्रमाणात भाविक फक्त पांडुरंगाच्या आणि रुक्मिणी मातेच्या दर्शनाला येत आहेत. आपण सुरक्षारक्षक खाजगी कंपनीकडून घेतलेले आहेत, बीव्हीजी कंपनीकडून सुरक्षारक्षकांना दिवाळीचे गिफ्ट दिले आहे. त्या गिफ्टमध्ये विविध प्राडक्ट आहेत, तसेच मसाले आहेत आणि त्याच्यामध्येच चिकन मसाला सुद्धा आहे. पुढे बोलताना राजेंद्र शेळके म्हणाले की, सदरची घटना लक्षात आल्यानंतर ताबडतोब कंपनीने वाटप थांबवलेलं आहे. कारण मसाले असले तरी त्याच्यावरती जे छायाचित्र आहे ते आक्षेपार्ह आहे. पांडुरंगाच्या या पवित्र भूमीत या मंदिराचा आणि येथील सर्वांनीच या मंदिराचे पावित्र्य जपणं गरजेचं आहे. सदरची बाब मंदिर समितीने गांभीर्याने घेतलेली आहेत सदर कंपनीला कालच मंदिर समितीमार्फत नोटीस दिलेली आहे आणि निश्चितच त्याच्यावरती कारवाई केली जाईल. माउली महाराज शिरवळकर यांनी या घटनेचा निषेध केला आहे. त्यांनी म्हटलं की, कर्मचा-यांना चिकन मसाला पाकिट भेट देणे म्हणजे पोलीस चौकीवर दरोडा टाकल्यासारखे आहे. ही क?मन सेन्सची गोष्ट आहे की, दिवाळीला लाडू चिवडा गिफ्ट द्यायला हवा. आता ते चिकन मसाला वाटत आहेत.

## खासदारांच्या अपार्टमेंटला भीषण आग

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीमधील बीडी मार्गावरील ब्रह्मपुत्रा या अपार्टमेंटमध्ये शनिवारी अचानक भीषण आग लागल्याची घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. या अपार्टमेंटमध्ये लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार राहतात. या आगीचं कारण अद्याप समोर आलेलं नाही.दरम्यान, खासदारांची ही अपार्टमेंट संसदेपासून २०० मीटर अंतरावर आहे. या आगीत अपार्टमेंटमधील काही फ्लॅटचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. आगीची घटना घडल्यानंतर काही वेळातच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या ६ गाड्या दाखल झाल्या आणि अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.



अपार्टमेंटच्या वरच्या मजल्यांपैकी एका मजल्यावर आग लागली, त्यामुळे अपार्टमेंटमधील रहिवाशांमध्ये एकच घबराट पसरली आणि मोठा गोंधळ उडाला. मात्र, त्यानंतर तत्काळ ही घटना अग्निशमन दलाला कळवण्यात आल्यानंतर अग्निशमन दलाच्या सहा गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि आग नियंत्रणात आणली.समोर आलेल्या वृत्तानुसार, संसदेपासून फक्त २०० मीटर अंतरावर ही ब्रह्मपुत्रा अपार्टमेंट आहे. या अपार्टमेंटमध्ये संसदेच्या सदस्यांना फ्लॅट देण्यात आलेले आहेत.






जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## आ.प्रवीण तायडे यांच्या प्रयत्नाना यश

# अचलपूर - परतवाडा जुळया शहरात विकास कामांसाठी ५ कोटीचा निधी मंजूर

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या अथक प्रयत्नातून राज्य शासनाने अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात विविध विकास कामांसाठी पाच कोटी रुपयाचा निधी मंजूर केलेला आहे . अचलपूर नगरपरिषद हद्दीतील अचलपूर - परतवाडा जुडवा शहर , चांदूरबाजार नगरपरिषद हद्दीतील विविध विकास कामांकरिता एकूण पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याने

जनतेमध्ये आनंदाचे वातावरण असून आमदार प्रवीण तायडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी विधानसभेचे सदस्य म्हणून पदभार स्वीकारल्यापासून अचलपूर मतदारसंघाचे सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत मतदार संघात विविध विकास कामांसाठी शासनाकडून निधी मंजूर करून आणला आहे . त्यामुळे आमदार प्रवीण तायडे यांच्या पाठपुराव्यामुळे अचलपूर मतदारसंघाचा विकास झपाट्याने होत आहे . विशेष म्हणजे शासन स्तरावर अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातील विविध विकासकामांसाठी प्रस्ताव प्रलंबित असून लवकरच सर्व प्रक्रिया पार पडून राज्य शासन अचलपूर - परतवाडा जुळ्या शहराचा सर्वांगीण विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी ला मंजुरी देणार आहे .यामुळे आ.प्रवीण तायडे यांच्या पुढाकाराने जुळ्या शहरासह अचलपूर तालुक्याचा चेहरामोहरा बदलणार यात शंका नाही .

अमरावती जिल्ह्यातील अ वर्ग दर्जा असलेल्या अचलपूर नगर परिषद हद्दीतील अचलपूर - परतवाडा शहरांमध्ये आमदार प्रवीण तायडे यांच्या पाठपुराव्याची फलश्रुती म्हणून राज्य शासनाने विविध विकास कामांकरिता पाच कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. यामध्ये राज्य शासन नगर विकास विभागाच्या वतीने १७ ऑक्टोबर रोजी पत्रक निर्गमित करण्यात आले. यामध्ये नमूद करण्यात आले आहे की ,अचलपूर नगरपरिषद वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत अचलपूर नगर परिषदेसाठी विविध विकास कामांकरिता ४ कोटी १५ लाख रुपये आणि चांदूरबाजार नगरपरिषद विकास कामांसाठी ८५ लाख रुपयाचा निधी असे एकूण पाच कोटीचा निशी



शासनाकडून मंजूर करण्यात आलेला आहे. यामध्ये ६० लक्ष रुपयाचा निधीतून अचलपूर नगरपरिषद हद्दीतील वाघामाचा चौकात छत्रपती संभाजी महाराज सृष्टी बगीचा विकसित केल्या जाणार आहे .त्यानंतर ५० लाख रुपयांच्या निधीतून आचलपूर शहरातील भगतसिंह चौक येथील हनुमान व्यायाम शाळा येथे नगरपरिषदेचे भव्य दिव्य सभागृहाचे बांधकाम होणार आहे. सोबतच ६० लाख रुपयाचे निधीतून कल्याण मंडपम येथील जलतरण तलावाजवळ क्रिकेट टर्फ ग्राउंड ची सुद्धा निर्मिती केली जाणार आहे .त्यानंतर सर्किट हाऊस येथे जिजाऊ सृष्टी बगीचा विकसित होणार आहे. विशेष म्हणजे ५० लाख रुपयांच्या निधीतून अचलपूर नगर परिषदेच्या प्रशासकीय इमारतीची विस्तारीकरण सुद्धा केले जाणार आहे .त्यानंतर तीस लाख रुपयांच्या निधीतून परतवाडा येथील पार्शोनाथ दिगंबर जैन मंदिर येथे नगर परिषदेचे भव्य दिव्य सभागृहाचे बांधकाम होणार आहे. त्यासोबत ५५ लाख रुपयाचे निधीतून अचलपूर नगर परिषद अंतर्गत पंचायत समिती नगर परिषद प्राथमिक शाळेजवळ आच्छादित क्रीडांगण तयार केले जाणार आहे . ३५ लाख रुपयांच्या निधीतून सुलतानपूरा येथे श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर येथे नगरपरिषदेचे सामाजिक सभागृहाचे बांधकाम होणार आहे आणि अब्बासपुरा प्रभुदास मंदिराजवळील कालंका माता मंदिर येथे नगरपरिषदेचे सामाजिक सभागृहाचे सुद्धा बांधकाम केले जाणार आहे .यासाठी एकूण ४ कोटी १५ लक्ष रुपयांच्या निधी राज्य शासनाने मंजूर केले आहे .तसेच चांदूरबाजार येथील स्मशान भूमीचा विकास होणार आहे.आणि माळीपुरा येथे नगरपरिषदेचे सामाजिक सभागृहाचे निर्माण केले जाणार आहे .असे एकूण अचलपूर व चांदूरबाजार या दोन्ही नगरपालिकेच्या हद्दीतील विविध विकास कामांसाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला आहे .हे सर्व कामे आता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या यंत्रणेखाली संपन्न होणार आहे. विशेष म्हणजे अचलपूर मतदारसंघाचे विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर आमदार प्रवीण तायडे यांनी मतदारसंघात विविध विकास कामांची भूमिपूजन, लोकार्पण केले .आमदार प्रवीण तायडे यांनी चलपूर मतदारसंघाचे प्रलंबित समस्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे वेळोवेळी मांडल्याने विविध प्रलंबित विषय सुद्धा तातडीने मार्गी लागत आहे. आणि मतदारसंघाच्या विकास कामांसाठी शासनाकडून कोट्यवधीचा रुपयाचा निधी मंजूर केले जात आहे. यामध्ये आरोग्य यंत्रणा असो ,न. प , जी.प शाळेच्या सर्वांगीण विकास, पांदण रस्त्याचा प्रश्न, शेतकरी ,शेतमजूर व बेरोजगार तरुणांसाठी राज्य शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी आमदार प्रविण तायडे नेहमी अग्रेसर असतात.

# बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थी कुस्ती स्पर्धेत चमकले

### ओंकार पवारला सुवर्णपदक तर कन्हैया पवारला कांस्यपदक

**यवतमाळ –** पुसद येथील नामांकित बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आयोजित आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

नेहरू आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, नेर येथे पार पडलेल्या या स्पर्धेत ६५ किलो वजनगटातील फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात महाविद्यालयाचा विद्यार्थी ओंकार बाबुराव पवार याने प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक जिंकले, तर ग्रेको-रोमन कुस्ती प्रकारात विद्यार्थी कन्हैया विष्णू पवार याने तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक प्राप्त केले.



गेल्या ४३ वर्षांच्या महाविद्यालयीन इतिहासात प्रथमच कुस्ती प्रकारात सुवर्ण आणि कांस्य अशी दुहेरी पदके मिळाल्याने विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आतापर्यंत अनेक विद्यार्थी अभियांत्रिकी क्षेत्रात देश-विदेशात उच्चपदांवर कार्यरत असून, आता क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थी महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करत आहेत. महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय दर्जाची बॅडमिंटन, टेबल टेनिस, क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल आणि बास्केटबॉलची मैदाने आहेत. मुलींचाही खेळात लक्षणीय सहभाग असून, गेल्या चार दशकांत अनेक महिला खेळाडू या महाविद्यालयातून घडल्या आहेत. या यशाबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष जय नाईक, प्राचार्य डॉ. अविनाश वानखेडे, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय पाटील, प्रा. संजय पांडे, प्रथम वर्ष प्रमुख प्रा. रुचिर गोडबोले तसेच संपूर्ण अध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# प्रहारचे तहसील कार्यालयावर बेसन भाकरी आंदोलन



### -शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी

परतवाडा/प्रतिनिधीः- अतिवृष्टीमुळे अचलपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. शासनाच्या वतीने अजून पर्यंत अचलपूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी कोणतीही मदत घोषित नाही केली.यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाणार आहे. शासनाच्या या वृत्तीचा निषेध करण्यासाठी प्रहारद्वारा आज शनिवार १८ ऑक्टोंबर रोजी तहसील कार्यालयावर बेसन भाकरी आंदोलन करण्यात आले. शासनाचे विरोधात जोरदार घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले तूर, सोयाबीन, कापसाचे पीक हातून गेले. उत्पादन खर्चही पिकांपासून नाही निघाला. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात कोसळले आहे. त्यांना यामधून सावरण्यासाठी शासनाकडून मदत आवश्यक होती पण दिवाळीच्या तोंडावर ही शासनाने कोणतीही मदत शेतकऱ्यांसाठी दिली नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. संतप्त शेतकऱ्यांनी शनिवारी प्रहारच्या नेतृत्वात तहसील कार्यालयात बेसन भाकर ठेचा खाऊन काळी दिवाळी साजरी केली. शासनाने शेतकऱ्यांना वा-यावर सोडले आहे. अधिकारी कर्मचारी जिल्हा परिषद व नगरपंचायत निवडणुकीच्या कामांमध्ये लागलेले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या कडे त्यांचे लक्ष नाही आहे. यामुळे संतापलेल्या शेतकऱ्यांनी शासनाच्या विरोधात काळी दिवाळी साजरी केली. प्रहार जनशक्ती पार्टीच्या पदाधिकाऱ्यांसह शेतकरी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले.

# स्व. आर.जी. देशमुख कृषी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस उत्साहात

**तिवसा/प्रतिनिधीः-** डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती दिनानिमित्त वाचन प्रेरणा दिन १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्म दिवस शालेय तसेच महाविद्यालय स्तरावर साजरा केला जातो. त्यानिमित्त मानव सेवा प्रतिष्ठान वाडी नागपूर, द्वारा संचलित स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालय, तिवसा, येथे १५ ऑक्टोबर २०२५ रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा



करण्यात आला.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण डहाके यांनी डॉ . कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा आणि त्यांच्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा सखोल परिचय करून दिला व विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. प्राध्यापिका भारती नाल्हे यांनी केले व या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण डहाके , शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विविध पुस्तकांच्या वाचनाचा आनंद घेण्यात आला.

## १ व १० वरिल उर्वरित

### धनत्रयोदशीला झाला कोट्यावधीचा

परंपरा आहे. धनतेरस आरोग्य आणि समृद्धी महापर्व आहे. पौराणिक मान्यतेनुसार या दिवशी समुद्रमंथन झाले होते. त्यावेळी भगवान धन्वंतरी अमृत कलश घेऊन प्रकट झाले होते. धनतेरसला कुबेर आणि माता लक्ष्मीची पूजा केली जाते. त्यामुळे धन आणि वैभव प्राप्त होण्याची मान्यता आहे, म्हणूनच याला धनतेरस म्हटले जाते. धन आणि आरोग्याचा संगम पहावयास मिळतो. आज महागाई भरपूर वाढली आहे.सोने ,चांदीचे दर आकाशाला जरी स्पर्श करीत असले तरी लोकांनी क्षमतेनुसार खरेदी केली.विशेष म्हणजे सकाळ पासूनच जयस्तंभ चौक, राजकमल चौक ,शाम चौक, प्रभात चौक ,राजापेठ, जवाहर गेट मार्गावर खरेदीदारांची झुंबड उडाली होती.त्याच वेळी ट्रॅफिक पोलिसांचे नियोजन नसल्याने जागोजागी ट्रॅफिक जामची स्थिती पहावयास मिळाली. धनतेरस हा दिवाळीचा दुसरा दिवस असूनही सर्वत्र मंगल मांगल्य पहावयास मिळत आहे. नागरिकांमध्ये नागरिकांमध्ये नागरिकांमध्ये उत्सवाचे वातावरण पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे आजच्या दिवशी मोबाईल, फ्रिज, टीव्ही ,वाशिंग मशीन, मिक्सर यांची खरेदी पण नागरिकांनी केलेली आहे. सराफा बाजारात सकाळपासून नागरिकांची दुकानात गर्दी पाहायला मिळली.

### रामगाव शेतशिवारात युवकाची

प्राथमिक चौकशीत ही हत्या वैयक्तिक वादातून झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, घटनेमागे कोणते कारण आहे याचा तपास सुरू आहे. पोलिसांनी परिसरातील नागरिकांची चौकशी सुरू केली असून, तांत्रिक पुराव्यांच्या आधारे घटनास्थळाजवळील सीसीटीव्ही फुटेजचीही तपासणी केली जात आहे.

दरम्यान, शहर गुन्हे शाखेने गोपनीय माहितीच्या आधारे जलद कारवाई करत एका संशयितास ताब्यात घेतले आहे. मोबाइल लोकेशन आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. आरोपीला लालखडी परिसरातून अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून चौकशीदरम्यान काही महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याचे समजते.या खळबळजनक हत्येमुळे रामगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नांदगाव पेठ पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### हरविलेले मोबाईल मुळ मालकांना

या पोर्टलवर दाखल असलेले हरविलेल्या मोबाईलचे अवलोकन करून त्यांचा शोध घेण्यात आला. पोलिसांनी एक विवो कंपनीचा ग्रे रंगाचा मोबाईल किमत १२ हजार,एक विवो कंपनीचा मेटालिक रंगाचा मोबाईल कि. १३ हजार,एक रेडमी कंपनीचा काळा रंगाचा मोबाईल कि.१८ हजार, १ रेडमी कंपनीचा पोपटी रंगाचा मोबाईल १० हजार, एक रेडमी कंपनीचा फिक्कट आकाशी रंगाचा मोबाईल १० हजार असे एकूण ६३ हजार ६०० रुपयांचे मोबाईल जप्त करून मूळ मालकांना आज परत केले. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया,उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक आयुक्त राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार , सहायक निरीक्षक अनंता ठाकरे, रिता पिंगळे, आनंदसिंग ठाकूर, योगिता शेंद्रे यांनी कारवाईमध्ये सहभाग घेतला.

### पैशाच्या वादातून सेंट्रींग मजूरावर

केले होते. यावरून आरोपी गुड्डू रोंघे नेहमी युवराज तांबट यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देत होता. शुक्रवारच्या सकाळी युवराज तांबट सेंट्रींगच्या कामासाठी न्यू गणेश कॉलनी परिसरातील एका घरात गेला होता. आरोपी गुड्डू रोंघे व राहुल पटेल पण तिथे गेले. त्यांनी उसने पैशावरून युवराज तांबट सोबत वाद केला व त्याच्या कमरेवर छातीवर चाकूने सपासप वार करून त्याला गंभीर जखमी केले आणि तिथून पळून गेले.तेथे काम करणाऱ्या मजुरांनी त्याला रुग्णालयात दाखल केले आणि त्याच्या पत्नीला पण घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पत्नीने राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

### हनुमानगढीमध्ये आजपासून

आवाहन आज शनिवार १८ ऑक्टोंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी केले. त्यांनी सांगितले की, हनुमान गडी परिसरात १११ फिट उंच हनुमान रायाच्या मूर्ती समोर हा उत्सव साजरा करण्यात येत आहे. यावेळी शक्ति महाराज, एड. सागर देशमुख, मोहन महाराज कारंजेकर, ओम शांतीच्या सीता दीदी, प.पू जितेंद्र नाथ महाराज, जगद्गुरु राज राजेश्वर माऊली सरकार, संत राजेश मोरडिया, संत संतोष नवलानी, खासदार डॉ. अनिल बोंडे, चंद्रकुमार जाजोदिया, डॉ. आशिष मालू उपस्थित राहणार आहे. १४ वर्षाच्या वनवासनंतर प्रभू राम अयोध्या मध्ये परत आले होते. लोकांनी दीपोत्सव साजरा केला. कारण हा केवळ घरी परतण्याचा उत्सव नव्हता तर अंधारावर प्रकाशाच्या विजयाचा उत्सव होता.तिच परंपरा पुढे नेत यावेळी अमरावतीतही प्रकाश उगवेल. रविवारच्या सायंकाळी अयोध्या मधून आलेल्या ज्योत द्वारा अखंड ७ फुट दिवा जाळून ६ वाजता आरती केली जाणार. ७.३० वाजता दीपोत्सव साजरा करून ९ वाजता आतिषबाजी करण्यात येणार आहे. शहरातील नागरिकांनी या उत्सवामध्ये सहभागी होऊन आपल्या कुटुंबीयांच्या सुख समृद्धीसाठी दोन थेंब तेल टाकावे असे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषद मध्ये समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लप्पी जाजोदिया, शक्ती महाराज, सीता दीदी आदि उपस्थित होते.

### आरएसएसला १०० वर्ष पूर्ण झाल्यामुळे

सोबत घेऊन कार्यक्रम घेतले जाणार आहे. यामध्ये १० पारधी बेडा, आणि स्लम एरियामध्ये भागवत कथा, वृक्षारोपण, नेत्रदान, नेत्रप्रत्यारोपण, रक्तदान शिबिर ,देशभक्ती कार्यक्रम घेतले जाणार आहे. यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ,भाजपा, प्रज्ञा प्रबोधिनी, वनबंधू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, आर्ट ऑफ लिविंग, श्री राम नवमी शोभायात्रा समिति, पतंजली योग समिती, गुरुदेव सेवा मंडळ ,शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, हिंदू गौरक्षा दल, भारत स्वाभिमान, इस्कॉन, प्रजापिता ब्रह्मकुमारी, हिंदू महासभा, विश्व मांगल्य सभा, श्रीराम सेवा,गायत्री परिवार सह इतर संघटना सहभागी राहणार आहे. खासदार अनिल बोंडे यांनी सर्व कार्यक्रमासाठी सहयोग करण्याचे आश्वासन दिले आहे.

### दुचाकी-ऑटोच्या धडकेत मनपा

मॅक्स मॉल समोर ऑटो क्रमांक एमएच २७ एएफ ३२७६ च्या चालकाने आपले वाहन निष्काळजीपणाने चालून त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यामुळे राजेंद्र देशमुख वाहन सह खाली पडले. त्यांच्या डोक्याला व छातीला मार लागला. आणि त्यांच्या वाहनाचेही नुकसान झाले. घटनेनंतर ऑटो चालक तिथून पळून गेला. राजेंद्र देशमुख गंभीर जखमी झाल्याने त्यांना रेडियंट हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते जेथे आज त्यांच्या प्रकृती मध्ये सुधारणा झाल्याने त्यांनी आरोपी विरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी ऑटो चालका विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### अचलपूर बाजार समितीसमोर

कृषी उत्पन्न बाजार समिती येथे मका विकण्यासाठी आलेले शेतकरी गेल्या ४-५ दिवसापासून मक्याच्या हमिभावाची प्रतीक्षा करीत आहे .परंतु १७ ऑक्टोबर रोजी शेतकऱ्यांचे मका पिकाची ९०० व ११०० रुपयाने विकले . पण गेल्या वर्षी २ हजार रुपयाने विकले . पण यावेळी या भावामुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात आहे .यामुळे मका पिकाला योग्य भाव न मिळाल्याने आज अचलपूर कृषी उत्पन्न बाजार मध्ये धरणे आंदोलन करण्यात आले.यामुळे शासनाने तत्काळ मक्याच्या पिकाला हमीभाव देण्याची मागणी करण्यात आली.यावेळी शेतकरी बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शुभम तिप्पट असिस्टंट जिओलॉजिस्ट

येथील सिपना महाविद्यालयात व एम.एस्सी भुगर्भशास्त्र छत्रपती संभाजी नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ झाले. त्यानंतर नेट व सेट या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण केल्या. संशोधनासाठी आआयटीआयएएन खडगपूर कलकत्ता येथे शोध कार्य पूर्ण केले. त्याच दरम्यान युपीएससी मेन्स उत्तीर्ण केली. शुभमने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमातून हे यश मिळविले आहे. कुटुंबाचे संपूर्ण सहकार्य त्याला पदोपदी लाभले आहे. शुभमच्या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत कौतुक होत आहे.

### दिवाळी विशेष उपवर युवक -

अध्यक्ष डॉ. गणेश पाटील (माजी कुलगुरू अमरावती विद्यापीठ) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित या मेळाव्यासाठी मंडळाच्या कार्यालयात उपवर युवक युवतींची नोंदणी सुरू असून दुपारी ४ ते सायंकाळी ६ वेळात मंडळाच्या कार्यालयात येऊन नोंदणी करावी. मंडळात यापूर्वी नोंदणी झालेली भरपूर स्थळे उपलब्ध आहेत. तरी संबंधितांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे सरकार्यवाह दिगंबर शहापुरे यांनी केले आहे.

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज **दि. २९/०९/२०२५** रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्रा.थडी** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्रा.थडी** यांनी बोलाविल्यानुसार **ग्रामपंचायत कार्यालय** येथे हजर झालो. **जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी** ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नाव **अब्दुल रशीद शेख अब्दुल** अर्जात नमूद जन्म/मृत्यू दि.१५/१/१९८० च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्रा.थडी** येथील स्थनिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादींबद्दल आम्हांला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहित वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता नजरचुक** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर- योग्य ते नमूद करा)

४)....

करिता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नाव | सही |
|---|---|
| १. सौ. पद्‌माताई सं. मेसकर (सरपंच) | |
| २. श्री. अतुल सा.दारोकार (उपसरपंच) | |
| ३. इजाज्जोदीन मो.इनामदार (त.यु.अ.) | |
| ४.क्रांतीकुमार श.काळे (पो.पा.) | |
| ५ . नंदकिशोर भि. वासनकर (ग्रा.स.) | |

समक्षः

शिक्का

**निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी, तथा**
**ग्रामपंचायत नोंदणी अधिकारी**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

## नगर परिषद कार्यालय, दर्यापूर, जि.अमरावती
## नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५

**महत्वाची सूचना**

दर्यापूर नगर परिषद क्षेत्रातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, दर्यापूर नगर परिषदेची निवडणूक आगामी काळात होऊ घातली आहे. त्याकरीता प्रभाग निहाय मतदार यादीचे काम न.प.स्तरावरुन सुरु असून लवकरच मतदार यादी अंतिम होईल. तसेच मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्याकरीता सर्व नागरिकांनी आपले नांव प्रभाग क्रमांक व मतदार यादीतील अनुक्रमांकाची खात्री करुन नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावावा. जागृत मतदारच मजबूत लोकशाहीची गुरुकिल्ली आहे, असे आवाहन मा.मुख्याधिकारी यांचे वतीने करण्यात येत आहे.

खालील वेबसाईट लिंक वरुन मतदार यादीतील नांव तपासणी करता येईल. https://mahasecvoterlist.in / ObjectiononClick / DownloadVoterlist अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक ३१.१०.२०२५, मतदार केंद्राची यादी प्रसिध्द करणे आणि मतदान केद्रनिहाय याद्या प्रसिध्द करणे दिनांक ०७.११.२०२५.

**(डॉ.विकास खंडारे)**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, दर्यापूर**

**सूंदर दर्यापूर - स्वच्छ दर्यापूर, आपले शहर स्वच्छ शहर, चला प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करु या.**
**दीपावलीच्या सर्व दर्यापूर क्षेत्रातील नागरिकांना हार्दिक शुभेच्छा**

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, १९ ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# ३६ गावातील २०७८ हेक्टरमधील पिकांचे नुकसान !

## पातुर तालुक्यातील ३ ३ ० ७ शेतकऱ्यांना मिळणार भरपाईची मदत

■ प्रतिनिधी | खेट्री ■

**यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे पातुर तालुक्यातील ३६ गावांमधील तब्बल २०७८ हेक्टर क्षेत्रातील विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा म्हणून राज्य शासनाने एकूण ३ ३ ० ७ शेतकऱ्यांना पीक नुकसानीची भरपाई देण्याची घोषणा केली आहे. ही रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होणार असून, त्यामुळे दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.**



यंदाच्या पावसाळ्यात ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, मका, तूर, हरभरा आदी पिकांचे मोठे नुकसान झाले. याआधीही मे महिन्यात झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे खरीप हंगामात पिकांची मोठी हानी झाली होती. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला होता.

शेतकऱ्यांनी बँक आणि सावकारांकडून कर्ज घेऊन रब्बी हंगामाची पेरणी केली होती, मात्र अतिवृष्टीमुळे रब्बी पिके हातातून गेली. त्यानंतर पुन्हा कर्ज काढून हंगामी पिके घेतली; पण पुन्हा झालेल्या अतिवृष्टीमुळे ही पिकेसुद्धा नष्ट झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

'पीक नुकसानीसाठी घोषित मदत स्वागतार्ह आहे, मात्र शासनाने दोन हेक्टरऐवजी किमान तीन हेक्टरपर्यंतची मर्यादा ठेवावी. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पिकांची पेरणी केली होती, परंतु अतिवृष्टीमुळे ते सर्व हातातून गेले. कर्जफेडीचा ताण वाढत असून, शेतकरी हवालदिल झाला आहे. शासनाने या परिस्थितीकडे गंभीरपणे लक्ष देणे गरजेचे आहे.'

**दिलीप परनाटे,**
जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम

शासनाने नुकतेच दोन हेक्टरपर्यंतची भरपाई मर्यादा निश्चित केली आहे. मात्र, या मर्यादेत अनेक शेतकऱ्यांचे नुकसान पूर्णपणे भरून निघत नसल्याने शेतकरी वाढीव मदतीची अपेक्षा करत आहेत.

# सोयाबीन उत्पादनात घट; शेतकऱ्यांना आर्थिक फटका!

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील सावरगाव परिसरातील शेतकऱ्यांवर यंदाच्या खरिप हंगामात दुहेरी संकट कोसळले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे कधी अतिवृष्टी, तर कधी दुष्काळ यामुळे सोयाबीन पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. त्यातच बाजारात दर कोसळल्याने शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था डळमळीत झाली आहे.

हंगामाच्या सुरुवातीला जोरदार पावसामुळे पिके चांगली वाढतील, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र अतिवृष्टीमुळे सोयाबीनच्या शेंगा नीट भरल्या नाहीत. परिणामी उत्पादन घटले आहे. सध्या सोयाबीन काढणी सुरू असून, तीन हजार रुपये एकरी मजुरी देऊनही मजूर मिळत नाहीत. यामुळे शेतकऱ्यांची चांगलीच दमछाक होत आहे.

सद्यस्थितीत बाजारात सोयाबीनला फक्त ३ ते ४ हजार रुपये प्रति क्विंटल एवढा दर मिळत आहे. या दरामुळे उत्पादन खर्चही निघत नाही, परिणामी शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. उत्पादन घट आणि दर घसरण या दुहेरी संकटामुळे पुढील रब्बी हंगामासाठी तयारी करणेही कठीण झाले आहे.



### सावरगाव परिसरातील शेतकरी हवालदिल

बहुसंख्य शेतकऱ्यांनी बँक व सावकारांकडून कर्ज घेऊन पेरणी केली आहे. आता उत्पादनात घट झाल्याने कर्जाची परतफेड कशी करायची, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. शासनाकडून तुटपुंजी हेक्टरी मदतीची घोषणा करण्यात आली असली, तरी ती अपुरी असल्याने शेतकरी नाराजी व्यक्त करत आहेत.

**सोयाबीन पेरणीसाठी लावलेला खर्चही निघेना! :** यंदा सोयाबीन उत्पादन घटल्यामुळे शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्चसुद्धा निघणार नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. अतिवृष्टीमुळे खरिप हंगाम वाया गेला असून, आता पुन्हा रब्बी हंगामासाठी नव्या कर्जाची गरज भासत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती आणखी बिकट होत चालली आहे.

'खुल्या बाजारपेठेत दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांकडून मनमानी दराने सोयाबीन खरेदी करून आर्थिक लूट केली जात आहे. शासनाने त्वरित हमीभाव केंद्र सुरू करून शेतकऱ्यांचे संरक्षण करावे.'

**दिलीप परनाटे,**
जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम

**शेतकरी हमीभाव खरेदी केंद्राच्या प्रतीक्षेत!:** सध्या सोयाबीन काढणी पूर्ण वेगात सुरू असून विक्रीही सुरू झाली आहे. परंतु नाफेड अंतर्गत शासनाने हमीभाव खरेदी केंद्र अद्याप सुरू केले नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना खुल्या बाजारातच माल विकावा लागत आहे. परिणामी त्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. शेतकऱ्यांकडून तातडीने हमीभाव केंद्र सुरू करण्याची मागणी होत आहे.

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; २ ठार, ४ जखमी

### जगन्नाथपुरी दर्शनाला निघालेल्या वाहनाचा दुभाजकावर भीषण धडक; वाशिम जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला असून चार जण जखमी झाले आहेत. ही दुर्घटना डव्हा-जऊळका दरम्यान समृद्धी महामार्गावरील लोकेशन क्रमांक २३२/३०० येथे आज पहाटे दोनच्या सुमारास घडली.



मुंबईहून जगन्नाथपुरी दर्शनासाठी निघालेल्या इनोव्हा चारचाकी वाहन (क्रमांक ९५०१ँ१२१५) ला चालकाचे नियंत्रण सुटल्याने गाडी थेट महामार्गाच्या दुभाजकावर जाऊन आदळली. धडकेचा जोर इतका जबरदस्त होता की वाहनाचा पुढील भाग अक्षरशः चकनाचूर झाला. या अपघातात गाडीतील सात प्रवाशांपैकी दोन जण जागीच ठार झाले, एकजण गंभीर जखमी झाला असून उर्वरित चारजण किरकोळ जखमी झाले आहेत.

मृतांमध्ये म्यानमार देशातील मिन ऑग (वय ३३) आणि मिन चित ऑग (वय १३) या दोघांचा समावेश आहे. गंभीर जखमी प्रवाशाला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथे दाखल करण्यात आले असून त्यावर उपचार सुरू आहेत. इतर किरकोळ जखमी प्रवाशांनाही प्राथमिक उपचार देण्यात आले आहेत.अपघाताची माहिती मिळताच जऊळका पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह पंचनामा करून रुग्णालयात हलवले आणि वाहतूक सुरळीत करण्याची व्यवस्था केली. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे. समृद्धी महामार्गावर वाढत्या वेगामुळे आणि वाहनचालकांच्या निष्काळजीपणामुळे अपघातांची मालिका वाढत असून, नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आणि वेगमर्यादा पाळण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# गतीरोधक व नालीचे बांधकाम करा
## अन्यथा ठिय्या आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अंबाशी येथील आलेगाव–बाभुळगाव या मुख्य रस्त्यावर गतीरोधक व नाल्यांच्या अयोग्य बांधकामामुळे वाहनधारकांना दररोज मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात आलेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित रस्त्यावर तीन गतीरोधक व एक नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. सांडपाण्यामुळे रस्त्यावर घसरून अपघात होण्याची शक्यता वाढली असून, नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

### आलेगाव–बाभुळगाव रस्त्यावरील समस्या : सा. बा. विभागाकडे तक्रार

सदर रस्ता व नालीचे बांधकाम तात्काळ दुरुस्त करून योग्य प्रकारे पूर्ण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा २८ ऑक्टोबर २०२५ पासून सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला येथे ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते कापकर यांनी दिला आहे. या आंदोलनादरम्यान काही अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील, असेही निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.



# दिवाळीच्या पूर्वसंध्येला भटक्या फासेपारधी जमातीच्या घरावर चालला प्रशासनाचा बुलडोझर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

संपूर्ण देशासह वाशिम जिल्ह्यात सर्वत्र दिवाळीच्या सणाची तयारी जोरदार सुरू असतानाच ऐन दिवाळीच्या पूर्वसंध्येला वसुबारसेच्या दिवशीच वाशिम तालुक्यातील काजळंबा येथे गेले काहीं वर्षांपासून इ क्लास जमिनीवर कच्चे घरे बांधून राहणाऱ्या फासेपारची जमातीच्या घरावर दिनांक १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता वाशिम जिल्हा प्रशासनाच्या बुलडोझर चालला.



वाशिम तालुक्यातील काजळबा या ठिकाणी अनेक पारधी समाजाची लोक शासकीय जागेवर कच्चे बांधकाम तर काही जण पाल ठोकून राहत आहेत. मात्र दिनांक १७ ऑक्टोबर रोजी या समाजातील नागरिकांच्या पालाचे व शेडच्या घरावर बुलडोझर जिल्हा प्रशासनाने चालवला असून यामुळे एन दिवाळीच्या काळात सदर फासेपारधी जमातीच्या कुटुंबांना उघड्यावर थंडी वाऱ्यामध्ये राहण्याची वेळ आली. जेथे नागरिक या सणाला घरी दारी पणती लावून रोषणाई करतात परंतु या फासेपारधी जमातीच्या लोकांवर मात्र अंधारात राहण्याची वेळ आली.

जिल्ह्यात एवढी गंभीर घटना घडूनही याची दखल कोणीच घेतली नाही याची खंत फासेपारधी जमातीने व्यक्त केली.

# शिवाजी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

■ प्रतिनिधी | रिसोड ■

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,रिसोड येथे भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्याच्या उद्देशाने शासनाच्या वतीने त्यांची जयंती ही वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्राचार्य मा.संजय देशमुख यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे ग्रंथपाल बापूसाहेब सरनाईक, जेष्ठ प्राध्यापक अरुण लिमजे यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनीही डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली.

# प्राचार्य डॉ. संजय पाटील ग्रामगीताचार्य पदवीने सन्मानित

■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. संजय पाटील यांना अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ ,गुरुकुंज आश्रम, मोझरी द्वारा वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथीनिमित्त गुरुकुंज येथे 'ग्रामगीताचार्य 'पदवीने सन्मानित करण्यात आले.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समग्र वाङ्मयावर आधारित लेखी परीक्षा व 'सामुदायिक प्रार्थना- लोक सुधारण्याचे विद्यालय' या विषयावर त्यांनी प्रबंध सादर केला होता. गुरुकुंज आश्रमाचे सर्वाधिकारी लक्ष्मण गमे, संचालक मंडळाच्या अध्यक्ष पुष्पाताई बोंडे ,परीक्षा विभागाचे अध्यक्ष गुलाबराव खवसे, सचिव गोपाल दादा कडू व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत प्राचार्य डॉ. संजय पाटील यांना सन्मानपत्र , मानचिन्हासह 'ग्रामगीताचार्य ' पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. संजय पाटील हे भाषा अभ्यासक असून, सहकार महर्षी भास्करराव शिंगणे महाविद्यालय ,खामगाव चे विद्यमान प्राचार्य आहेत. संत गुलाबराव महाराजांच्या साहित्यावर त्यांनी यापूर्वीच आचार्य पदवी प्राप्त केली आहे तद्वत असते पीएचडी चे गाईड सुद्धा आहेत. आता ग्रामगीताचार्य म्हणून त्यांनी सन्मान प्राप्त केला आहे. आपल्या या यशाचे श्रेय त्यांनी जिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर कव्हळे, मार्गदर्शक संजयराव देशमुख, सुनील देशमुखे यांना दिले आहे.

# डॉ पूजा खेतान यांना लायन्सचा मेडिकल एक्सलन्स अवॉर्ड

**अकोला :** सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने महानगरात अनेक वर्षापासून सामाजिक व वैद्यकीय सेवा करीत असणाऱ्या फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष नेत्रतज्ञ डॉ पूजा सुमित्रा रमाकांत खेतान यांना अत्यंत प्रतिष्ठेचा मानल्या जाणारा लायन्सचा 'मेडिकल एक्सलन्स अवॉर्ड' प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. पुणे येथे नुकत्याच संपन्न झालेल्या डिस्ट्रिक्ट ३२३४ डी २ अंतर्गत कार्यरत असणाऱ्या लायन्स क्लब ऑफ पुणेच्या वतीने आयोजित गौरव सोहळ्यात डॉ पूजा रमाकांत खेतान यांना प्रसिद्ध अभिनेत्री संगीता बिजलानी यांच्या हस्ते व डिस्ट्रिक्ट ३२३४ डी २ चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजेश अग्रवाल यांच्या उपस्थितीत 'मेडिकल एक्सलन्स इन ऑप्थोलमोलॉजी' हा अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ पूजा रमाकांत खेतान नेत्रतज्ञ म्हणून सेवारत असून त्यांच्या सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने सातत्याने अनेक नेत्ररोग व रोगनिदान शिबिरे आयोजित करण्यात येत असतात.

# आकाश कंदील व पणती सजावट कार्यशाळेतून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलतेचा जागर



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोडवरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा, मालेगाव येथे दीपावलीच्या पार्श्वभूमीवर 'आकाश कंदील बनविणे व पणती सजावट कार्यशाळा' हा उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक सणाचे महत्त्व समजून घेताना स्वतःच्या कल्पकतेचा वापर करून सुंदर आकाश कंदील तयार केले आणि विविध प्रकारे पणती सजावटीत सहभाग घेतला.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आकाश कंदील तयार करण्याच्या पद्धतीबद्दल तसेच पणती सजावटीत रंगसंगती, डिझाईन आणि कलात्मक मांडणी कशी करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून सुरेखा मेहकरकर आणि सुषमा देशमुख यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन केले.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, स्वावलंबन आणि भारतीय सणांची पारंपरिक जाणीव विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या आकाश कंदीलाचे शाळेत प्रदर्शन भरून विक्रीसाठी सुद्धा उपलब्ध करण्यात आले आहेत. यामधून विद्यार्थ्यांना मूल्य शिक्षणाची सुद्धा जाणीव होईल.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे, शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन शाळेच्या शिक्षकांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. बालविकास मंदिर प्राथमिक शाळेचा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रेरणादायी ठरला.

# नगर परिषद, कारंजा (लाड) हद्दीतील ८ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन

### आमदार सई डहाके यांच्या प्रयत्नांना यश

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा नगर परिषद हद्दीत विविध मूलभूत सुविधांच्या उन्नतीसाठी ८ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन आजरोजी मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. त्या अनुषंगाने शहरात विविध १९ ठिकाणी भूमिपूजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या विकास प्रकल्पांमुळे शहरातील पायाभूत सुविधा भक्कम होतील आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या विकासकामांमध्ये सिमेंट काँक्रिटचे रस्ते , नाली बांधकाम यांचा समावेश आहे. नगर परिषद क्षेत्रात अनेक भागांतून नागरिकांकडून सातत्याने मागणी व तक्रारी येत होत्या. त्या पार्श्वभूमीवर आमदार सईताई डहाके यांनी राज्य शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले असून ०८ कोटि रुपये किमतीच्या विकासकामांची मंजुरी कायम ठेवण्यात आली. त्याकरिता खर्ची होणाऱ्या निधीचे नियोजन करून प्रत्यक्षात काम सुरु करण्याचे आदेश प्राप्त झाले. आमदार सईताई डहाके यांच्या भगीरथ प्रयत्नामुळेच विकासकामांकरिता प्रत्यक्षात निधी प्राप्त होऊन कामाला सुरुवात होत आहे, हे निर्विवाद सत्य आहे.

प्रस्तावित भूमिपूजन कार्यक्रमास आमदार सईताई डहाके, नरेंद्रजी गोलेच्छा माजी नगराध्यक्ष, दत्तराजजी डहाके माजी नगराध्यक्ष, प्राजक्ता माहितकर भाजपा शहर अध्यक्ष यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. आयोजकांनी सर्व विकासप्रेमी नागरिकांना व स्थानिक रहिवाशांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.



या विकास कामाच्या भूमिपूजनाच्या पूर्वसंध्येला आमदार सईताई डहाके यांची प्रतिक्रिया घेतली असता त्यांनी सांगितले की, 'शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध आहे. ही केवळ सुरुवात असून आगामी काळात आणखी निधी खेचून आणून इतर कामेही मार्गी लावली जातील.' या विकासकामांमुळे नगर परिषद क्षेत्रातील नागरी जीवनमान सुधारण्यास मदत होईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३२० ■ रविवार, १९ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# जिल्ह्याचे सहकार क्षेत्र वाढविण्यासाठी बँकांनी प्रयत्न करावे : पालकमंत्री डॉ.भोयर



**वर्धा जनमाध्यम :** शून्य टक्के थकीत कर्जदार असलेल्या वना नागरिक सहकारी बँकेने चोवीस वर्षात जिल्ह्यासोबतच चंद्रपूर, यवतमाळ व नागपूर जिल्ह्यात बँकेच्या शाखा उघडून मोठा विस्तार केला आहे. त्यांचे अनुकरण इतर बँकांनी करुन जिल्ह्याचे सहकार क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

हिंगणघाट येथील सहकारी बँकेच्या मांडगाव येथील ११ व्या शाखेच्या नवीन इमारतीचे लोकार्पण पालकमंत्री डॉ.भोयर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार समीर कुणावार, माजी आमदार राजु तिमांडे, समुद्रपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती हिंमतराव चतूर, समुद्रपूर नगर पंचायतीच्या अध्यक्षा योगिता तुळणकर, सुरेंद्र कोकेकर, नरेंद्र थोरात, सुनील गफाट, किशोर दिघे, सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश सायंकार आदी उपस्थित होते.

कमी कालावधीमध्ये वना नागरिक बँकेने ११ शाखा सुरु करुन उत्कृष्टपणे बँक चालवून गरीबांना कर्ज देण्यासोबतच नागरिकांना रोजगाराच्या संधी सुध्दा उपलब्ध करुन दिल्या आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक डबघाईस आली असतांना बँकेचा परवाना रद्द करण्यात आला असतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्यावतीने बँकेला जीवंत ठेवण्यासाठी १६३ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देऊन रिझर्व्ह बँकेकडून जिल्हा मध्यवर्ती बँकेचा रद्द झालेला परवाना प्राप्त करुन घेतला असल्याचे डॉ. भोयर म्हणाले.

केंद्र शासनाच्यावतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करीत असतांना राज्यातील १५ सेवा सहकारी संस्थाचे संगणकीकरण करण्यात येत असून यामुळे सहकार क्षेत्राला वैभव प्राप्त होईल, असा आशावाद डॉ. पंकज भोयर यांनी यावेळी व्यक्त केला.

बँक चालविणे सोपी गोष्ट नसून बँकेने जिल्ह्यासोबतच इतर जिल्ह्यात अशा ११ शाखा सुरु केल्या आहे. ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. दहेगाव गोसावी येथे बँक नसल्यामुळे शेतक-यांना केळझर येथे जावे लागतात. यासाठी बँकेने शाखा उघडून शेतक-यांनी दहा किलोमीटर जाण्याची पायपीट वाचवावी असे, आ.समीर कुणावार म्हणाले.

यावेळी रणजित काबंळे, राजू तिमांडे यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला हिंगणघाट, समुद्रपूर तालुक्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक, खरेदी विक्री संघाचे संचालक, नागरिक, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत ज्ञानेश्वर वॉर्डातील कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

## -आ.कुणावार यांच्या कार्यशैलीवर विश्वास व्यक्त




**हिंगणघाट जनमाध्यम :** आमदार समीर कुणावार यांच्या विकासाभिमुख कार्यप्रणालीने प्रभावित होऊन हिंगणघाट शहरातील संत ज्ञानेश्वर वॉर्डातील महिला व युवा कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला. मारोती सहारे व कविता सहारे यांच्या नेतृत्वात झालेल्या या पक्षप्रवेशाने स्थानिक संघटनेत नवचैतन्य निर्माण झाले आहे.या वेळी सौ. वनिता वानोडे, माया मांडवकर, विशाखाताई बेदुरकर, उषा व रोशनी गहलोत, मंजुषा भालकर, लक्ष्मी देशमुख, सौ. वंदनाताई डाखोरे, छाया खडतकर, शोभा लिबाडे, जयश्री घाटुर्ले, पायल ठोंबरे यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्यांनी भाजपाचा शेला परिधान केला. तसेच चिंतामण मांडवकर, मोहनराव वानोडे, शालिकराव जांभूळे, प्रभाकरराव तिवाडे, रामदास कुंभारे, पुरुषोत्तम मिसरकर आदींनीही पक्षप्रवेश केला.या कार्यक्रमाला आमदार समीर कुणावार यांच्यासह अनुसूचित जमाती आघाडीचे जिल्हाध्यक्ष शंकर आत्राम, शहराध्यक्ष भूषण पिसे, शहर कार्यकारी अध्यक्ष संजय माडे, मारोती सहारे, शरद कोणप्रतिवार, देवा वाघमारे, सुनील कर्नाके आदी मान्यवर उपस्थित होते.नव्या कार्यकर्त्यांचे स्वागत करताना आमदार कुणावार म्हणाले की, भाजप हा जगातील सर्वात मोठा पक्ष असून समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पक्षाचे विचार पोहोचविण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्यावर आहे. त्यांनी सर्वांना आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# वर्ध्याचे डॉ.गणेश गायकवाड (डेझा) रूपेरी पडद्यावर

## -'होगा क्या अब' चित्रपटात खलनायकाच्या भूमिकेत डॉक्टर-प्राध्यापक

**वर्धा जनमाध्यम :** शिक्षकीपेशातून थेट कलाक्षेत्रात झेप घेत, शिरपूर (होरे) येथील प्रा. डॉ. गणेश गायकवाड (डेझा) आता मुंबईच्या रूपेरी पडद्यावर झळकणार आहेत. 'होगा क्या अब' या आगामी हिंदी चित्रपटात त्यांनी खलनायकाची प्रभावी भूमिका साकारली असून, हा चित्रपट हिंदी, भोजपुरी आणि छत्तीसगढी या तीन भाषांमध्ये एकाचवेळी प्रदर्शित होणार आहे.या भूमिकेविषयी बोलताना डॉ. गायकवाड म्हणाले, हा अनुभव माझ्यासाठी वेगळा आणि शिकवणारा आहे. प्रेक्षकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. शैक्षणिक जीवनाबरोबरच अभिनयाचा ध्यास घेत त्यांनी दोन्ही क्षेत्रात समान यश संपादन केले आहे.



होगा क्या अब' चित्रपटाचे दिग्दर्शन हेमंत कुमार यांनी केले असून, निर्माते सूरज विश्वकर्मा आहेत. विकी पवार मुख्य भूमिकेत आहे तर नाट्यदिग्दर्शक संजय राम यांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे. भोजपुरी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री प्रियंका महाराज देखील यात झळकणार आहेत.डॉ. गायकवाड यांनी यापूर्वी 'बेरा एक अघोरी' या चित्रपटात विनोदी भूमिका साकारली होती. त्याशिवाय ते गायक, गीतकार, संवादलेखक आणि लेखक म्हणूनही ओळखले जातात. शिक्षकीपेशा आणि कलाक्षेत्र यांच्यातील संतुलन राखताना त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या आगामी चार हिंदी चित्रपटांचे चित्रीकरण दिवाळीनंतर सुरू होणार असल्याचेही समजते.

# मद्यधुंद अवस्थेत हायड्रा चालकावर गुन्हा दाखल



## बजाज चौकात वाहतूक पोलिसांची कारवाई; वाहन जप्त

**वर्धा जनमाध्यम :** दीपावलीच्या पार्श्वभूमीवर शहरात वाहतुकीचे प्रमाण वाढले असून वाहतूक पोलिसांनी चौकांचौकात विशेष गस्त ठेवली आहे. शनिवारी दुपारी दोनच्या सुमारास बजाज चौकात मद्यधुंद अवस्थेत हायड्रा वाहन चालवणाऱ्या चालकास पोलिसांनी पकडले. सदर चालकाने वाहनावर नियंत्रण गमावल्याने एक चारचाकीला किरकोळ धक्का लागला. वाहतूक पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक मंगेश येळणे यांनी तात्काळ कारवाई करून चालकाची चौकशी केली असता तो दारूच्या नशेत असल्याचे आढळले. वैद्यकीय तपासणीतही हे स्पष्ट झाले.आरोपी संदीप मधुकर मंगरुळकर (वय ३५, रा. बोरगाव मेघे, जि. वर्धा) याच्याविरुद्ध मोटार वाहन कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून श्प २७" २२२७ क्रमांकाचे हायड्रा वाहन पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या निर्देशाप्रमाणे एएसआय मंगेश येळणे, पो. ह. आशिष देशमुख आणि मुन्ना तिवारी यांनी केली आहे.

# अल्पवयीन मुलीस पळवून नेलेल्या आरोपीस पुण्यातून शिताफीने ताब्यात घेत अटक

## -वर्धा पोलिसांची प्रभावी कामगिरी

**हिंगणघाट जनमाध्यम :** अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेणाऱ्या आरोपीस हिंगणघाट पोलिसांच्या तक्रारीनंतर वर्धा पोलिसांनी अल्प वेळात शिताफीने शोधून पुण्यातून अटक केली आहे. या कारवाईमुळे एक गुन्हा उघडकीस आला असून अल्पवयीन पीडितेस सुरक्षित ताब्यात घेण्यात आले आहे.



हिंगणघाट पोलिस ठाण्यात फिर्यादीने दिलेल्या तोंडी अहवालानुसार, तिची अंदाजे १७ वर्षांची मुलगी एका अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेली. त्यावरून पो.स्टे. हिंगणघाट येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, वर्धा तसेच स्थानिक गुन्हे शाखा वर्धा यांच्या मार्फत हाती घेण्यात आला. पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या विशेष सूचनांनुसार अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांनी विशेष पथक तयार केले. खात्रीशीर गुप्त माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी राहुल अशोक कन्नाके (वय २१ वर्षे, रा. कुकाबर्डी, ता. हिंगणघाट) हा पुण्यात असल्याची महत्त्वाची माहिती समोर आली.त्या अनुशंगाने पथकाने अत्यंत शिताफीने सापळा रचून आरोपीस हडपसर, पुणे येथून ताब्यात घेतले. चौकशीत पीडित अल्पवयीन मुलगी आरोपीसह राहत असल्याचे स्पष्ट झाल्याने तिलाही सुरक्षितपणे ताब्यात घेण्यात आले. आरोपीस कायद्यानुसार अटक करण्यात आली असून पुढील तपास हिंगणघाट पोलीस करीत आहेत. या कारवाईत स.फौ. सुभाष राऊत, दिवाकर परिमल, पोहवा संजय राठोड, नितेश मेश्राम, म.पो.हवा. शबाना शेख, तसेच सायबर सेल वर्धा येथील मिना कौरती, अक्षय राऊत, गोविंद मुंडे यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

# शेतकऱ्यांच्या ओलीतासाठी कालवा पाणी लवकर सोडा

## भाजप पदाधिकाऱ्यांची मागणी

**तळेगाव (श्या. पंत) जनमाध्यम :** आष्टी तालुक्यात पिकांना आवश्यक ओलीत मिळावे म्हणून ऊर्ध्व वर्धा डावा कालवा तसेच आष्टी आणि मलकापूर तलावाचे पाणी लवकर सोडावे, अशी मागणी भाजप पदाधिकाऱ्यांनी केली आहे. तहसील कार्यालय, आष्टी येथे आमदार आपल्या दारी या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात या मागणीचे निवेदन आमदार सुमित वानखेडे व आमदार दादाराव केचे यांना देण्यात आले.



या वेळी भाजपा नेते आशाताई विजयकर, जिल्हा महामंत्री कमलाकर निंभोरकर, तालुका अध्यक्ष सचिन होले, तालुका सरचिटणीस देवानंद डोळस, युवा मोर्चा अध्यक्ष अनिरुद्ध दंडाळे, राजेश ठाकरे आणि प्रशांत काकपुरे उपस्थित होते.

मान्सूनची माघार झाल्यानंतर तापमानात झालेली वाढ आणि उकाड्यामुळे पिकांवरील ओलीत धोक्यात आली आहे. दरवर्षी कालवा पाणी १५ नोव्हेंबरपासून सोडले जाते; मात्र सध्याच्या परिस्थितीत पिके करपण्याचा धोका निर्माण झाल्याने हे पाणी २० ऑक्टोबरपासून सोडावे, अशी विनंती भाजप पदाधिकाऱ्यांनी निवेदनातून केली आहे.

# शिवसेनेची दिवाळी:वंचितांच्या घरी उजेड

## -महिला आघाडीचा उपक्रम

**वर्धा जनमाध्यम :** गरीबांच्या घरातही दिवाळीचा उजेड पेटविण्याचा संकल्प शिवसेनेने केला आणि तो प्रत्यक्षात आणत महिला आघाडीच्या वतीने शहरभर मिष्ठान व फराळाचे वितरण करण्यात आले. वंचित, मागास आणि गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणारा हा उपक्रम सलग चार दिवस १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान थाटात राबविण्यात आला.विदर्भ समन्वयक आमदार नरेंद्र भोंडेकर आणि विदर्भ संघटक किरण पांडव यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसभा संपर्कप्रमुख राज दीक्षित यांचे सूचनेनुसार लोकसभा संघटक रविकांत बालपांडे, सहसंपर्क प्रमुख श्रीकांत मिरापूरकर, सहसंघटक गणेश इखार, जिल्हाप्रमुख राजेश सराफ व प्रशांत शहागडकर, जिल्हा समन्वयक अनिल देवतारे, उपजिल्हा प्रमुख मिलन गांधी, कामगार नेते प्रशांत रामटेके, शहर प्रमुख शार्दूल वांदिले यांच्या नेतृत्वात ही सामाजिक मोहीम पार पडली.शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख शुभांगी ठमेकर यांनी लेंडीपुरा परिसरात प्रत्यक्ष जाऊन वाटपाचा शुभारंभ केला. त्यानंतर शहरातील शिवाजी पेठ, स्टेशन फैल, दयालनगर, बुरड मोहल्ला, पूलफैल, तार फैल, शिवनगर, हनुमान नगर, जाकीर हुसेन कॉलनीसह अनेक भागांत मिष्ठान व फराळाचे कीट वाटप करण्यात आले.या दिवाळी भेट उपक्रमात अनिल देवतारे, प्रशांत रामटेके, शार्दूल वांदिले, बादल श्रीवास्तव, विजय कंगाले, युद्धिष्टीर थोरात, धनश्री थोरात, सुनीता पंढरे, नरेश बोन्द्रे, कोमल येणुरकर, सोनाली गोलाई, सृष्टी पाचे, प्रज्वल वाटकर आदींसह असंख्य शिवसैनिकांनी सहभाग घेऊन वंचितांच्या दिवाळीला उजाळा दिला.



## हातातोंडाशी आलेलं पीक जाळलं

# अतिवृष्टी, रोगराईच्या फटक्याने हताश तावी येथील शेतकऱ्याचा टोकाचा निर्णय

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यात अतिवृष्टी आणि रोगराईमुळे शेतकऱ्यांचं सोयाबीन पीक उद्ध्वस्त झालं असून, तावी येथील प्रकाश बलकी या शेतकऱ्याने हताश होऊन स्वतःच्या हाताने अडीच एकरातील सोयाबीन पेटवून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.प्रकाश बलकी यांनी एकूण पाच एकर क्षेत्रात लागवड केली होती. त्यापैकी अडीच एकरात परहाटी, तर उर्वरित अडीच एकरात सोयाबीनची पेरणी केली. मात्र, शेंगा भरण्याच्या अवस्थेतच पिकाला पिवळेपणा आणि रोगराईचा तडाखा बसला. शेंगा अर्धवट भरल्यामुळे कापणी करून मळणी केली तरी खर्चही निघणार नाही, अशी वेळ आली.हताश झालेल्या प्रकाश बलकी यांनी पिक काही होत नाही या निराशेने अडीच एकरातील सोयाबीन शेतीला स्वतःच्या डोळ्यांनी आगीच्या स्वाधीन केले. क्षणात हिरवेगार पीक जळून खाक झाले. यंदा अतिवृष्टी, कीडरोग, आणि बाजारातील अनिश्चिततेने शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. प्रशासनाकडून नुकसान भरपाई मिळण्याची शेतकऱ्यांना अद्यापही प्रतीक्षा आहे.



# दुर्गानगरात गांजा विक्रीचा पर्दाफाश; महिला सहित चौघे अटकेत

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** स्थानिक पोलिसांनी अंमली पदार्थ विरोधी कारवाई करत दुर्गानगर परिसरात गांजा विक्री करणाऱ्या टोळीचा भंडाफोड केला. या कारवाईत एका महिलेचा समावेश असलेल्या चौघांना अटक करण्यात आली असून तब्बल २३ किलोहून अधिक गांजा जप्त करण्यात आला आहे. पोलिस ठाणे कारंजा येथील पोलीस उपनिरीक्षक सलाम कुरेशी यांच्या पथकाने दि. १७ ऑक्टोबर रोजी सकाळच्या सुमारास दुर्गानगर विभागात ही कारवाई केली. विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कमल अशोक सोनी ही महिला आपल्या घरातून गांजाची विक्री करत असल्याचे समजताच पोलिसांनी छापा घातला. घटनास्थळी पोलिसांनी दोन मोपेड व दोन मोबाईलसह एकूण २३ किलो १६ ग्रॅम गांजा असा अंदाजे १.६१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.या गुन्ह्यात कमल अशोक सोनी (२५), कृष्णा मितारीलाल कंजर (२९), सुजित ललीत सोनी आणि संगिता सुरज कंजर या चौघांना अटक करण्यात आली आहे. आरोपींवर एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम २०(ब)(ग्ग)(ण), २०(४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १३०/१७७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक सागर होस्टेजा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून, पुढील तपास स्थानिक पोलीस स्टेशनद्वारे केला जात आहे.


संग्रहित

# महागाईने घेतला उत्साहावर गदा; ग्रामीण भागात निराशेचं वातावरण

## -शेतकरी, मजुरांची दीपावली अंधारात; दरवाढीमुळे फराळालाही फोडणी

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळी म्हणजे प्रकाशाचा आणि आनंदाचा सण. पण यंदा ग्रामीण भागात महागाईच्या प्रखर झळांनी हा उत्सवच फिक्का झाला आहे. अतिवृष्टीमुळे आधीच आर्थिक तंगीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना आता वाढत्या दरांनी अधिकच घेरलं आहे.मान्सून नंतरच्या सततच्या पावसामुळे पीक नष्ट झालं, तर बाजारात किराणा माल, डाळी, खाद्यतेल, घरगुती गॅस, भाजीपाला अशा सर्व जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत.

तूर आणि मूगडाळ किलोमागे १२० रुपये, मसूर ९५, उडीद ११६, तर चणाडाळ ८० रुपये इतकी झाली आहे. खोबरे तीन महिन्यांत २३० वरून थेट ३८० रुपयांवर गेले आहे. शेंगदाणा तेल लिटरला २०० रुपये, सूर्यफूल तेल १६० आणि सोयाबीन तेल १३८ रुपये इतका भाव आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या दरांमुळे सामान्य माणसाच्या जगण्यावरच गदा आली आहे, असं स्थानिक किराणा व्यापारी अत्तार मतीन यांनी सांगितलं. वाढत्या खर्चामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबं या सणासुदीत कर्ज काढून दिवाळी साजरी करण्याच्या विवंचनेत आहेत.

सरकारी नोकरांना महागाई भत्ता मिळतो, पण हातावर पोट असणाऱ्या मजुरांना आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना मात्र या महागाईचं ओझं पेलणं कठीण झालं आहे. अशा परिस्थितीत, दीपावलीचा उत्साह हरवून सणाच्या आनंदावर महागाईचं विरजण पडलं असल्याचं चित्र ग्रामीण भागात दिसत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# राज्यभरातील शाळा पुन्हा सज्ज

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धा होणार; तिस-या टप्प्याची घोषणा




**चंद्रपूर / प्रतिनिधी-** राज्यातील शालेय शिक्षणात गुणवत्ता, नवचैतन्य आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा-३ या स्पर्धात्मक अभियानाची घोषणा करण्यात आली आहे. उशिरा का होईना राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भात अधिकृत शासन निर्णय जारी केला आहे. विशेष म्हणजे, पुढील वर्षात म्हणजे, फेब्रु वारी २०२६ मध्ये या स्पर्धेचा निकाल लागणार आहे.

गतवर्षी पहिल्या सत्रातच या स्पर्धेची घोषणा झाली होती. यंदा ऑक्टोबर आला तरी या स्पर्धेची घोषणा न झाल्याने ती बंद पडली की काय अशी शंका उपस्थित होत होती. या पार्श्वभूमीवर योजनेच्या तिस-या टप्प्याची घोषणा झाली आहे. हे अभियान राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व प्रकारच्या शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये नवनवीन उपक्रमांसह राबविण्यात येणार आहे. यापूर्वी या योजनेचे टप्पा-१ (२०२३-२४) आणि टप्पा-२ (२०२४-२५) हे दोन्ही टप्पे यशस्वी ठरले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून शाळांमध्ये लोकसहभाग वाढविण्यात आला होता.

पहिल्या टप्प्यात जवळपास २ कोटी विद्यार्थी सहभागी झाले होते. गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्ड मध्येही काही उपक्रमांची नोंद झाली होती. दुस-या टप्प्यात राज्यभरातील हजारो शाळांनी सहभाग नोंदवला होता. विजेत्या शाळांना रोख पारितोषिक देउन शाळांच्या गरजेनुसार त्याचा विनियोग करण्याची मुभा देण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण करणे, त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधणे आणि शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवून आणणे हा या स्पर्धेचा उद्धेश आहे.

***सहभागासाठी आवाहन***

राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे. यामुळे शाळांना केवळ आर्थिक लाभच नाही तर एक सकारात्मक शैक्षणिक वातावरण तयार करण्यासही मदत होणार आहे.

# 83 लाख शेतक-यांना सप्टेंबरच्या अतिवृष्टीचा तडाखा



पुणे /प्रतिनिधी- राज्यात सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे एकूण ६८ लाख १३ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यात सुमारे ७ लाख हेक्टर क्षेत्र शासन निर्णयानुसार विशेष बाब म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. या आपत्तीमुळे तब्बल ८३ लाख शेतक-यांना तडाखा बसला आहे. तर शेतक-यांना नुकसानभरपाई म्हणून ७ हजार ९८ कोटी रु पयांच्या निधीची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे.

राज्यात सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीचे नुकसान मोजण्यासाठी तब्बल १७ दिवसांचा कालावधी लागला आहे. महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाने केलेल्या पंचनाम्यानुसार ३४ जिल्ह्यांपैकी वर्धा, यवतमाळ, अमरावती, अहिल्यानगर, धुळे व नाशिक या सहा जिल्ह्यांमध्ये राज्य सरकारने जाहीर केलेल्या निकषांपूर्वीच पंचनामे पूर्ण करण्यात आले होते. त्यामुळे या सहा जिल्ह्यांमध्ये नव्याने पंचनामे पूर्ण करताना विशेष बाब म्हणून दोन हेक्टरची मर्यादा तीन हेक्टरवर करण्यात आली. त्यानुसार सुमारे ७ लाख २ हजार १९ हेक्टरचे क्षेत्र वाढले आहे.

राज्यात गुरु वारअखेर ६१ लाख ११ हजार २२३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले होते. आता त्यात या ७ लाख २ हजार १९ हेक्टरचे क्षेत्र अंतर्भूत करण्यात आल्यानंतर एकूण नुकसानीचे क्षेत्र ६८ लाख १३ हजार २४२ हेक्टर इतके झाले आहे. या नुकसानीमुळे राज्यातील ८३ लाख १२ हजार ९७० शेतक-यांना तडाखा बसला आहे. या पंचनाम्यांनुसार राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीअंतर्गत शेतक-यांना नुकसानभरपाई देण्यासाठी राज्य सरकारकडे ७ हजार ९८ कोटी ६८ लाख २१ हजार रु पयांची मागणी करण्यात आली आहे. आता राज्याचा मदत व पुनर्वसन विभाग यासंदर्भात शासन निर्णय जारी करून शेतक-यांना मदत थेट खात्यावर जमा करणार आहे.

एकूण बाधित क्षेत्र : ६८१३२४२
एकूण बाधित जिल्हे : ३४
एकूण बाधित शेतकरी : ८३१२९७०
नुकसान भरपाई : ७०९८ कोटी ६८ लाख २१ हजार.

# कमावत्या पत्नीला पोटगी देता येत नाही : हायकोर्ट




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** दाम्पत्याचा घटस्फोटाला मंजुरी मिळाल्यानंतर कायमस्वरुपी पोटगी ही सामाजिक न्याय साधण्याची तरतूद आहे; पण दोन सक्षम व्यक्तींच्या आर्थिक स्थितीला समृद्ध करण्यासाठी किंवा समान करण्यासाठी साधन म्हणून नाही, असे निरीक्षण नोंदवत जोडीदार आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण आणि स्वतंत्र असेल तर त्याला पोटगी देता येत नाही, असा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे.क्रूरतेच्या आधारावर महिलेला कायमस्वरूपी पोटगी नाकारण्याचा आणि तिच्या पतीला घटस्फोट देण्याचा कौटुंबिक न्यायालयाचा आदेश कायम ठेवताना न्यायाधीश अनिल क्षेत्रपाल आणि हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.२०१० मध्ये विवाह बंधनात अडकलेले दाम्पत्य केवळ १४ महिन्यांमध्येच विभक्त झाले. पती हा वकील होता तर पत्नी रेल्वेमधील अधिकारी होती. पत्नीने विवाह रद्द करण्यास सहमती देण्यासाठी आर्थिक समझोता म्हणून ५० लाखांची मागणी केल्याच्या तिच्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले होते. तसेच न्यायालयातही ५० लाख रु पये मिळण्याची मागणी केली. कौटुंबिक न्यायालयाने ते मान्य करण्यास नकार दिला. पोटगीला दिलेल्या नकाराच्या निकालाविरोधात पत्नीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.कायद्यानुसार पोटगी मागणा-या व्यक्तीने आर्थिक मदतीची खरी गरज असल्याचे दाखवणे आवश्यक आहे. अर्जदार आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि स्वतंत्र असल्यास हिंदू विवाह कायद्याच्या कलम २५ अंतर्गत न्यायालयीन विवेकाचा वापर पोटगी देण्यासाठी करता येत नाही. अपीलकर्त्याच्या आर्थिक कमकुवतपणाचे कोणतेही घटक नसतानाही अशा विवेकाचा वापर योग्य आणि विवेकपूर्ण पद्धतीने केला पाहिजे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# सत्ताधा-यांकडूनही बोगस मतदानाचे आरोप;

## भाजप आमदार मंदा म्हात्रे आक्रमक



**मुंबई / प्रतिनिधी-** काही दिवसांपूर्वीच महाविकास आघाडी आणि मनसे तसेच इतर विरोधी पक्षनेत्यांनी शिष्टमंडळ बनवून राज्य निवडणूक आयुक्तांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळाने दुबार आणि बोगस मतनोंदणीची तक्रार केली. विरोधकांनंतर आता सत्ताधा-यांमधूनही दुबार आणि बोगस मतदानाची तक्रार केली आहे. बेलापूरच्या भाजप आमदार मंदा म्हात्रे यांनीही या विषयावर आपली भूमिका मांडली आहे. बोगस मतदार ही लोकशाहीची थट्टा असून, निवडणूक यंत्रणा आणि प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे, असा गंभीर आरोप त्यांनी यावेळी केला आहे.भाजप आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, दरवेळी २० ते २२ हजार बोगस आणि दुबार नावांची यादी प्रशासनाला दिली, तरीही कारवाई शून्यच राहिली. यामुळे प्रामाणिक उमेदवारांना निवडणुकीत अन्याय सहन करावा लागतो, असे त्यांनी म्हटले आहे. आता थेट भाजप आमदारांनी बोगस मतदानाचा विषय काढल्याने चर्चांना उधाण आले आहे. आमदार म्हात्रे यांनी आपल्या निवडणूक लढवण्याच्या अनुभवाचा दाखला देत प्रशासनाच्या कारभारावर बोट ठेवले. मी २००४, २००९ आणि २०१४ या तीनही निवडणुकांमध्ये बेलापूरमधून लढले. प्रत्येक वेळी निवडणुकीपूर्वीच अधिका-यांकडे २० ते २२ हजार बोगस आणि दुबार नावांची यादी सर्वेक्षण करून सादर केली होती, पण त्यावर कधीच कारवाई झाली नाही. असे म्हणत त्यांनी आरोप केले. भाजप आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, अनेक वेळा जिल्हाधिकारी, निवडणूक अधिकारी यांना सांगूनही तीच नावे यादीत पुन्हा दिसतात. काही ठिकाणी अधिकारी या नावांच्या नोंदणीत सामील असतात आणि अनेकदा या व्यवहारात पैशांची देवाणघेवाणही होत असल्याचे दिसते, असे आरोप त्यांनी केले. बोगस मतदानामुळे प्रामाणिक उमेदवारांना मोठा फटका बसत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. या बोगस नावांमुळे सकाळच्या सत्रात मतदान होते आणि प्रामाणिक उमेदवारांना त्याचा फटका बसतो. अनेकदा मतदार सांगतात की, आमचे मतदान कोणीतरी आधीच करून गेले आहे, अशी परिस्थिती बदलण्याची गरज आहे. निवडणूक यंत्रणा पारदर्शक असायला हवी. देशात पंतप्रधान मोदी यांनी डिजिटल प्रणाली दिली आहे, त्यामुळे नावे तपासणे मोठी गोष्ट नाही. फक्त इच्छाशक्ती आणि प्रामाणिकपणा हवा, असे मत व्यक्त करत त्यांनी प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

# काशिमरप्रश्नी तिस-या देशाचा हस्तक्षेप नकोच : **रशिया**



**इस्लामाबाद/वृत्तसंस्था-** पाकिस्तानकडून वारंवार जम्मू काश्मीरचा मुद्दा उपस्थित करून कुरापत काढली जाते. अनेक देशांनी पाकिस्तानचा अपमान केला आहे. मात्र तरी देखील त्यांची ही सवय काही केल्या जात नाही. एका पाकिस्तानी न्यूज चॅनलवर बोलताना रशियाने पाकिस्तानला स्पष्टच सुनावले, काश्मीर मुद्द्यावर फक्त भारत आणि पाकिस्तान यांच्यातील द्विपक्षीय चर्चेच्या माध्यमातूनच तोडगा निघू शकतो, तिस-या कोणत्याही देशाने यामध्ये हस्तक्षेप करणं योग्य ठरणार नाही, असं रशियानं म्हटलं आहे.पाकिस्तानमधील रशियाचे राजदूत असलेले अल्बर्ट खोरेव यांना सहभागी केलं होतं, त्यावेळी त्यांना काश्मीरच्या मुद्द्यावर प्रश्न विचारण्यात आला, भारतानं घेतलेल्या भूमिकेमुळे काश्मीरचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे, भारताच्या भूमिकेमुळे काश्मीरचा मुद्दा हा अण्वस्त्र हल्ल्यांपर्यंत पोहोचू शकतो का? तुम्हाला काय वाटतं? असा प्रश्न या कार्यक्रमात रशियाच्या राजदूतांना विचारण्यात आला.या प्रश्नाला रशियाच्या राजदूतांनी रोख ठोक उत्तर देउन पाकिस्तानला त्यांची लायकी दाखवून दिली, मला वाटतं काश्मीरचा मुद्दा हा फक्त भारत आणि पाकिस्तान यांच्यातील द्विपक्षीय चर्चेद्वारेच सोडवला जाउ शकतो, या मुद्द्यावर तिस-या कोणत्याही देशानं हस्तक्षेप करू नये, भारतानं जी भूमिका मांडली तीच भूमिका आमची देखील आहे, असं रशियानं यावेळी म्हटलं आहे. भारतानं जम्मू काश्मीरबाबत यापूर्वीच आपली भूमिका जाहीर केली आहे, जम्मू काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, त्यावर कोणत्याच आंतरराष्ट्रीय मंचावर कधीच चर्चा होणार नाही, आता फक्त प्रश्न आहे तो पीओकेचा पाक व्याप्त काश्मीरचा तर त्यावर द्विपक्षीय चर्चा केली जाईल, मात्र त्यामध्ये तिस-या कोणत्याही देशाला हस्तक्षेप करता येणार नाही, अशी भारताची भूमिका आहे.

# *अंगणवाडीच्या खाऊमध्ये आढळला मेलेला उंदीर*



**गोंदिया/ प्रतिनिधी-** रायगड जिल्ह्यात जानेवारी महिन्यात अंगणवाडीच्या मुलांच्या खाउमध्ये मेलेला उंदीर आढळून आला होता. यानंतर आता गोंदियामधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांकरिता घरपोच वाटप होणा-या मल्टी मिक्स सिरीयल्स अण्ड प्रोटीन्स खाउच्या पॅकेटमध्ये मेलेला उंदीर आढळून आला आहे. या घटनेने जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेत कोणतीही जीवित हानी झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, गोंदिया जिल्ह्याच्या देवरी तालुक्यातील अतिदुर्गम भाग असलेल्या धवलखेडी येथे हा प्रकार उघडकीस आला आहे. या अंगणवाडीतून ६ महिने ते ३ वर्षे वयापर्यंतच्या लहान मुलांना प्रोटीन्सची पाकिटे पुरवली जातात. घरी गेल्यानंतर लाभार्थ्यांनी पाकीट उघडून बघितल्यावर ही बाब समोर आली. मात्र या घटनेनंतर स्थानिकांचा शासन-प्रशासनावर चांगलाच रोष बघायला मिळाला. घडलेल्या घटनेनंतर या संदर्भात आदिवासी नेते व सामाजिक कार्यकर्ते मधुकर दिहारी यांनी जर अशा पद्धतीने आदिवासींच्या जीवाशी खेळ करत असाल तर आंदोलन करू असा इशारा दिला आहे. या घटनेने परिसरातील पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सुदैवाने ही बाब पालकांच्या वेळीच लक्षात आल्याने या घटनेत कोणतीही जीवित हानी झालेली नाही.

# न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूलमध्ये दिवाळी सोहळा साजरा





**अमरावती /प्रतिनिधी-** स्थानिक बालाजी नगर मोती नगर वार्ड न्यू गोल्डन इंग्लिश स्कूल हायस्कूल व एनजी पब्लिक स्कूल तसेच साहिल प्राथमिक व माध्यमिक शाळा यांच्या संयुक्तविद्यमाने नव्या नवलाईने नटलेल्या अपूर्व दिवाळी सोहळ्याचे आगळे वेगळे आयोजन करण्यात आले. संस्थाध्यक्ष अनिल आसलकर तसेच संचालिका जयश्री आसलकर यांचे हस्ते लक्ष्मीपूजन तसेच दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरु वात करण्यात आली.

दिवाळीला आपण सणांचा राजा असे संबोधतो वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्थी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, दिवाळी पाडवा आणि भाउबीज अशा विविध नटलेल्या या दीपावलीचे महत्त्व आणि तो दिवस साजरा करण्यामागे असलेली आख्यायिका विद्यार्थ्यांना कळावी या सदहेतूने शाळेमध्ये अपूर्व दिवाळी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते . विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा याकरिता श्लोक नृत्य नाटिका अशा विविध कलाप्रदर्शनाकरिता यावेळी विद्यार्थ्यांना मंच उपलब्ध करून दिला गेला. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्वांना प्रसाद वितरित करण्यात आला.शाळेच्या संचालिका जयश्री अनिल आसलकर यांनी उपस्थित सर्वांना दिवाळीच्या मंगल शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाउ आणि मिठाई वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# धनंजय मुंडेंमुळे माझ्या आईची आत्महत्या-करुणा मुंडे



**मुंबई / प्रतिनिधी-** सराष्ट्रवादी काँग्रेसचे बीडमधील नेते आमदार धनंजय मुंडे यांच्याविरोधात त्यांच्या पत्नी करु णा मुंडे पुन्हा आक्रमक झाल्या आहेत. धनंजय मुंडेंच्या दबावामुळे आपल्या आईने आत्महत्या केली. तसे आपल्याकडे पुरावे आहेत, असा खळबळजनक दावा करु णा मुंडे यांनी केला आहे. तसेच मनोज जरांगे यांच्या भेटीवर भाष्य करताना, पुन्हा एकदा सर्व पुरावे घेउन भेटणार असल्याचे म्हटले आहे. याशिवाय धनंजय मुंडेंबरोबर मंत्री पंकजा मुंडेंवर देखील त्यांनी निशाणा साधला.करु णा मुंडे म्हणाल्या, धनंजय मुंडे यांनी अगोदर सांगितले होते की, अंगावर आले, तर शिंगावर घ्या, त्या अगोदर पंकजा मुंडे यांनी देखील कोयते घासून ठेवा, असे म्हटले होते . हे फक्त आपल्या समाजाच्या लोकांसाठी आहे. हे लोक स्वत: काही करत नाहीत. फक्त लोकांनी करायचं. मी अंगावर गेले होते, परळी विधानसभेमध्ये अर्ज देखील भरला होता. पण माझा अर्ज अवैध ठरवण्यात आला. अर्जाचा सूचक होता, त्याला उचलून नेले.दमदाटी केली. मी अंगावर आली होती, घ्यायचे होते शिंगावर, होउन जाउन द्यायचे होते, नवरा-बायकोमध्ये लढाई. पण तुम्ही तसे केले नाही.

# मुस्लीम कायद्यानुसार विधवेचा वारसा हक्क वैध-सुप्रीम कोर्ट



**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-** एखादी मालमत्ता विकण्याचा करार केल्याने तिचे मालकी हक्क हस्तांतरित होत नाहीत. मालमत्ता विक्रीचा करार म्हणजे मालकीहक्क नव्हे. त्यामुळे मृत व्यक्तीने मागे ठेवलेली सर्व संपत्ती ही मुस्लीम वारसाहक्क कायद्यानुसार विभागली जावी व त्याला मत्रु का संपत्ती मानले जावे, असा महत्त्वाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्या. संजय कर्ण व प्रशांत कुमार मिश्रा यांच्या पीठाने हा निर्णय दिला.

मुंबईत राहणा-या झोहरबी या महिलेचा पती चंद खान याचा मृत्यू झाला. दोघांना अपत्य नव्हते. त्यामुळे चंद खान याच्या पश्चातील संपत्तीत आपला तीन चतुर्थांश वाटा असल्याचा दावा झोहरबी यांनी केला. चंद खान याच्या पश्चातली संपत्ती ही मत्रु का संपत्ती असून मुस्लीम कायद्यानुसार ती विभागली जावी, असे त्यांचे म्हणणे होते. पण, चंद खान यांचा भाउ इमाम खान यांनी हा दावा फेटाळत चंद खान यांनी जिवंतपणीच काही मालमत्ता विक्रीकराराद्वारे इतरांना दिल्या होत्या. त्यामुळे झोहरबी यांना तो हक्क नसल्याचे म्हटले.

**अनुवादावर नाराजी**

अरबी शब्द मत्रु का व त्याला अनुसार माहिती याचा अनुवाद कनिष्ठ न्यायालयाने योग्य केला नव्हता, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. अरबी भाषेतील मत्रु का म्हणजे एका मृत व्यक्तीने मागे सोडलेली मालमत्ता असा त्याचा अर्थ आहे. तिचे विभाजन मुस्लीम वारसा कायद्यानुसार होते.

# 2,385 कोटी क्रिप्टोकरन्सी जप्त; मास्टरमाइंडला अटक

**मुंबई/नवी दिल्ली :** पाँझी स्किममार्फत भारतातील ग्राहकांना कोट्यवधी रु पयांचा चुना लावणा-या ऑक्टाएफएक्स या फ?रेक्स ट्रेडिंग प्लॅटफ?र्मवर ईडीने कारवाई करत २,३८५ कोटी रु .ची क्रिप्टोकरन्सी जप्त केली, तर स्पेनमध्ये या घोटाळ्याचा सूत्रधार पावेल प्रोझोरोव्ह याला अटक केली आहे. जुलै २२ ते एप्रिल २३ या काळात भारतीय ग्राहकांचे १,८७५ कोटी रु . डुबवले; ८०० कोटी रु . चा नफा कमावला. २०१९-२०२४ मध्ये कंपनीने केवळ भारतातून ५ हजार कोटी रु .चा नफा कमावला. ग्राहकांकडून यूपीआय व बँकांमार्फत पैसा घेतला जात होता. हा पैसा डमी अकाउंटमार्फत परदेशात गुंतवणूक म्हणून दाखवला जायचा. ऑक्टाएफएक्सची मार्केटिंग टीम ब्रिटिश व्हर्जिन बेटांवरून काम करते. स्पेनमधून सर्व्हर व बॅक ऑफिस ऑपरेशन चालतात. इस्टोनियातून पेमेंट गेटवे चालवला जातो. जॉर्जियातून तांत्रिक साहाय्य मिळते. भारतीयांचा पैसा सायप्रसमध्ये जमा केला जातो. दुबईतून काही भारतीय व्यवहार सांभाळले जातात. सिंगापूरमधून आयातीसंदर्भात बोगस सेवा दिली जाते. पावेल प्रोझोरोव्ह मास्टरमाइंड : पावेल हा स्पेन, इस्टोनिया, रशिया, हाँगकाँग, सिंगापूर, यूएई व युकेतून व्यवहार करायचा.

# आरबीआयचे गोल्ड रिझर्व्ह 102.36 अब्ज डॉलर्सवर!



**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-** सोन्याच्या वाढत्या दरांच्या काळात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं नवी माहिती जारी केली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडील गोल्ड रिझर्व्ह १०० अब्ज डालर्सच्या पार पोहोचलं आहे. १० ऑक्टोबरला संपलेल्या आठवड्यात देशाचं गोल्ड रिझर्व्ह ३.५९ अब्ज डालर्स वाढून १०२.३६ अब्ज डालर्सवर पोहोचलं आहे. हा सलग सातवा आठवडा आहे ज्यामध्ये भारताचं सुवर्ण भांडार वाढलं आहे. दुसरीकडे भारताचा विदेशी चलनाचा साठा कमी होत ६९७.७८ अब्ज डालर्सवर पोहोचला आहे.

आता एकूण गोल्ड रिझर्व्हमध्ये भारताचा वाटा १४.७ टक्के आहे. जो १९९० च्या दशकानंतरचा सर्वाधिक आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं जानेवारी ते सप्टेंबर दरम्यान ४ टन सोन्याची खरेदी केली होती. जेव्हा २०२४-२५ मध्ये आरबीआयनं ५७.५ टन सोनं खरेदी केलं होतं. २०२५ मध्ये जानेवारी ते सप्टेंबर दरम्यान पहिल्या चार महिन्यात आरबीआयने सोने खरेदी केली होती.

जागतिक सुवर्ण परिषदेत भारताच्या संशोधन हेड कविता चाको यांनी म्हटलं की, भारताच्या विदेशी चलन भांडारात सोन्याचा वाटा वाढला आहे. सोन्याचा वाढत्या किंमतीमुळं मुल्यांकन वाढल्यानं हे झालं आहे. या तेजीमुळं जागतिक आर्थिक अनिश्चिततांमध्ये रिझर्व्हमध्ये वेगवेगळ्या वस्तूंची वाढ होण्यासंदर्भात जागतिक संकेत बदलले आहेत. जगातील काही सेंट्रल बँक डालरचा साठा वाढवण्याऐवजी सोन्याच्या खरेदीला प्राधान्य दिलं आहे. भू-राजनैतिक जोखमीच्या काळात डालरवरील अवलंबित्व कमी करणं आहे. पोलंड, उझबेकिस्तान आणि तुर्की या देशांनी सोन्याची खरेदी केली आहे.

**विदेशी चलन साठ्यात घट**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं जारी केलेल्या आकडेवारीनुसार, १० ऑक्टोबरला संपलेल्या आठवड्यात भारताचा विदेशी चलनाचा साठा २.१७६ अब्ज डालर्सनं कमी होउन ६९७.७८४ अब्ज डालर्स झाला आहे. सलग दुस-या आठवड्यात विदेशी चलनाचा साठा कमी झाला आहे. यापूर्वीच्या आठवड्यात २७.६ कोटी डालर्सनं परकीय चलन कमी होउन ६९९.९६ अब्ज डालर्सवर आलं होतं. आरबीआयच्या डेटानुसार विदेशी चलनाचा सर्वात मोठा घटक एफसीए ५.६० अब्ज डालर्सच्या घसरणीसह ५७२.१० अब्ज डालर्स राहिला आहे. आरबीआयची आकडेवारी रिझर्व्हमधील यूरो, पाउंड आणि येन सारख्या चलनांच्या मूल्यांकनातील वाढ आणि घसरण दाखवते.

# एमआयटी-सीओईपीत सामंजस्य करार



**पुणे/प्रतिनिधी-**एमआयटी आर्ट, डिझाईन आणि-टेक्नालाजी विद्यापीठ, पुणे आणि कालेज ऑफ इंजिनीअरिंग (सीओईपी) तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे यांच्यात शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे.या करारामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रकल्प, इंटर्नशिप तसेच भविष्यातील नवीन प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळणार आहे. या करारामुळे विद्यार्थी, प्राध्यापक तसेच दोन्ही संस्थांमधील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होणार आहेत.एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे प्र-कुलपती तथा कार्याध्यक्ष प्रा मंगेश कराड आणि कार्यकारी संचालक प्रा. सुनीता कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात या करारावर स्वाक्ष-या करण्यात आल्या. या प्रसंगी एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. राजेश एस., प्रा. वीरेंद्र शेटे (संचालक एनईपी, रँकिंग व मान्यता), कुलसचिव महेश चोपडे, आणि परीक्षा नियंत्रक प्रा. ज्ञानदेव निलवर्ण उपस्थित होते. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठकडून कुलगुरू प्रा. एस. बी. भिरूड, कुलसचिव डी. एन. सोनवणे यांच्या उपस्थितीत हा करार पार पडला.या कराराचा उद्धेश शैक्षणिक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन प्रकल्प, माध्यमातून दोन्ही प्रतिष्ठित संस्थांमधील सहकार्य वृद्धिंगत करणे हा आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विविध शाखांतील विद्यार्थ्यांची देवाणघेवाण, संसाधन वाटप आणि दोन्ही संस्थांच्या समन्वयातून संशोधनास चालना मिळून विद्यार्थी व संशोधकांना आंतरविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि नावीन्यपूर्ण प्रकल्पांमध्ये अधिक संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## निर्यातीला फटका

कोणतीही गोष्ट वारंवार सांगितली,तर ती खरी वाटू लागते, यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा ठाम विश्वास असावा. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध मी थांबवले, असे धादांत असत्य कथन ते पुन्हा पुन्हा करत असतात. एवढेच नव्हे, तर जगातील इतर अनेक युद्धे मीच समाप्त केली, असाही दावा ते करत असतात. आता भारत रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवेल, असे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे; मात्र ट्रम्प आणि मोदी यांच्यात कोणताही संवाद झाला नसल्याचा खुलासा भारताने लागलीच केला.ऊर्जा स्त्रोतांचा विस्तार करणे आणि बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी योग्य ते विविधीकरण करण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी तेल खरेदीचे अन्य पर्याय उपलब्ध असल्याचे भारताने स्पष्ट केले आहे. सामान्यतः दोन देशांतील राष्ट्रप्रमुख परस्परांमधील औपचारिक चर्चेचा तपशील देताना त्यात अचूकता आणि सत्यता असेल, याची खबरदारी घेतात; परंतु मोदी हे आपले जवळचे मित्र असल्याचे ट्रम्प यांनी अनेकदा म्हटले आहे आणि त्याचवेळी त्यांच्या नावाने खोट्या बाबीही जाहीर केल्या आहेत. खरे तर, आज भारताची आर्थिक व सामरिक शक्ती वाढली आहे. अशावेळी भारताबद्दल चुकीच्या गोष्टी पसरवणे, मोदी यांच्या नावाने बोगस दावे करणे, हे ट्रम्प यांनी टाळायला हवे.?'भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याबद्दल अमेरिका खूश नाही. यामुळे युक्रेन युद्धात रशियाला आर्थिक मदत झाली.या युद्धात चार वर्षांत दीड लाख नागरिक मारले गेले?',असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. वास्तविक कोणत्या देशातून कोणती वस्तू घ्यायची,याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्या त्या देशांना असते. ज्या देशातून तेल स्वस्त मिळेल, तिथून ते घेण्याचा भारताला संपूर्ण अधिकार आहे. तसेच भारताने रशियाकडून तेल घेतल्यामुळे त्या पैशाचा उपयोग करून रशिया शस्त्रास्त्रे घेऊन युक्रेनींची कत्तल करतो, हा युक्तिवाद अजबच आहे. तो खरा मानायचा, तर अमेरिकेच्या लष्करी मदतीचा दुरुपयोग करून पाकिस्तान भारतात दहशतवादी कृत्ये करते, असे म्हणावे लागेल. अशावेळी भारताने अमेरिकेवर बहिष्कार टाकायचा का? अमेरिकेने जगात ठिकठिकाणी हस्तक्षेप केला आहे. अशावेळी जगाने अमेरिकेवर बहिष्कार टाकल्यास, ते चालेल का? परंतु, महासत्ता असल्यामुळे आपल्याला सर्व माफ आहे, असे अमेरिकेला वाटत असेल; मात्र भारत तेल आणि नैसर्गिक वायूचा एक महत्त्वाचा आयातदार आहे.अस्थिर ऊर्जा परिस्थितीत भारतीय ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे यालाच सरकारचे प्राधान्य राहिले आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटले आहे. एकाच ठिकाणाहून तेल खरेदी करण्याऐवजी ती वेगवेगळ्या देशांमधून करणे हे अधिक फायद्याचे असते. युक्रेन युद्धास आरंभ झाल्यानंतर तेल निर्यातदार देशांनी युरोपीय देशांना पुरवठा करण्याकडे रोख वळवला. अशावेळी भारताने तुलनेने स्वस्त रशियन तेल विकत घेण्यास सुरुवात केली. रशियावर आर्थिक बंधने लादली असूनही युरोपीय महासंघाने रशियाशी २०२३ मध्ये १७ अब्ज युरोंचा व २०२४ मध्ये ६७ अब्ज युरोंचा व्यापार केला. एवढेच नव्हे, तर रशियाकडून अमेरिकाही युरेनियम, खते, रसायने खरेदी करते. मग, ते कसे चालते, असा सवाल पत्रकार परिषदेत विचारण्यात आल्यावर ?'मला त्याची माहिती नाही, मला ते तपासून पाहावे लागेल?',अशी उडवाउडवीची उत्तरे ट्रम्प यांनी दिली होती.भारत हाही बाझील, रशिया, चीन व दक्षिण आफ्रिकेप्रमाणे ?'बिक्स?'चा संस्थापक देश आहे. बिक्सचा आर्थिक प्रभाव वाढत असून, बिक्ससाठी डॉलरला पर्यायी असे आंतरराष्ट्रीय चलन असावे, अशी कल्पना रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी मांडली आहे. तसे घडल्यास भविष्यात जगावरील अमेरिकेचे वर्चस्व कमी होईल. डॉलरला पर्यायी चलन खपवून घेणार नाही, अशी दमबाजी ट्रम्प यांनी यापूर्वीच केली आहे. या पार्श्वभूमीवर बाझीलप्रमाणेच भारतावरही अमेरिकेने जादा कर लावले. २०२४-२५ मध्ये भारताने रशियाकडून एकूण आयातीच्या ३६ टक्के, म्हणजे ८७ दशलक्ष टन तेल आयात केले. जून २०२४ मध्ये तर हे प्रमाण ४३ टक्क्यांवर गेले. भारत इराक, सौदी अरेबिया व संयुक्त अरब अमिरातीकडून तेल खरेदी करतो.चीनही रशियाकडून बरेच तेल विकत घेतो. मे महिन्यानंतर भारताने रशियाकडून प्रतिदिन १.९६ दशलक्ष बॅरल अशी विक्रमी आयात केली. एकूण आयातीच्या ६ टक्के कोळसाही भारत रशियाकडून घेत असतो. रशियन तेलामुळे एका वर्षात भारताने २२ हजार कोटी रुपयांची बचत केल्याचे एका अहवालात म्हटले आहे. २०२१-२२ मध्ये भारत केवळ २.१ टक्के तेल रशियाकडून घेत होता. त्याचे प्रमाण आपण कित्येक पट वाढवत नेले. रशिया व अन्य वेगवेगळ्या देशांतून तेल खरेदी करून, आयात तेलाची 'वेटेड ॲव्हरेज कॉस्ट' बॅरलला किमान दोन डॉलरने कमी करण्यात भारत यशस्वी झाला आहे.भारत कदाचित रशियाकडून केल्या जाणाऱ्या तेल खरेदीत तत्काळ कपात करू शकणार नाही; मात्र ही प्रक्रिया सुरू झालेली आहे, असे वक्तव्य करून ट्रम्प यांनी किंचित सौम्य भूमिकाही घेतली आहे. अमेरिकेने ५० टक्के शुल्क लावूनही आजवर भारत अमेरिकेच्या दबावाखाली आलेला नाही. सप्टेंबर महिन्यातही भारताने रशियाकडून प्रतिदिन १६ लाख बॅरल्स तेलाची आयात केली. १० ऑक्टोबरला तर हे प्रमाण १८ लाख बॅरल्सवर जाऊन पोहोचले; मात्र त्याचवेळी भारत अमेरिकेस करत असलेल्या निर्यातीत १२ टक्के घट झाली आहे. अशावेळी रशियाकडून तेल खरेदी करण्यात होणारी बचत आणि अमेरिकेने लादलेल्या करांमुळे निर्यातीला बसलेला फटका यांचा तुलनात्मक अभ्यास करून भारताने आपले तेल खरेदीचे धोरण सुनिश्चित केले पाहिजे. शेवटी भारत अमेरिकेकडूनही तेल खरेदी वाढवू शकतो. भावनिक विचार न करता आर्थिक हिताला प्राधान्य देऊनच भारताने तेल खरेदीबाबतचे धोरण ठरवले पाहिजे.

# पुन्हा एकदा बिहार !

'मत चोरी'च्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा बिहार विधानसभेची निवडणूक होत होत आहे. खरे तर, बिहार विधानसभा निवडणुकीतच नाही तर उत्तर भारतातील अनेक राज्यातील मतदानात होणारे गैरप्रकार तसे काही नवीन नाहीत. माझ्या पिढीने बिहारात एक गठ्ठा मतदान कसे होते , हे अनुभवलेले आहे. प्रश्न इतकाच आहे की त्यावेळी असलेल्या विरोधी पक्षांना राहुल गांधी यांच्या इतक्या सशक्तपणे मतचोरीचे हे प्रकार उघड करता आले नव्हते कारण ती त्या सर्व पक्षांची गरज होती. यासंदर्भात एका निवडणूक दौऱ्यात ऐकलेला एक किस्सा असा- तो किस्सा असल्यामुळे असल्यामुळे त्यात सांगोवांगी बरीच असणार हे खरच आहे तरीही, बिहारमध्ये मतदान कसे होत असे यावर त्यातून प्रकाश पडतो. एक वृद्ध गृहस्थ त्याचे मतदान आटोपल्यावर मतदान केंद्राच्या प्रमुखाकडे जातो आणि विचारतो, 'माझी पत्नी मतदानाला येऊन गेली का ?' रेकॉर्ड बघून तो अधिकारी सांगतो की त्याची पत्नी सकाळीच येऊन मतदान करुन गेली. त्यावर तो वृद्ध हळहळतो आणि म्हणतो, 'याही वेळेस आमची हुकली...' त्यावर तो अधिकारी त्याला विचारतो की तुम्ही एकत्र राहत नाही का ? तेव्हा तो वृद्ध सांगतो की, त्याच्या पत्नीचे निधन होऊन अनेक वर्ष झाली आहेत पण, ती न चुकता मतदान प्रत्येक निवडणुकीत करते आणि ती मतदान करुन बाहेर गेल्यावरच मी नेमका येतो. त्यामुळे आमची भेट होत नाही.

बिहारच्या विधानसभा निवडणुकीत नेहमीप्रमाणे अनेकांचे भवितव्य पणाला लागलेले आहे. त्यात सर्वात वरचा नंबर नितीशकुमार यांचा आहे. सतत राजकीय तळ्यात करुन (खरे सांगायचे तर, कोलांट उड्या मारुन!) गेली सलग वीस वर्ष नितीश कुमार मुख्यमंत्रीपदी ठिय्या मारुन आहेत. यावेळेसही ते मुख्यमंत्रीपद टिकवू शकतात का नाही, हा एक उत्सुकतेचा मुद्दा आहे. या २० वर्षात जास्त काळ नितीश कुमार भाजपसोबत राहिले आणि याच काळात भाजपची विधानसभेतील सदस्य संख्या वाढत गेली तर नितीश कुमार यांच्या जनता दल सेक्युलरची सदस्य संख्या कमी होत गेली हे उल्लेखनीय आहे. भाजप पहिल्यांदा अस्तित्व राखण्यासाठी लढतो मग कोणाला तरी पाडण्यासाठी लढतो आणि मग जिंकण्यासाठी लढतो असे जे म्हटले जाते ते बिहारमध्येही लागू आहे. पाहता पाहता जनता दल जनता दलाच्या विविध गटांचे बिहारवरील वर्चस्व मोडून काढत भारतीय जनता पक्ष आता किमान १०० जागा मिळवण्याची अशा बाळगून आहे ( पण, ते फारच कठीण दिसते आहे कारण त्यासाठी भाजपला विजयाचा स्ट्राईक ९८ टक्क्यांपेक्षा पेक्षा जास्त ठेवावा लागेल). गेल्या निवडणुकीत भाजपाला जास्त आणि जनता दल सेक्युरला कमी जागा मिळाल्या तरी मुख्यमंत्री पद नितीशकुमार यांच्याकडेच ठेवण्यात आले. याही निवडणुकीत भाजप-जनता दल आघाडी सत्तेत आली तर नितीशकुमार मुख्यमंत्रीपदी राहतील किंवा नाही याबद्दल आज तरी निश्चित काही सांगता येत नाही. खरे तर, जागा वाटपावरुन भाजप आणि नितीश कुमार हे दोघेही नाराज आहेत पण, त्या दोघांनाही आत्ताच्या परिस्थितीत एकत्र राहणे भाग आहे. राजकारणात अगतिकता म्हणून एकत्र राहण्याची वेळ येते तेव्हा स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी एकच राहिलेले दोन्ही पक्ष परस्परांच्या जागा पाडण्यासाठी शांतपणे प्रयत्न करत असतात, असा आजवरचा अनुभव आहे. तसंच यावेळेस बिहारमध्ये घडले तर राष्ट्रीय जनता दल म्हणजे, तेजस्वी यादव यांचा सत्तेत येण्याचा म्हणजे, मुख्यमंत्री होण्याचा मार्ग प्रशस्त होणार आहे. याचा एक अर्थ राष्ट्रीय जनता दलाच्या तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री करण्यात भारतीय जनता पक्ष आणि जनता दल सेक्युलर यांच्यातील बेदिलीही कारणीभूत आहे असा काढावा लागेल पण, तसा अर्थ काढण्यासाठी निवडणुकीच्या निकालाची वाट पहावी लागणार आहे .

**बिहारमधल्या एकूण मतदारांपैकी महिलांची संख्या जवळजवळ ४५ टक्के आहे. म्हणजे बिहारमधल्या बहिणींनी भाजप आणि जनता दल सेक्युलरच्या बाजूने मतदान केले तर नितीश कुमार यांचे पुन्हा मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकते.**





भाजप आणि जनता दल सेक्युलर सत्ता राखण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करणार हे उघड आहे. म्हणूनच दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही बिहारच्या विधानसभा निवडणुकीत लक्ष घातलेले आहे आणि त्यात आश्चर्य कांहीच नाही कारण निवडणुका 'खेळणे' हा मोदी यांचा आवडता खेळ आहे ! महाराष्ट्रात क्लिक झालेली लाडकी बहीण योजना नरेंद्र मोदी यांनी बिहारमध्येही जाहीर केली आहे; नुसती जाहीर केली नाही तर नितीशकुमार यांनी मुख्यमंत्री म्हणून त्यात जातीने लक्ष घालून आतापर्यंत चाळीस हजार कोटी रुपये रुपयांचे वाटपही केलेले आहे. भारतीय जनता पक्षांने महाराष्ट्र आणि बिहार राज्यातील बहिणीत बराच मोठा भेदभाव केलेला आहे. महाराष्ट्रात प्रत्येक बहिणीला दरमहा पंधराशे रुपये विधानसभा निवडणुकी आधी वाटले गेले आणि सत्तेत आलो तर ही रक्कम २१०० रुपये करण्याचे आश्वासन महाराष्ट्रातल्या बहिणींना भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी या आघाडीने दिले होते. आता सत्तेत येऊन दहा महिने झाले तरी १५०० चे २११ काही झालेले नाहीत उलट वेगवेगळे निकष लावून लाडक्या बहिणींची संख्या कमीच करण्यात आली आहे. महाराष्ट्रातल्या बहिणींना पंधराशे रुपये आणि बिहार मधील बहिणींना दरमहा दहा हजार रुपये असा हा भेदभाव आहे ! महत्त्वाचे म्हणजे बिहारमधल्या एकूण मतदारांपैकी महिलांची संख्या जवळजवळ ४५ टक्के आहे. म्हणजे बिहार मधल्या बहिणींनी जर भाजप आणि जनता दल सेक्युलरच्या बाजूने मतदान केले तर नितीश कुमार यांचा पुन्हा मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकते.बिहारी बहिणी महाराष्ट्रातील बहिणी प्रमाणेच दहा हजार रुपयांच्या आमिषाला बळी पडतात का का, हे अर्थातच निवडणुकीच्या निकालानंतर स्पष्ट होणार आहे. याशिवाय बिहारमध्ये जातनिहाय जनगणना करण्याचे कार्ड हुकमाचा एक्का म्हणून नितीशकुमार यांनी वापरले आहे. नितीश कुमार यांच्या या निर्णयाला केंद्रातल्या भाजप सरकारनंही पाठिंबा दिलेला आहे. बहिणी आणि जातीनिहाय जनगणनेच कार्ड खेळून भाजप आणि जनता दल सेक्युलर म्हणजेच म्हणजेच नरेंद्र मोदी आणि नितेश कुमार यांनी ही निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची केलेली आहे.

भाजप आणि जनता दल सेक्युलर यांच्या यशात अन्य घटकही महत्त्वाचे आहेत. अर्थातच पहिला घटक जातीचा आहे. दुसरा म्हणजे जतिराम मांझी, उपेंद्र कछवाह आणि चिराग पासवान या नेत्यांच्या छोट्या पक्षांचीही साथ मनापासून मिळते का नाही, यावर भाजपा जनता दल सेक्युलरची सत्ता पुन्हा येणे अवलंबून आहे. मिळालेल्या जागांवर हे तिन्ही नेते मुळीच खूष नाहीयेत आणि त्यांनी ही नाराजी लपवूनही ठेवलेली नाहीये. ही नाराजी भाजप-जनता दलाच्या विरोधात जाईल का हाही एक मुद्दा आहे.

निवडणूक तज्ज्ञ म्हणून ओळखले जाणारे प्रशांत किशोर यांचा जनसुराज्य पक्ष, कशी आणि किती मते खातो यावरही सत्तेसाठी दावा करणाऱ्या तेजस्वी यादव आणि नितीशकुमार यांचे राजकीय भवितव्य अवलंबून आहे. विधान सभेच्या निवडणुका जाहीर होईपर्यंत प्रशांत किशोर निवडणूक लढवतील असे वातावरण होते. निवडणूक लढवण्यातला त्यांचा अनुभव आणि 'लौकिक' लक्षात घेता त्यांच्या जनस्वराज पक्षाला तिसरा पर्याय म्हणून मानलंही जात होते पण, ऐन वेळेवर निवडणुका न लढवण्याचा निर्णय प्रशांत किशोर यांनी घेतला आहे. त्यामुळे त्यांची मते कोणाकडे वळणार यावरही आगामी मुख्यमंत्री कोणत्या आघाडीचा होणार हे अवलंबून आहे. प्रशांत किशोर यांची ताकद किती आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही आणि आता ते निवडणूक लढवणारच नसल्यामुळे ते निवडणूक लढवणार नसल्यामुळे तर त्यांची ताकद ही एक बंद मूठ राहणार आहे.

भारतीय जनता पक्ष आणि जनता दल सेक्युलर यांच्या विरोधात लालूप्रसाद यादव यांचा राष्ट्रीय जनता दल कॉंग्रेस सर्व डावे 'महागठबंधन' म्हणून एकत्रितपणे उभे ठाकलेले आहेत की नाहीत हे अद्याप स्पष्ट होत नाहीये. राहुल गांधी यांनी मत चोरीच्या मुद्द्यावरुन बिहारमध्ये बरंच रान उठवलेले आहे. त्यांनी जी मतदार सुरक्षा यात्रा मत चोरीच्या मुद्द्यावर बिहारमध्ये काढली त्या यात्रेला फार चांगला प्रतिसाद मिळाला. आता तो प्रतिसाद पाठिंब्यामध्ये कसा परावर्तित करुन घेतला जातो हे पाहणे उत्सुकतेचे आहे. राहुल गांधी यांच्या यात्रेला मिळालेल्या प्रतिसादामुळे स्वबळावर लढण्याचा बिहारमधल्या कांही कॉंग्रेस नेत्यांचा आग्रह आहे. चाळीसच्या आसपास जागी विजय मिळवता आला तर येणारे सरकार स्थापन करण्यात निर्णायक भूमिकेत कॉंग्रेस असेल आणि कॉंग्रेसला संजीवनी देणारे ठरेल असे या गटाला वाटते. माध्यमांचा लाडका एक महत्त्वाचा गडी कन्हैया कुमार आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत कन्हैयाकुमारची खूप हवा झाली होती मात्र, त्याला निवडणुकीत काही यश मिळू शकलो नाही. त्यानंतर कन्हैयाकुमारने कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. उत्तर भारतात सर्वपरिचित असलेल्या जातीचा आधार घेत, कन्हैयाकुमार ही बिहारमध्ये ताकद आहे असे लोकसभा निवडणुकीच्या वेळी बोलले जात होते. ती ताकद आता कन्हैया कुमार याला दाखवून द्यावी लागणार आहे.

बिहार मधल्या मित्रांनी दिलेल्या आणि वेगवेगळ्या निवडणूकपूर्व पाहण्यातून जी माहिती समोर येत आहे त्यानुसार, मुख्यमंत्रीपदासाठी सध्या तरी लालू यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव आघाडीवर आहेत. राष्ट्रीय जनता दलाकडून लढण्यासाठी इच्छुक असणारांची संख्या मोठी आहे. इच्छुकांच्या या गर्दीमुळे लालूप्रसाद यादव यांचे निवासस्थान अक्षरशः ओसंडून वाहत आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत सारी सूत्र तेजस्वी यादव यांनी हलवली होती. विधानसभेच्या २४३ पैकी ७५ जागा मिळवून राष्ट्रीय जनता दलाला पहिल्या क्रमांकावर पोहोचता आले ते तेजस्वी यादव यांच्यामुळेच या तरुण राजकारण्यात बिहारची जनता लालूप्रसाद यादव यांना बघते. शिवाय ज्या आक्रमक पद्धतीने तेजस्वी यादव बिहार राज्यात समोर आले त्यामुळे तरुण वर्गातही त्यांची चाहत मोठी आहे. त्यांनी बेरोजगारीचा मुद्दा लावून ठेवत तरुणांना आकर्षित केलेले आहे . नेहमीप्रमाणे बिहारमधले जातीचे राजकारण लक्षात घेतले तर, यादव समाज आणि मुस्लीम राष्ट्रीय जनता दलासोबत आहेच त्यांच्यासोबत तेजस्वी यादव यांचे पारडे सध्या जड दिसत आहे. शिवाय सत्ताधारी पक्षाच्या विरोधात असणारी नाराजी चांगल्यापैकी जाणवत आहे, कॉंग्रेसही बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलासोबत राहिली तर मोठा फरक पडेल. प्रत्येक मतदारसंघात कॉंग्रेसच कमी अधिक प्रमाणात का असेना अस्तित्व आहे गेल्या निवडणुकीत कॉंग्रेस चे १९ उमेदवार विजयी झाले होते आणि ३० उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर होते हे लक्षात घेता राष्ट्रीय जनता दल आणि कॉंग्रेसचे महागठबंधन यशाची आशा बाळगून आहे.

या दोन दिवसात उमेदवार अंतिम होतील आणि या आठवडाअखेर बिहार विधानसभा निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल. दिवाळीच्या चार-पाच दिवसात मोर्चे बांधणी पक्की होऊन आणि दिवाळी नंतर प्रचाराचा बार उडेल. निकाल लागेपर्यंत बिहारमध्ये काय होणार ही चर्चा नेहेमीप्रमाणे रंगत राहील.

**प्रवीण बर्दापूरकर**
भ्रमणध्वनी – ९८२२०५५७९९

# निवडणुकांचे बदललेले घातक रूप

लोकशाहीत निवडणुकीला खूप महत्त्व आहे. निवडणुकीमुळेच सक्षम सत्ताधारी व विरोधक मिळतात. देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाले त्यापैकी जवळजवळ ७० वर्षे एकाच पक्षाची सत्ता असल्याने हम करे सो कायदा हीच मानसिकता सर्वांवर लादली गेली. त्या नंतर आलेल्या सरकार ने देशाला प्रगतीपथावर नेण्याचे ध्येय ठेवून निवडणूक घेतल्या परिणामी गेल्या काही वर्षात अनेक वर्षे सत्तेत राहिल्या नंतर त्या पक्षाला निवडणुकीत मिळालेल्या अपयशामुळे ते सैरभैर झाले आहेत त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत विकासाचा मुद्दा दूर करून आरोप प्रत्यारोप, लांगूनचालन, दंगली घडवणे,आतंकवादी हल्ले, हिंसा,आंदोलने, मतचोरी, ई व्ही



एम मशीन या गोष्टींवर प्राधान्य दिले जात आहे. आताची निवडणूक एक वेगळ्या मुद्द्यावर होण्याची शक्यता आहे ती म्हणजे तथाकथित प्राणी प्रेमी मग ते भटके कुत्रे असोत, आक्रमक हत्ती किंवा कबुतरे असोत त्यांच्या रक्षणासाठी राजकीय पक्ष स्थापन केले जात आहे.

दादरच्या कबूतरखाना विरुद्ध न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध जैन समाज आक्रमक होऊन मुंबई महानगरपालिका निवडणुकीत एक स्वतंत्र पक्ष म्हणून निवडणूक लढण्याचे जाहीर केले आहे. हे जाहीर करत असतांना त्यांची भाषा ऐकून शांतिप्रिय असलेला जैन समाज कोणत्या दिशेला जात आहे हे न समजण्यासारखे आहे. माणसांपेक्षा प्राणी महत्त्वाचे आहेत असे काही लोकांना वाटते आणि त्याप्रमाणे ते त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न करतात. सत्ये शिवाय हे शक्य नसल्याने सत्ता पालट करण्यासाठी रोज नव नवीन पक्ष निर्माण होत आहे. निवडणूक आयोगाने अशा राजकीय पक्षांनी ध्येयधोरणे, त्यांचे आर्थिक व्यवहार तपासून त्यांना मान्यता देणे गरजेचे आहे. मान्यता मिळाल्यानंतर आपल्या जाहीरनाम्याप्रमाणे ते काम करत आहे की नाही हे पाहणे देखील निवडणूक आयोगाने केले आहे. काही राज्यातील विधानसभा निवडणूकीत भाषिक राजकारणाचा देखील वापर होत असल्याचे दिसून आले आहे. या सर्वातून एकच दिसून येते ते म्हणजे पैसा आणि सत्ता ही आपल्याकडे असावी असे वाटते. विकासाचा मुद्दा हा गौण ठरत आहे. खरंतर देश विकसित झाला तरच तो सुजलाम सुफलाम होऊ शकतो.

सर्वांचे आर्थिक पाठबळ पण वाढू शकते. देशाला सुजलाम सुफलाम न बनवता देशाला गुलामगिरीत परत कसे ढकलता येईल हेच आता वेगवेगळ्या निवडणुकीतून पाहायला मिळते. उमेदवार देताना त्याचे चारित्र्य, समाजासाठी केलेले कार्य न बघता कोणालाही अगदी गुन्हेगाराला देखील तिकीट दिले जाते. तो गुन्हेगार कारागृहातून निवडणूक लढवून जिंकतो हे अतिशय दुर्दैवी आहे. सर्व पक्षांच्या या ध्येयधोरणांमुळे सामान्य मतदार निवडणुकीत असमाधानी असून तो निवडणुकीत सहभागी होत नाही. निवडणुकीच्या निमित्ताने मिळणारी सुट्टी ही अन्य कारणासाठी किंवा मौजमजा करण्यासाठी वापरली जाते. मतदान करायला खूप कमी लोक स्वतःहून येतात. जे येत नाही त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवली जातात किंवा एकाच व्यक्तीचे दोन, तीन किंवा त्यापेक्षाही जास्त मतदान केंद्रात नाव असल्याने ते त्या त्या ठिकाणी जाऊन मतदान करतात. लोकशाही ला हे किती घातक आहे ह्या विचार करण्याची गरज आहे.

**लीना गाडगीळ**

## हलाल मुक्त दिवाळी

दिवाळी आली की उत्साह आला, आनंद आला. दिवाळीचे दिवस म्हणजे नातेवाईकांच्या भेटी, भेटवस्तूंची देवाणघेवाण, मुलांसाठी फटाके आणि नवीन कपडे, दारात रांगोळया, आकाशकंदील आणि पणत्यांची सुरेख आरास ! हे आपण दरवर्षी करतोच. अलीकडच्या धकाधकीच्या जीवनात बरेचदा या सणाचा आनंद आपण एखाद्या पर्यटनस्थळी जाऊनही घेतो आणि नवा उत्साह मनात साठवून परत येतो. अशा प्रकारचा दिवाळी चा उत्साह सर्वांकडे बघायला मिळतो,पण एक आवाहन वारंवार वाचण्यात येत आहे ते म्हणजे 'हलाल मुक्त दिवाळी'.




सध्या 'हलाल व्यवसाय' हा जगभरात अस्तित्त्वात आहे. हलाल म्हणजे काय? तर जे इस्लाम ला मान्य आहे ते हलाल. पूर्वी हलाल केवळ मांसाहारापुरताच मर्यादित होता. आता मात्र हलाल व्यवसायात अनेक वस्तू आणि सेवांचा समावेश आहे. ज्यात अन्न, औषधे, सौंदर्य प्रसाधने, कपडे, पर्यटन सेवा, अकाउंटिंग, बँकिंग सेवा, वित्तीय सेवा, वसाहती, दवाखाने यांसारख्या अनेक गोष्टींचा समावेश आहे. पूर्वी मांसापुरती असणारी 'हलाल'ची संकल्पना शाकाहारी पदार्थ, तेल, चॉकलेट, चिप्स, रेस्टॉरंट आदींपर्यंत पोचली आहे. 'हलाल सौंदर्यप्रसाधनां'पासून 'हलाल तुलसी अर्क', 'हलाल टाऊनशिप', तसेच 'हलाल टुरिझम'पर्यंत हे वाढत आहे.

'हलाल'चा म्हणजे इस्लाम ला मान्य असे असतांना भारतासारख्या लोकशाहीच्या देशात मुस्लिमेतर समाजावर या खाजगी धोरणाची सक्ती का?भारतात fssai हे सरकार अधिकृत सर्टिफिकेट असताना हलाल सर्टिफिकेट देणाऱ्या खाजगी कंपनीची अशी लुडबूड म्हणजे हे भारतावर आर्थिक आक्रमणच नाही का?म्हणून ग्राहका, सावधान हो! आपण खरेदी करत असलेली वस्तू हलाल प्रमाणपत्राने प्रमाणित तर नाही ना! याची खात्री करून मगच खरेदी करावी. हलाल प्रमाणपत्र प्रमाणित कोणतीही वस्तू आपल्याकडून खरेदी केली जाणार नाही, याची काळजी घ्यावी, कारण या हलाल प्रमाणपत्र प्रमाणित वस्तु आणि सेवांच्या माध्यमातून मिळणारा पैसा देशविघातक कृत्यांमधे वापरल्या जातो हे स्पष्ट झाले आहे. म्हणून भारताचे आर्थिक संकटापासून रक्षण करणे हे एक सुजाण आणि जागृत नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे.

**वर्षा आवदे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखव

# पालकमंत्र्यांच्याहस्ते दारव्हा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

## दर्जेदार सुविधा निर्मितीसाठी राज्य शासन कटीबद्ध : पालकमंत्री संजय राठोड





**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : सभागृह, जॉगिंग ट्रॅक यासह सुमारे तीन कोटी निधीतून विविध विकास कामांचे भूमिपूजन राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते दारव्हा येथे आज झाले. नागरिकांसाठी दर्जेदार व गुणवत्तापूर्ण सुविधांची निर्मिती करण्यासाठी शासन कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन मंत्री श्री राठोड यांनी यावेळी केले.

दारव्हा शहरातील नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ३ मधील विवेकानंद कॉलनीत विविध विकासकामांच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात भूमिपूजन विधी पार पडला. या कामांमध्ये विवेकानंद कॉलनीतील खुल्या जागेत सभागृहाचे बांधकाम (70 लाख), त्याच ठिकाणी जॉगिंग ट्रॅक बसविण्याचे काम (10 लाख), तसेच यवतमाळ रोड ते आर्णी नाका दरम्यान खडीकरण व नाली बांधकाम (1,59,17,409) आणि नगरपरिषद प्रभाग क्रमांक ३ मधील ग्रामसेवक कॉलनी येथील बायपास रोड ते अश्विन नगरपर्यंत नाली बांधकाम (47 लाख) यांचा समावेश आहे. या सर्व विकासकामांचे भूमिपूजन पालकमंत्र्यांच्या हस्ते आज झाले. या प्रसंगी ज्येष्ठ नेते जीवनदादा पाटील, संपर्कप्रमुख श्रीधर काका मोहोड, जिल्हाप्रमुख यशवंत पवार, मुख्याधिकारी नगरपरिषद दारव्हा विठ्ठल केदारे, तालुका प्रमुख मनोज सिंगी, शहर प्रमुख राजू दुधे, नायब तहसीलदार जाधव आणि गजेंद्र चव्हाण यांसह शिवसेना पदाधिकारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते. नियोजित विकास कामे दर्जेदार गुणवत्तापूर्ण व्हावीत.

इतर आवश्यक कामांसाठीही प्रस्ताव सादर करावेत. जिल्ह्याला विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री श्री राठोड यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित होते.

# जिल्ह्यात पाच जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

यवतमाळ : जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर आले आहेत. त्यातूनच दिवसा आणि रात्रीच्या गस्तीत वाढ करण्यात आली आहे. शिवाय सराईत गुन्हेगार, अवैध दारू विक्रेते, मटका बहाद्दर, जुगारी आणि सामाजिक शांतता भंग करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाया करण्याचा सपाटा पोलिसांनी चालविला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज १७ ऑक्टोंबरला जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यातंर्गत पाच जणांवर प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या. या पुढेही या कारवाया सातत्याने केल्या जाणार असल्याची माहिती सत्रांनी दिली.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या घरात दिवाळीचा ‘आशेचा दिवा’ प्रज्वलित

## सामाजिक संस्थांच्या संयुक्त उपक्रमातून १०० कुटुंबांना धान्यकिट व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - दिवाळी म्हणजे प्रकाशाचा सण, पण अनेक शेतकरी कुटुंबांच्या आयुष्यात अंधार दाटलेला असतो. या अंधारात आशेचा किरण पेटवण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्थांनी पुढाकार घेत “आत्महत्याग्रस्त व पूरग्रस्त शेतकरी कुटुंबांना सांत्वना आणि प्रोत्साहन” या उपक्रमाचे आयोजन केले.

या उपक्रमाअंतर्गत एकूण १०० शेतकरी कुटुंबांना ‘दिवाळी धान्यकिट’ व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. हा भावनिक आणि प्रेरणादायी कार्यक्रम महसूल विभाग, सेवाभावी संस्था आणि सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गंगाधर होवळे (उपजिल्हाधिकारी, यवतमाळ) होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. योगेश देशमुख (तहसीलदार) आणि एकनाथ बिजवे (नायब तहसीलदार) उपस्थित होते.ज्येष्ठ समाजसेवक डॉ. दीपक घरझोडे आणि विजयकुमार बुंदेला यांनी मार्गदर्शन करत शेतकरी कुटुंबांमध्ये नवचैतन्याचा संदेश दिला. या प्रसंगी रवींद्र ढोक (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती), पंकज ननवाणी (केमिस्ट असोसिएशन), सुरेश राठी, राजेंद्र गडीकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक किशोर बाभूळकर यांनी केले, तर सूत्रसंचालन गजानन भोकरे आणि स्नेहल रेचे यांनी केले. मुख्य संयोजक म्हणून आतीक शेख (महाराष्ट्र पोलिस बॉईज असोसिएशन), प्रतीक तराळकर (युनिटी फाऊंडेशन), वर्षा पाडवे (वसुंधरा फाऊंडेशन), किशोर बाभूळकर (युवा जागर ट्रस्ट), कमलेश बघेल (धैर्य सोशल वेल्फेअर फाऊंडेशन) यांसह अनेक संस्थांचा सहभाग होता. विशेष सहकार्य यवतमाळ महसूल कर्मचारी पतसंस्था (सोलापुरी चादरी वाटप) आणि ग्रामीण बँक यवतमाळ (दिवाळी फराळ वितरण) यांनी केले. शेवटी, आतीक शेख यांनी सर्वांचे आभार मानत सांगितले की “शेतकऱ्यांचे आयुष्य फक्त संघर्षाचे नसावे; त्यांच्या घरातही आनंदाचा आणि आशेचा दिवा कायम पेटत राहावा.”

या उपक्रमामुळे जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबांमध्ये खऱ्या अर्थाने आनंदाचा प्रकाश पसरला असून, समाजातील संवेदनशीलतेचा उज्ज्वल संदेश दिला गेला आहे.

# नंददीप फाउंडेशनकडून निराधार वृद्धावर अंत्यसंस्कार दसऱ्यापासून शासकीय रुग्णालयात होते उपचाराधीन



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - दसऱ्याच्या सणाच्या दिवशी एका निराधार वृद्ध व्यक्तीला आजारपणामुळे यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असतानाच त्यांचे निधन झाले. मात्र, त्यांच्या नातेवाईकांचा शोध लागला नाही. शेवटी, शहर पोलिसांच्या विनंतीवरून नंददीप फाउंडेशनने माणुसकीचा परिचय देत त्या वृद्धाचा अंत्यसंस्कार करण्याची जबाबदारी स्वीकारली.

माहितीनुसार, हे वृद्ध व्यक्ती २ ऑक्टोबरपासून शासकीय रुग्णालयात उपचाराधीन होते. ते बोलू अथवा चालू शकत नव्हते. रुग्णालय प्रशासन तसेच शहर पोलिसांनी त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, पण काहीच माहिती मिळू शकली नाही. अखेर त्यांचा मृत्यू झाल्यानंतर चार दिवस त्यांचा मृतदेह शवविच्छेदन गृहात ठेवण्यात आला होता. शहर पोलीस स्टेशनचे अविनाश गोदमले व योगेश नागदिवे यांच्या विनंतीवरून नंददीप फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी पुढाकार घेत १६ ऑक्टोबर रोजी हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केला. या वेळी संस्थेचे संचालक संदीप शिंदे, स्वयंसेवक निशांत सायरे, विजय कुळझरकर, गौशूल, शाहरुख, कृष्णा आदी उपस्थित होते. नगरपालिकेचे जब्बार यांनीही सहकार्य केले.

### निराधार व्यक्तींना आश्रयाची गरज : संदीप शिंद

या प्रकरणी नंददीप फाउंडेशनचे संचालक संदीप शिंदे यांनी सांगितले की, "कौटुंबिक उपेक्षेमुळे अनेक जण निराधार होत आहेत. अशा व्यक्तींना आधार देणे हीच खरी माणुसकी आहे. आमचे फाउंडेशन या कार्यासाठी कटिबद्ध आहे. कुठेही निराधार व्यक्ती आढळल्यास त्यांनी समर्थवाडी नगर, नगरपालिका शाळा क्र. १९, यवतमाळ येथे संपर्क साधावा," असे आवाहन त्यांनी केले.

# महागाव येथील श्रीराम चौक दुर्गा उत्सव समिती मंडळाला ! आदर्श दुर्गा उत्सव पुरस्कार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव : जुने महागाव शहरातील श्रीराम चौक दुर्गा उत्सव समिती मंडळाला ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत यवतमाळ जिल्ह्यात ऑपरेशन प्रस्थान आदर्श दुर्गा मंडळ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये समाजनशील कार्य, समाजातील शिस्त, स्वच्छता, सामाजिक संदेश, पर्यावरण पूरक उत्सव साजरा करणे आणि डीजे मुक्त उत्सव व पारंपारिक वाद्यांना प्राधान्य देणे व उत्कृष्ट आयोजन करणे या सर्व बाबींमध्ये सहभाग घेऊन कार्य करणाऱ्या मंडळाला सन्मानचिन्ह व पारितोषिक देण्याचे स्पर्धेमध्ये आयोजन करण्यात आले होते.

सदर स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील तब्बल 4 000 दुर्गा मंडळाचा सहभाग नोंदविण्यात आला होता. त्या अंतर्गत २१ आदर्श दुर्गा मंडळांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये महागाव येथील श्रीराम चौक दुर्गा उत्सव समिती मंडळाला ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत आदर्श दुर्गा मंडळ सन २०२५ हा पुरस्कार मा. जिल्हाधिकारी विकास मीना साहेब यांच्या हस्ते आणि मा. पोलीस अधीक्षक कुमार चिंता साहेब, मा. अप्पर पोलीस अधीक्षक साहेब, एस. डी. पी. ओ. हनुमंत गायकवाड साहेब तसेच पोलीस निरीक्षक महागाव धनराज निळे साहेब यांच्या हस्ते मंडळाचे अध्यक्ष निलेश विश्वासराव नरवाडे, नितीन नंदकुमार नरवाडे, सोहम अनिल नरवाडे, अमित प्रतापसिंह चंदेल, व श्रीराम चौक दुर्गा उत्सव समिती मंडळाला मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार यवतमाळ येथे ट्रॉफी प्रमाणपत्र व प्रोत्साहन पर बक्षीस देऊन प्रधान करण्यात आला.

# जनतेच्या रखवालदाराची दादागिरी !

## ट्रॅक्टर चालकाला मारहाण, मालकाकडे पैशांची उघडी मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**




लाडखेड पोलिस ठाण्यातील शिपायाविरुद्ध गंभीर आरोप ; उपविभागीय पोलिसांकडे लेखी तक्रार

दारव्हा - लाडखेड पोलिस ठाण्यातील एका पोलिस शिपायाने दारूच्या नशेत ट्रॅक्टर चालकाला मारहाण करून ट्रॅक्टर मालकाकडे पैशांची उघडी मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वडगाव गाढवे येथील ट्रॅक्टर मालक अवधूत किशन बोंबले यांनी या प्रकरणी दोषी पोलिस शिपाई अविनाश यांच्यावर कठोर कारवाईची मागणी करत उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

बोंबले यांच्या म्हणण्यानुसार, ते आपला ट्रॅक्टर यवतमाळ येथून दुरुस्त करून रात्री घरी परत येत असताना, रात्री सुमारास अकरा ते बारा दरम्यान आमशेत फाट्यावर शिपाई अविनाश यांनी ट्रॅक्टर अडवला. ट्रॅक्टर रिकामा असूनही त्यांनी उद्धट भाषेत बोलत शिवीगाळ केली व वाहन पोलिस ठाण्यात नेण्यास भाग पाडले.ठाण्यात पोहोचताच ढोणे यांनी ट्रॅक्टरचालक पियुष बावणे याला मारहाण केली. चालकाने फोन करून मालकाला बोलावले असता, बोंबले ठाण्यात पोहोचले. त्यावेळी ढोणे यांनी त्यांनाही अश्लील भाषेत बोलून मोबाईल जप्त केला आणि पैशांची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्याने ढोणे यांनी आपल्यावर खोटे गुन्हे दाखल केले व रात्री तीन वाजेपर्यंत ठाण्यात थांबवून ठेवले, असा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेमुळे लाडखेड पोलिस ठाण्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नशेत नागरिकांशी दादागिरी करणाऱ्या पोलिस शिपायाविरुद्ध तत्काळ निलंबन व चौकशीची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणी वरिष्ठ अधिकारी काय भूमिका घेतात, याकडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# नि:स्वार्थ सेवेतच ईश्वरप्राप्ती : डॉ. बाळकृष्ण सरकटे

## 'समाजभान सेवा मिशन'तर्फे निराधार वृद्धांची सेवा उपक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**



आर्णी - वृद्ध, अंध, अपंग, निराधार व निराश्रित लोकांची मन:पूर्वक नि:स्वार्थ सेवा करणे हेच मानवी जीवनातील सर्वोच्च कर्म आहे. अशा सेवेतच देवत्व दडलेले आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. बाळकृष्ण सरकटे यांनी केले.

मातोश्री सुशीलाबाई नागपुरे वृद्धाश्रम, आर्णी येथे समाजभान सेवा मिशन, यवतमाळतर्फे आयोजित सेवा उपक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमात वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक मारोतराव नागपुरे अध्यक्षस्थानी होते, तर प्रा.अमित बागडे आणि लोकप्रिय शिक्षक विनायक गंगशेट्टीवार प्रमुख अतिथी होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीस संत गाडगेबाबांच्या प्रतिमेला हारार्पण करून पूजन करण्यात आले. समाजभान मिशनच्या कार्यकर्त्यांनी वृद्धाश्रमातील रहिवाशांना भेट देत त्यांना मानसिक आधार दिला. यावेळी ५० ब्लँकेट व खाऊचे वाटप करण्यात आले. गंगशेट्टीवार यांनी आई-वडिलांची सेवा हीच खरी भक्ती असल्याचे सांगत उपस्थितांना भावनिक संदेश दिला. प्रा. अमित बागडे यांनी समाजभानच्या उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन समाजभान मिशनचे सचिव विनय मिरासे ‘अशांत’ यांनी केले. कार्यक्रमानंतर विनय मिरासे ‘अशांत’ यांनी आपल्या विनोदी आणि सामाजिक आशयाच्या गीतांनी वृद्धांचे मनोरंजन केले. समारोपीय भाषणात संस्थापक खुशालराव नागपुरे यांनी वृद्धांच्या भावना मांडत सर्वांचे आभार मानले. या उपक्रमाला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# अनु.जमाती बहुल भागातील गटात एस.टी.प्रवर्गाला राखीव सोडा

## भारतीय आदिवासी पँथर संघटनेची निवेदनाद्वारे मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - तालुक्यातील दिनांक १३/१०/२०२५ रोजी पंचायत समिती सोडत द्वारे आरक्षण जाहीर झाले आहे. तसेच काही दिवसांपूर्वी यवतमाळ जिल्ह्यातील जि.प. ६२ गटांचे आरक्षण जाहीर करण्यात आले. हे आरक्षण जाहीर करताना अनुसूचित जमाती बहुल भागातील परिसरात अनुसूचित जमाती करीता जि.प.गट आरक्षित ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे आदिवासी बहुल परिसरातील आदिवासी समाज बांधवांमध्ये संतप्त होऊन नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

सर्वसाधारण गटासाठी सुध्दा जागा सोडण्यात आल्या. असे असले तरीही ९ तालुक्यांतील ४१ गटांमध्ये एकही जागा (गट) अनुसुचित जमातीसाठी आरक्षित झालेला नाही. याबद्दल आदिवासी समाजामध्ये तिव्र नाराजी झाली असुन पुसद तालुक्यातील शिळोणा गट हा सर्वसंख्येमध्ये ४०% आदिवासी समाजाची संख्या असल्यामुळे हा गट अनु. जमातीसाठी आरक्षित करावे अशी मागणी जिल्हाधिकारी तथा जिल्हानिवडणूक अधिकारी यांचे कडे भारतीय आदिवासी पँथर संघटना यवतमाळ जिल्हा यांनी निवेदनाद्वारे केली आहे. पुसद परिसर तथा इतर ४१ गटांमध्ये किमान ८ जागा अनु. जमातीसाठी सोडण्यात याव्या. अशा विषयाचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देऊन कॅवेट दाखल करण्यात आला. देविदास डाखोरे,यांचे सह सुरेश धनवे, आतिष वाघमारे, संदीप आढाव व पंकज वंजारे यांच्या सह्या असुन त्यांनी निवेदनाद्वारे आदिवासी समाजासाठी अनुसूचित जमाती त्यांना एक तरी राखीव गट सोडण्यात यावा अशी मागणी जिल्हाधिकारी यांना स्वतः हजर राहून केली आहे. पुसद तालुक्यामध्ये एकूण ८ जि. प. गट आहेत. यापूर्वी २ जागा अनु. जमातीसाठी राखीव असत. परंतु या आरक्षित यादीमध्ये अनु. जमातीला स्थान देण्यात आले नाही. शिळोणा सर्कल मध्ये ३०३८५ पैकी १०९३८ संख्या अनु.जमातीची आहे. असे असतानाही या ठिकाणी अन्याय करण्यात आला आहे. तसेच पुसद ८, उमरखेड ६, महागांव ५ असे एकूण १९ गट आहेत. या तीन तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज आहे. परंतु एक प्रकारे आरक्षण न दिल्यामुळे अन्याय झाल्याची भावना आहे. आर्णी- ०४ जि. प. गट आहेत. विशेष म्हणजे आर्णी विधानसभा मतदार संघ हा लोकसंख्येच्या आधारे अनु. जमातीसाठी राखीव आहे. परंतु त्याठिकाणी एकही गट अनु. जमातीसाठी राखीव नाही.

# घाटंजी येथे 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाचे आयोजन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



घाटंजी - दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २२ ऑक्टोंबर रोज बुधवार ला पहाटे ५.३० वाजता रसिकाश्रय घाटंजी येथे दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती कार्यक्रमाचे मुख्य आयोजक महेश पवार यांनी दिली.

हे आयोजनाचे चौथे वर्ष असून विदर्भातून सर्वात मोठा दिवाळी पहाट कार्यक्रम घाटंजी येथे मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. पहाटे ५.३० वाजता या कार्यक्रमाची सुरुवात गाईचे पूजन करून दीप प्रज्वलित केल्या जातो. या कार्यक्रमात भक्ती गीत, भावगीत, लोकगीते सादर केल्या जातात. तसेच कार्यक्रमाच्या सरते शेवटी दिवाळीच्या फराळाचा आनंद घेतल्या जातो. कार्यक्रमाला हजारो महिला पुरुष आणि खास करून युवकांची उपस्थिती असते. घाटंजीची दिवाळी पहाट हे विदर्भातील सर्वात मोठी दिवाळी पहाट कार्यक्रम असून. या कार्यक्रमाचा आनंद लुटण्यासाठी श्रोतावर्ग लांबून येतात. यावर्षी या कार्यक्रमाची मुख्य गायिका महाराष्ट्र संगीत रत्न विजेत्या सा रे गा मा फेम आकांक्षा नगरकर या असून सोबतीला महाराष्ट्राचा भजन सम्राट फेम अतुल तायवाडे आणि वाईस ऑफ सुरेश वाडकर अश्विन कुमार खापर्डे यांच्या बहारदार गीतांचा कार्यक्रम होणार आहे. सोबतीला संगीत संयोजन राहुल देशमुख करतील. बहारदार मराठी गीतांच्या मैफिलीचा आनंद घेण्यासाठी आपण या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहावे असे आयोजक महेश पवार यांनी आवाहन केले आहे.

# वेचक

## अवैध रेती वाहतुकीचे दोन ट्रॅक्टर पकडले

यवतमाळ : अवैद्य रेती वाहतुकीची दोन ट्रॅक्टर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने पकडले. तसेच यामध्ये चौघांना ताब्यात घेत १३ लाख दहा हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई १५ ऑक्टोंबर रोजी जयस्वाल पेट्रोल पंपाजवळ गावातील पारवा ते रामनगर रोडवर करण्यात आली. मांडवा ता. घाटंजी, श्रीकांत ऊर्फ अनिकेत शेंडे (२३) रा. गोलु चौधरी (२१) रा. रामनगर ता. घाटंजी, श्रीकांत चौधरी (२७) रा. साखरा ता. घाटंजी, अनुप खांडरे (२६) रा. पहापळ ता. पांढरकवडा असे अटक करण्यात आलेल्या चौघांची नावे आहेत. संबंधित आरोपी हे आपल्या ताब्यातील एम एच २९ बीव्ही २९०७आणि अन्य एका ट्रॅक्टर मधून दोन ब्रास रेतीची विनापरवाना वाहतूक करताना आढळून आले. त्यावरून पोलिसांनी कारवाई करीत रेतीसह ट्रॅक्टर असा १३ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

यवतमाळ : भरधाव जाणाऱ्या अज्ञात वाहनाने एकाला जोरदार धडक दिली. यामध्ये संबंधिताचा जागीच मृत्यू झाला. ही घटना ४ सप्टेंबर रोजी लाडखेड पोलीस स्टेशन अंतर्गत गोखी नदी जवळ घडली. दिनेश सखाराम मारबते असे अपघातात ठार झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. दिनेश गोखी नदी जवळून जात होता. दरम्यान, कुणीतरी अज्ञात चारचाकी वाहन चालकाने आपले वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून दिनेशला जोरदार धडक दिली. या अपघातात त्याला गंभीर दुखापत झाल्याने जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर दिनेश चा भाऊ शंकर याने लाडखेड पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा दाखल केला.

## क्षुल्लक कारणावरून एकाला मारहाण

वडकी : तू घरगुती झगडे लावतो, असे म्हणून वाद उपस्थित करीत एकाला शिवीगाळ करण्यात आली. एवढेच नव्हेतर संबंधितांला हातातील पितळीच्या कड्याने डोक्यावर मारून गंभीर जखमी केले तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना १५ ऑक्टोबर रोजी धानोरा राळेगाव येथे घडली. आशिष रमेश उराडे (३४) रा. धानोरा तालुका राळेगाव, असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्याने वडकी पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तकार दिली. त्यावरून पोलिसांनी आकाश अरुण वाकडे (२७) रा. धानोरा राळेगाव याच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

## यवतमाळ अर्बन बँक व एस.टी. कर्मचारी पतपेढीचा उपक्रम

यवतमाळ - यवतमाळ अर्बन बँक लि. यवतमाळ आणि एस.टी. कर्मचारी पतपेढी यांच्या संयुक्त सौजन्याने यवतमाळ आगाराला एकूण ४० मार्गफलक देण्यात आले. या सामाजिक उपक्रमामुळे प्रवाशांना मार्गदर्शन सुलभ होऊन एस.टी. बस वाहतुकीत सुविधा वाढणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून यवतमाळ अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कोहरे , विभागीय वाहतूक अधिकारी दराडे साहेब, विभागीय कामगार अधिकारी राठोड, तसेच वरिष्ठ आगार व्यवस्थापक दिवसे (यवतमाळ) उपस्थित होते. यावेळी ई-व्ही ट्रॉन्स लि. चे प्रोजेक्ट मॅनेजर विनय कुमार, रमेश राव (आगार व्यवस्थापक, ई-डेपो), समीत सोनपितळे (ऑपरेशन मॅनेजर, ई-डेपो), कैलाश शंकर (इन्चार्ज, ई-डेपो) तसेच एस.टी. कर्मचारी पतपेढीचे संचालक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे बस आगार परिसरात मार्गदर्शक फलकांच्या स्वरूपात प्रवाशांना अचूक माहिती मिळणार असून, प्रवास अधिक सुसंगत आणि सोयीस्कर होणार आहे. यवतमाळ अर्बन बँक व एस.टी. कर्मचारी पतपेढीचा हा सामाजिक उत्तरदायित्वाचा अभिनव उपक्रम असल्याचे सर्व मान्यवरांनी मत व्यक्त केले.

## आठ दिवस कार्यालये बंद

यवतमाळ : शनिवार, रविवार, कलेक्टर डिक्लेअर सुटी, दिवाळी आणि राज्य शासनाची सुटी अशा सलग सुट्यांमुळे शासकीय कार्यालयांचे कामकाज आठवडाभर ठप्प राहणार आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामकाजाच्या फाईल पूर्ण करण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### सत्यप्रकाश गुप्ता अमरावती आकाशवाणीवर



**अमरावती -** येथील सामाजिक कार्यकर्ते तथा गोविंद कासट मित्र मंडळाचे सदस्य सत्यप्रकाश देवीलाल गुप्ता यांची उद्घोषक प्रशांत बैस यांनी घेतलेली मुलाखत २० ऑक्टोबर रोजी सकाळी १०. ०० वाजता अमरावती आकाशवाणी केंद्राच्या नमस्कार अमरावती कार्यक्रमात प्रसारित होणार आहे.समाजसेवक सत्यप्रकाश गुप्ता आपल्या गेल्या ४० वर्षापासून सामाजिक कार्य करीत आहे. त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना अनेक पुरस्काराने सुद्धा गौरविले आहे. त्यांचा हा प्रवास आपल्या विशिष्ट शैलीत उत्कृष्ट उद्घोषक प्रशांत बैस यांनी उलगडलेला आहे. या कार्यक्रमाचे सादरकर्ते संजय ठाकरे तेव्हा स्थानिक अमरावती आकाशवाणी केंद्राच्या एफ.एम. बँड १०१.५ वर तथा लाईव्ह स्ट्रिंमीगवर न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲप माध्यमातून हा कार्यक्रम ऐकण्यास विसरू नये असे आवाहन अखिल भारतीय रेडिओ श्रोता महासंघाने सचिव संजय वाघुळेनी केले आहे.

### समकक्षतेबाबत सूचना जारी यादी संकेतस्थळावर उपलब्ध

**अमरावती-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्याव्दारे इयत्ता दहावी व बारावीची परीक्षा घेतल्या जाते. या मंडळाप्रमाणेच समकक्षतेबाबत मान्यता देण्यात आलेल्या संस्था, बोर्ड यांची मान्यताप्राप्त यादी मंडळाच्या ै.ऀस्र्ेंर्द्.ग्ह या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याची सर्व संबंधित मान्यताप्राप्त शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, विद्यार्थी, पालक व नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन राज्य मंडळ, पुणेचे सचिव देविदास कुलाळ यांनी केले आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे ही एक स्वायत्त संस्था असून याव्दारे इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा घेतल्या जातात. महाराष्ट्र राज्याच्या या बोर्डाकडे समकक्षता मिळण्यासाठी इतर संस्था, बोर्ड प्रस्ताव सादर करतात. सदर प्रस्तावांची पडताळणी करुन संबंधित संस्था, बोर्ड यांना इयत्ता दहावी व बारावी समकक्षतेबाबत मान्यता प्रदान करण्यात येते. उपरोक्तप्रमाणे समकक्षतेबाबत मान्यता देण्यात आलेल्या संस्था/ बोर्ड यांची यादी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिर करण्यात आली आहे, असेही मंडळाव्दारे कळविण्यात आले.

### परदेशी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती-**समाज कल्याण विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या केंद्र सरकार पुरस्कृत राष्ट्रीय परदेशी शिष्यवृत्ती योजना सन २०२५-२६ करीता अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या आणि अर्ध-भटक्या जमाती, भूमिहीन शेतमजूर आणि पारंपारिक कारागीर श्रेणीतील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. परदेशात पदव्युत्तर पदवी किंवा पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय परदेश शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://nosmsje.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा.अधिक माहितीसाठी तसेच केवळ योजनेशी संबंधित प्रश्नांबाबत मार्गदर्शनाासाठी योगेश तनेजा, अवर सचिव, शास्त्री भवन डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, नवी दिल्ली-११०००१ फोनः ०११ २३३८४०२३ यावर संपर्क साधवा. (सर्व कामकाजाचे दिवस दुपारी ३ ते संध्याकाळी ५ पर्यंत) ईमेल: 50- s-msje[at]gov[dot]in कोणत्याही तांत्रिक मदतीसाठी कृपया ईमेल करा: dev2-nha [at] supportgov[dot]in अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी www.nosmsje.gov.in या केंद्र शासनाच्या https//nosmsje.gov.in/nosmsje/public/images/Scheme-guidelines-२०२५-२६ यावर संपर्क साधावा. या योजनेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थानी अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रादेशिक उपायुक्त श्रीमती केदार यांनी केले आहे.

### वाचन प्रेरणा दिन साजरा

**खल्लार-**नजिकच्या गौरखेडा(चांदई) येथिल मिलिंद विद्यालयात माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनानिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. बी. वानखडे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षक दिपक कावरे,प्रशांत वानखडे उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करण्यात आले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यालयाच्या सभागृहामध्ये पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यालयातील वर्ग ५ ते १० च्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.प्रास्ताविक प्रशांत वानखडे संचालन व आभार प्रदर्शन अमोल बोबडे केले. कार्यक्रमाला वासुदेव भांडे, अमोल बोबडे, पुरणप्रकाश लव्हाळे, मनिषा गावंडे, चित्रा राऊत, पूजा काळे, दिपक रहाटे, संजय आठवले, आनंद खंडारे सह विद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




### ग्रा.प.ला पुर्णवेळ अधिकारी देण्याची मागणी

**शिराळा-** येथील ग्रामपंचायत मध्ये तीन वर्षांपासून अँडशनल ग्रामविकास अधिकारी आहे. तीन दिवसच ग्रामपंचायत कारभार पाहतात. अमरावती तालुक्यातील मोठे गाव आहे. त्यामुळे समस्या मोठ्या प्रमाणात आहेत.पुर्णवेळ अधिकारी नसल्यामुळे गांवाच्या समस्याचे निराकरण होत नाही. आठवड्यातून तीन दिवस अँडीशनल अधिकारी नवले येतात.त्यामुळे ग्रामस्थांना त्रास होत आहे.या गैरसोयीमुळे ग्रामस्थांना तोंड द्यावे लागते.तरी शिराळा ग्रामपंचायत ला पुर्ण वेळ ग्रामविकास अधिकारी देण्याची मागणी शिराळा ग्रामस्थांनी केली आहे.

# प्रकाशाच्या उत्सवात घ्या वीज सुरक्षेची काळजी

**अमरावती/का.प्र.**

प्रकाश उत्सवाला सुरूवात झाली आहे. सणाच्या कालावधीत विद्युत सजावट, रोषणाई तसेच फटाक्यांची आतषबाजी करताना वीजसुरक्षेची काळजी घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक वीज यंत्रणेसोबतच घरगुती रोषणाईच्या विद्युत उपकरणांपासून सावध रहा, कोणत्याही प्रकारचा धोका न पत्करता वीजसुरक्षेची काळजी घेत दिवाळी सण साजरा करावे, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे

महावितरणची वीज यंत्रणा ही सार्वजनिक ठिकाणी आहे. यात वीजवाहिन्या, रोहित्र, फिडर पिलर आदी यंत्रणा उघड्यावर असल्याने फटाके फोडताना त्यापासून सुरक्षित अंतर ठेवावे. फटाक्यांच्या आतषबाजीत सार्वजनिक वीजयंत्रणेला आगीचा धोका निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. रोहित्र, फ्युज पेट्या, फिडर पिलर, रिंग मेन युनिट जवळ फटाके फोडू नयेत किंवा त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचा कचरा टाकू नये अथवा तो जाळू नये. वीज वाहिन्यांना स्पर्श होईल किंवा धोका निर्माण होईल असे रॉकेटसारखे फटाके वाहिन्यांखाली उडवू नयेत. मोकळ्या जागेतच फटाके उडवावेत. वीज यंत्रणेला आग लागल्यास, धोका निर्माण झाल्यास, वीज पुरवठा खंडित झाल्यास महावितरणच्या २४ तास सुरु असणाऱ्या कॉल सेंटरच्या १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ किंवा १९१२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

दिवाळी साजरी करताना घरगुती विद्युत उपकरणांपासून देखील सावध राहावे. घराच्या



महावितरणचे ग्राहकांना आवाहन

किंवा इमारतीच्या रोषणाईसाठी दिव्यांची विद्युत माळ चांगल्या दर्जाची असल्याची खात्री करून घ्यावी. विद्युत माळेचे वायर, दिवे, सॉकेट दर्जेदार नसल्यास धोका निर्माण होऊ शकतो. घर किंवा इमारतीचे अर्थिंग योग्य असल्याची तपासणी करावी. घराबाहेर आकाशकंदील लावताना तुटलेल्या वायरचा वापर टाळावा किंवा तुटलेली वायर चांगल्या दर्जाच्या इन्सुलेशन टेपने सुरक्षित करून घ्यावी.

घरगुती उपकरणांसह विद्युत माळेपासून सुरक्षित अंतरावर तेलाच्या वातीचे दिवे लावावेत. विद्युत सॉकेटवर अधिकचा भर टाकू नये.

आकाश कंदिल किंवा दिव्यांच्या विद्युत माळेसाठी थ्री पीनचा वापर न करता वायर्स थेट प्लगच्या छिद्रात आगपेटीच्या काड्यांच्या साह्याने खोचले जातात. त्यामुळे त्या प्लगमध्ये स्पार्कींग होऊन आग लागण्याची शक्यता असते. गॅलरीमधील लोखंडी जाळी किंवा घराचा लोखंडी जिना किंवा इतर कोणत्याही लोखंडी वस्तूपासून विद्युत दिव्यांची व आकाश कंदिलाची वायर दूर ठेवावी. ही वायर एकसंध असावी. तुटलेली किंवा सेलो टेपने जोडलेली नाही याची खात्री करून घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## आंतरराष्ट्रीय माऊथ ऑर्गन पुरस्काराने समाजभूषण देवानंद गणोरकर सन्मानित

**अमरावती/का.प्र.**

येथील क्रांती ज्योती बिग्रेड संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष समाजभूषण देवानंद गणोरकर यांनी मलेशियाची राजधानी कॉललमपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय फेस्टिवल मध्ये माऊथ ऑर्गन वाद्य उत्कृष्टपणे सादर केल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र व गौरव चिन्ह प्रदान करून आयोजकांनी सन्मानित केले.

अखिल लोककला सांस्कृतिक संघटना पुणे यांनी सदर आंतरराष्ट्रीय फेस्टिवचे



आयोजन केले होते. यापूर्वी देवानंद गणोरकर यांनी संगीत क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी महात्मा फुले फेलोशिप अवॉर्ड, अण्णा भाऊ साठे स्मृती राज्यस्तरीय समाजसेवक पुरस्कार, महाराष्ट्र शासन समाजकल्याण विभागाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, बँकॉक व सिंगापूर येथील आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सवात सुवर्ण पदक व प्रथम पारितोषिक प्राप्त झाले आहे. गणोरकर हे मधापुरी ग्रामपंचायतचे माजी सरपंच असून अकोला जि. प. चे माजी सदस्य म्हणून त्यांनी अनेक विकासात्मक कामे केलेली आहेत. सदर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल क्रांती ज्योती बिग्रेड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर, कृषक आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर वानखडे, प्रदेश पदाधिकारी ओमप्रकाश अंबाडकर, राजाभाऊ खवले, विनय चौधरी, प्रदीप शेवतकर, प्रा. सुरेश यावले, डॉ. विजय भोजने, इंजि. सुभाष गोहत्रे आदींनी देवानंद गणोरकर यांचे कौतुक केले.

## मका पिकाला हमीभाव मिळण्यासाठी आंदोलन



**अचलपूर/वार्ताहर**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात मका पिकाला हमीभाव मिळण्यासाठी शेतकरा, सामाजिक कार्यकर्त्यांनी धरणे आंदोलन पुकारले होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते बंड्या साने, राम दहिकर, गुलाब दहिकर, वामन खडके, रामकिसन कासदेकर आदी उपस्थित होते.

यावेळी सभापती प्रतिभा ठाकरे, उपसभापती अमोल चिमोटे, प्र.सचिव मंगेश चव्हाण, मंगेश भेटाळू यांनी आंदोलन कर्त्याशी सवांद साधला आणि हा प्रस्ताव गेल्या १५ दिवसापूर्वीच शासन स्तरावर पाठविण्याची माहिती दिली आहे. १७ ऑक्टोबर रोजी शेतकऱ्यांचे मका पिकाची ९०० व ११०० रुपयाने विकले. पण गेल्या वर्षी २ हजार रुपयाने विकली. यामुळे मका पिकाला योग्य भाव न मिळाल्याने आज अचलपूर कृषी उत्पन्न बाजार मध्ये आज धरणे आंदोलन करण्यात आली.



## पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थांसमवेत ‘दिवाळी’ साजरी

**अमरावती/क्रा.प्र.**

पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल मध्ये विद्यार्थ्यांसमवेत दिवाळी सणांचे आयोजन मोठ्या जल्लोषात करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता व लक्ष्मी मातेच्या फोटोला हारार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यामध्ये वर्ग नर्सरी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. वर्ग नर्सरी च्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. KG1 ke KG2 च्या विद्यार्थ्यांनी रामायण प्रस्तुत केले. वर्गानुसार विद्यार्थ्यांना उपक्रम देण्यात आले. वर्ग ३ ग्रीटिंग कार्ड, वर्ग ४ दिवा डेकोरेशन व तोरण, वर्ग ५ ला रामसीता, लक्ष्मी व भाऊबीज पोस्टर बनवणे. संचालन वर्ग ५ चे विद्यार्थी राम ताथोड आयुशी पाथरे व आभारप्रदर्शन अभिनव वानखडे याचबरोबर दिवाळीचे महत्व वर्ग ४ विद्यार्थीनी देवांशी मानकर, प्रिया विघ्ने या यांनी सांगितले. कार्यक्रमाला उपस्थित शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे शाळेच्या उपप्राचार्या सोनल निस्ताने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## ‘युवा महोत्सव’ सप्तरंगी कलाविष्कार यज्ञच-यश खोडके

**अमरावती/का.प्र.**

प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्ट द्वारा संचालित विनायक विद्यामंदिर महाविद्यालय, अमरावती येथील केशरबाई लाहोटी महाविद्यालयात पार पडलेल्या युवा महोत्सवांमध्ये विविध कला प्रकारांमध्ये मोठ्या उत्साहात सहभागी होऊन आपल्या कलाविष्कारांची सप्तरंगी उधळण केली.

पी.के.एम.टी ट्रस्टचे सचिव यश खोडके युवा महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करताना म्हणाले,युवा महोत्सवाचा मंच म्हणजे विद्यार्थ्यांमधील प्रतिभेला वाव देणारा मंच आहे.या मंचावर विविध कला प्रकारांच्या आविष्कारातून विद्यार्थी




त्यांच्यातील विविध कलागुणांना प्रत्यक्षात उतरवत असतात.हे कलागुण म्हणजे विद्यार्थ्यांच्या जिद्द,परिश्रम आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतिबिंब असते.यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याला वेगळी दिशा तर मिळतेच पण महाविद्यालयाचे नावलौकिक होते. महाविद्यालयातील संस्कृती दिंडोकार,एकता तरेडजा,समीक्षा बोबडे, श्रावणी सावळे, हर्ष डांगे, रोहित राठोड, मोहित मालखेडे या विद्यार्थ्यांनी एकूण १३ कला प्रकारांमध्ये युवा महोत्सवात सादरीकरण केले. यासाठी डॉ.पद्माकर टाले यांच्या मार्गदर्शनात युवा महोत्सवचे समन्वयक डॉ.सागर पडोळे व प्रा.संगीता बंड यांनी उत्कृष्ट सादरीकरणाकरिता परिश्रम घेतले. डॉ. शितल काळे, डॉ.दीपावली राऊत,सागर देशमुख आदी प्राध्यापक रुंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## गुरव समाजाच्या`स्नेहमिलन सोहळ्यात राबविले अनेक सामाजिक उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

श्री शैव गुरव हितकारीणी मंडळ, अमरावती तर्फे कोजागिरी पौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात, पारंपरिक व आनंदमय वातावरणात महेंद्र लॉन, अमरावती येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात आराध्य दैवत परशराम महाराजांच्या पूजनाने झाली. मंडळाचे अध्यक्ष शरद देवरणकर, सचिव दिलीप बेलबागकार, कोषाध्यक्ष जयंत पुसदकर पदाधिकारी ,मनोज तायडे, डॉ बाळापुरे, तसेच सर्व कार्यकारिणी सदस्य व समाजबंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन दीपक पिंजरकर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांच्या संयोजनाखाली नवोदित संयुक्ता पुसदकर व संजीवनी मारोटकर यांनी उत्साही, आकर्षक व ओघवत्या शैलीत संचालन करून संपूर्ण कार्यक्रमाला रंगत आणली. उपस्थितांपैकी सदस्यांनी, गायन, नृत्य, कवितावाचन व विनोदी सादरीकरणाद्वारे कार्यक्रमाला बहार आणली. बालकलाकारांच्या कलात्मक सादरीकरणाने संध्याकाळ अधिकच संस्मरणीय बनली. निरंजन शेगोकार,बंडू अंबुलकर,दीपा बेलबागकार, चिखलकर आदींनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण अर्थातच कोजागिरी पौर्णिमेचे चांदणे होते.



चंद्रप्रकाशात साऱ्यांनी मिळून घेतलेला स्वादिष्ट नाश्ता, हशा, गप्पा आणि मैत्रीचा आनंद हा अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे प्रायोजक गोपाल चिखलकर, आशिष कपले, मनोज पांडे व निलेश लामकाने यांचे तसेच समाजबांधवांकडून दिलेल्या ऐच्छिक देणग्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. युवा आघाडीचे भुषण पुसदकर व इतर कार्यकारिणी सदस्य कार्यरत होते. माजी अध्यक्ष. प्रा. शरद पुसदकर, गोपाळ वाठोडकर, त्रिदीप वानखडे, महेश कथलकर, मुकुंद पुसदकर, विजय पुसदकर, संजय वानखडे, सुशील कथलकर, महिला आघाडीच्या अध्यक्षा तृप्ती व्यवहारे व सचिव संजीवनी मारोटकर ,माधुरी तायडे, मेघा देवरणकर, संध्या पुसतकर,पुजा पुसतकर, सुनीता बाळापुरे सहकोषाध्यक्ष व कार्यकारिणी तसेच महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग सुनिश्चित करून कार्यक्रमाला विशेष रंग भरला. तसेच पुजा विजय पुसदकर कडुन गोदावरी काशीराव पुसदकर यांच्या स्मृती प्रीत्यर्थ शिष्यवृत्तीसाठी १२ हजार रुपये देणगी देण्यात आली. सचिवांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले कार्यक्रमासाठी राजेश पुसदकर, मुकुंद पुसदकर, विजयराव पुसदकर, राहुल खंडार, विशेष परिश्रम घेतले. सुमारे २०० पेक्षा अधिक समाजबंधू-भगिनींच्या उपस्थितीने कार्यक्रमाला उत्साहपूर्ण यश लाभले.

### तलाठी कार्यालयाचा विद्युत पुरवठा खंडित

**बेलोरा-** येथील तलाठी कार्यालय एक महिन्यापासून विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला. विद्युत व बिल्डिंग भाडेपट्टी ग्रामपंचायतला तहसीलदाराकडून मिळतात मग तो बरेच दिवसापासून भाडेपट्टी व विद्युत पुरवठाचे पैसे तहसीलदारांनी ग्रामपंचायतला दिले नाही म्हणून विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला. विद्युत पुरवठा खंडित असल्यामुळे तलाठ्यांचे आणि शेतकऱ्यांचे हाल होत आहे. तहसीलदारांनी विद्युत पुरवठा व भाडेपट्टीचे पैसे तात्काळ ग्रामपंचायत समुद्र करावे व शेतकऱ्यांची गैरसोय टाळावी अशी गावकऱ्यांची मागणी आहे.

## अचलपूर-परतवाडा जुळया शहरात वाहतुकीची कोंडी

### दिवाळीच्या खरेदीसाठी रस्त्यांवर नागरिकांची प्रचंड गर्दी

**अचलपूर/वार्ताहर**

दिवाळी सणामुळे बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू आहे. अचलपुर- परतवाडा जुळ्या शहरातील बहुतांश रस्ते गर्दीने फुलून गेली आहेत. मात्र अपवाद वगळता बऱ्याच चौक अथवा बाजारपेठेत वाहतूक व पोलिस कर्मचारी दिसत नसून वाहतुकीची कोंडी होत आहे. अपघाताची शक्यता बळावली असल्याची ओरड आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दिवाळी सण सुरू झाला आहे. जुळ्या शहरात बऱ्याच भागांत कपडे, रांगोळ्या,



आकाश कंदील, पणत्या, दिवे, झाडू, फटाके, पूजा साहित्यासह सजावट व शोभेच्या साहित्याची दुकाने लागली आहेत. साहित्य खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची गर्दी वाढली आहे. जुळ्या शहरासोबत आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थही खरेदीसाठी येत असल्याने परतवाडा व अचलपूर या जुल्या शहरातील सदर बाजार, दुरानी चौक, गुजरी बाजार, जयस्तंभचौक, बस डेपो, परतवाडा कांडली मार्ग, अचलपूर मार्ग तर अचलपुरातील देवळी, चावलमंडी यासह अन्य भागातही वाहतूक विस्कळीत होत असल्याची ओरड नागरिकांकडून होत आहे. मात्र गेल्या दोन-तीन दिवसांत अपवाद वगळता इतर अनेक चौक अथवा मार्गावर वाहतूक व पोलिस कर्मचारी नसल्याने रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागत आहेत. अनेक ठिकाणी बेशिस्त वाहने लागत आहेत. त्यामुळे सणासुदीच्या दिवसांत नागरिकांची गैरसोय वसाहत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. याकडे वाहतूक, अधिकाऱ्यासह वरिष्ठांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून पुढे येत आहे.

## सार्वजनिक वाचनालयात वाचन व प्रेरणा दिन

**बेलोरा/वार्ताहर**

येथील स्वर्गीय सुरेंद्र दत्तात्रय ठाकरे सार्वजनिक वाचनालय भानगाव येथे वाचन व प्रेरणा दिन साजरा करण्यात आला भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थी मध्ये पुस्तकाविषयी वाचन विषय आवड निर्माण व्हावे म्हणून ही संपूर्ण भारतभर राष्ट्रीय वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच ग्रंथपाल योगेश ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना, वाचक सभासदांना परिसरातील मंडळींना व महिलांना दिल्ली व आपल्या ग्रंथालय मध्ये सर्व प्रकारचे पुस्तक उपलब्ध आहे तरी विद्यार्थीनी वाचकांनी त्याचा लाभ घ्यावा अशी सुचविले.तसेच कार्यक्रमाचे लाभलेले पत्रकार



खालील बेग तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विनोद राऊत उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वाचनाला येवून पेपरचे वाचन करावे असे विनोद राऊत यांनी कळविले.

यावेळी परिसरातील मंडळी उपस्थित होती.सोहम राऊत, अश्विनी ठाकरे, परिमिल राऊत, संकेत राऊत, शुभम राऊत हे विद्यार्थी उपस्थित होते.

# मुत्ताकी यांच्या भारत भेटीचे फलित !



अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री आमिर खान मुत्ताकी यांचा भारत दौरा बऱ्याच गोष्टींमुळे लक्षवेधी ठरला आहे.भारताने अफगाणिस्तान मधील तालिबानी राजवटीला अद्याप अधिकृतरित्या मान्यता दिलेली नाही,ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर, आमिर खान मुत्ताकी यांच्या भारत भेटीचे महत्व आणखीनच अधोरेखित होते.पाकिस्तानचा शत्रू तो आपला मित्र या न्यायाने, अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री आमिर खान मुत्ताकी यांचे भारतात झालेले स्वागत यथोचितच म्हणावे लागेल.मुत्ताकी यांच्या भारत भेटीचे, आंतरराष्ट्रीय पातळीवर काय परिणाम होतील,हे जाणून घेण्यापूर्वी,गेल्या चार, साडेचार दशकांत अफगाणिस्तानमध्ये कोणत्या ठळक घडामोडी घडल्या,त्यांचा थोडक्यात आढावा घेऊया.

डिसेंबर १९७९ मध्ये रशियाने अफगाणिस्तावर आक्रमण केले.तेथील हाफिझुल्ला अमीन यांच्या नेतृत्वाखालील सरकार बरखास्त करून रशियाने आपल्या मर्जीतील बाबराक करमाल यांच्याकडे सत्ता सोपवली.मात्र करमाल यांना अफगाणिस्तान मधील जनतेने कधीच स्विकारले नाही.त्यांच्या नेतृत्वाखाली जमीन सुधारणा वगैरे जे कार्यक्रम हाती घेण्यात आले त्यांना अफगाणिस्तान मधील जनतेने तिव्र विरोध केला.त्यातून मुजाहिदीन (जिहादी ) या बंडखोरांचा जन्म झाला.या मुजाहिदीन बंडखोरांनी रशियन सैनिकांना सळो की पळो करून सोडले.१९७९ साली रशियाने अफगाणिस्तामध्ये सुरुवातीला तीस हजार सैनिक पाठवले होते,मात्र मुजाहिदीन कडून रशियन सैनिकांवर होणाऱ्या तिव्र हल्ल्यांमुळे १९८५ च्या सुमारास रशियाला, अफगाणिस्तान मधील आपल्या सैनिकांची संख्या एक लाखापेक्षा जास्त वाढवावी लागली.

तो शीत युध्दाचा काळ होता.अफगाणितानमध्ये रशियन सैन्य घुसल्यानंतर, अमेरिका गप्प बसणे शक्यच नव्हते.अमेरिकेने पाकिस्तानमार्गे मुजाहिदीनना सर्व प्रकारची रसद पुरवली. मुजाहीदीननी पाकिस्तानचा आश्रय घेतला आणि तिथून रशियन सैन्याबरोबरील आपली लढाई सुरू ठेवली. पाकिस्तानकडून मुजाहिदीनना सर्व प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले.१९८९ साली रशियाचे तत्कालीन अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी अफगाणिस्तान मधून आपला गाशा गुंडाळण्याचा निर्णय घेतला.त्यामागे महत्वाचे कारण होते,ते म्हणजे रशियन सैन्याची मोठ्या प्रमाणात झालेली हानी.त्याशिवाय आर्थिकदृष्ट्याही रशियाला ते परवडत नव्हते.रशियाने अफगाणिस्तान मधून काढता पाय घेतल्यानंतर तेथे गृहयुद्ध सुरू झाले.निरनिराळ्या टोळ्या एकमेकांविरूध्द लढू लागल्या.हिंसाचाराने संपूर्ण अफगाणिस्तानाला ग्रासले.१९९४ साली तालिबानी चळवळीचा जन्म झाला.पश्तो भाषेतील तालिबानचा अर्थ विद्यार्थी.या चळवळीचा जन्म कंदाहार प्रांतात झाला.धार्मिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी ही चळवळ सुरू केली.हिंसाचाराला कंटाळलेल्या अफगाणिस्तान मधील जनतेचा या चळवळीला चांगला पाठिंबा मिळाला.या चळवळीचे नेतृत्व केले, मुल्ला ओमर याने.१९९६ मध्ये तालिबान्यांनी काबूल वर कब्जा मिळवला आणि तेथे तालिबान्यांच्या नेतृत्वाखालील सरकार स्थापन झाले.

२००१ मध्ये अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दहशतवाद्यांनी भीषण हल्ला केला.त्या हल्ल्याचा सूत्रधार अलकैदा या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या ओसामा बिन लादेन हा असल्याचे अमेरिकेला माहीत झाल्यावर,अमेरिकेने त्याचा? शोध सुरू केला.तो अफगाणिस्तानमध्ये लपला असल्याचे लक्षात आल्यानंतर, अमेरिकेने,त्याला आपल्या ताब्यात देण्याची मागणी अफगाणिस्तान सरकारकडे केली.मात्र तेथील सरकारने त्या गोष्टीला नकार दिल्याने, अमेरिकेने अफगाणिस्तानवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला.२००१ मध्ये ओसामा बिन लादेन याच्या शोध मोहीमेवर, अफगाणिस्तानमध्ये उतरलेले, अमेरिकेचे सैन्य,नंतर २० वर्षे तिथेच अडकून पडले.त्या दरम्यान तालिबान्यांनी,अमेरिकन सैन्याशी दिलेली लढत अमेरिकेसाठी अनपेक्षित अशीच होती. अफगाणिस्तान हा देश लँड लॉक्ड असल्याने सैन्याला रसद पुरवण्यासाठी अमेरिकेला पाकिस्तानवर मोठ्या प्रमाणात अवलंबून रहावे लागले.त्याचा फायदा पाकिस्तानने मोठ्या प्रमाणात उठवला.पाकिस्तानने दुहेरी निती अवलंबली.एकीकडे अमेरिकेला मदत करण्याचे नाटक करुन, पाकिस्तानने अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा उकळला आणि दुसरीकडे पाकिस्तानमध्ये प्रवेश केलेल्या तालिबानी बंडखोरांना सर्व प्रकारची मदत पुरवून, पाकिस्तानने,त्यांना अमेरिकन सैन्याशी लढण्यासाठी आपल्या भूमीचा वापर करून दिला.अमेरिकेची व्हिएतनाम युध्दात जी मानहानी झाली, तशीच मानहानी अमेरिकेला अफगाणिस्तानमध्ये पत्करावी लागली.२०२१ साली अमेरिकेने अफगाणिस्तान मधून पूर्णपणे माघार घेतली.त्यानंतर अफगाणिस्तानमध्ये तालिबान्यांचे सरकार अस्तित्वात आले.अर्थात १९९६ मधील मुल्ला ओमर याच्या नेतृत्वाखालील तालिबानी राजवट आणि आताची तालिबानी राजवट यांच्यात गुणात्मक फरक आहे.इतक्या वर्षांच्या अनुभवातून तालिबान,बरेच काही शिकले आहेत.

ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेतल्यानंतर,मुत्ताकी यांच्या भारत भेटीचे काय परिणाम होतील ते थोडक्यात पाहूया. अफगाणिस्तानमधून अमेरिकेने माघार घेतल्याचा सर्वात जास्त आनंद पाकिस्तानला झाला. अफगाणिस्तानमध्ये तालिबानी राजवट प्रस्थापित झाल्यानंतर पाकिस्तानमध्ये त्याचे जोरदार स्वागत करण्यात आले.मात्र पाकिस्तानचा हा आनंद फार काळ टिकला नाही.पाकिस्तान तालिबान (तेहरिके तालिबान पाकिस्तान ) या दहशतवादी संघटनेने पाकिस्तानच्या आनंदावर विरजण ओतले.पाकिस्तान तालिबान संघटनेच्या अतिरेक्यांनी अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर करून पाकिस्तानमध्ये घातपात करायला सुरवात केली.त्यांना अफगाणिस्तान सरकारचा पाठिंबा असल्याचा आरोप पाकिस्तानने केला.पाकिस्तान तालिबानचा बिमोड करण्यासाठी मग पाकिस्तानी लष्कराने अफगाणिस्तान मधील त्यांच्या तळांवर हवाई हल्ले केले.

अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री मुत्ताकी हे भारताच्या दौऱ्यावर असताना, पाकिस्तानी हवाई दलाच्या हल्ल्यात पाकिस्तान तालिबानचे बरेच अतिरेकी मारल्याचा दावा पाकिस्तानने केला.तर अफगाणिस्तान कडूनही पाकिस्तानचे काही सैनिक मारल्याचा दावा केला गेला.थोडक्यात, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील संबंध या घटकेला कधी नव्हे इतके बिघडले आहेत.त्याचा फायदा भारताने उठवायलाच हवा.भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात कृषी, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा याबाबतीत परस्पर सहकार्य करण्यास बराच वाव आहे.विशेषत: खाण उद्योगात गुंतवणूक करण्याचे आवाहन,मुत्ताकी यांनी भारतीय कंपन्यांना केले आहे.भारताने अफगाणिस्तानमध्ये हॉस्पिटल आणि धरणे बांधून अफगाणिस्तानच्या विकासाला मोठा हातभार लावला आहे.अफगाणिस्तानमध्ये भारताला बऱ्याच संधी उपलब्ध आहेत.कतार आणि सौदी अरेबिया यांच्या मध्यस्थीने पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात शस्त्रसंधी झाला असला तरी तो किती काळ टिकेल हे आताच सांगता येणार नाही.मात्र अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यात वितुष्ट आल्याने त्याचा फायदा भारताला निश्चितपणे मिळणार आहे.मुत्ताकी यांच्या भारत भेटीचे फलित यामध्येच सामावलेले आहे.

**अभय गोखले**

# 'नरकचतुर्दशी'



ज्यावेळी पृथ्वीवर अत्याचार वाढतो,त्यावेळी निसर्गच त्या अत्याचाराचे निरसन करतो.या मृत्युलोकात कित्येक जणांनी अमरतेचे वरदान प्राप्त व्हावे म्हणून तपःश्चर्या केली.पण मृत्युलोकात कुणीही सप्तचिरंजीवां व्यतिरिक्त अमर राहू शकत नाही.सत्ययुगाच्या शेवटी हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू अत्याचारी असूर झालेत . त्यांच्यापासून पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी भगवान विष्णू ने वराहअवतार व नरसींह अवतार घेतला . हिरण्याक्षचा वध केल्यावर वराह अवतार व पृथ्वी पासून नरकासूर नावाचा मुलगा झाला . हा लहान असताना चांगला होता पण बाणासुराच्या संगतीने दुष्ट दुराचारी झाला . व प्रजेला खूप त्रास द्यायचा . त्याने १६,१०० राजकन्येचे अपहरण करून त्यांच्या स्वतःच्या बंदिखान्यात ठेवले होते .ऋषी मुनी व सामान्य प्रजेला खूप त्रास देत होता . एकदा नरकासुराने स्वर्गावर आक्रमण केले . इंद्रदेव व सगळे देवतांना बंदी केले . त्याचा सामान्यप्रजेवरील अत्याचार पाहून ऋषींनी त्याला विष्णूच्या हातून तुझा मृत्यू होईल असा शाप दिला . त्यानंतर नरकासूराने ब्रह्मदेवाची तपश्चर्या केली . ब्रह्मदेवाकडून ऋषी - मुनी - देव - गंधर्व - दानव - यक्ष - किन्नर यांच्या कडून त्याचा मृत्यू होणार नाही असा वर मागितला . त्यामुळे तो आणखीनच निर्भय होवून दृष्ट प्रवृतीने वागू लागला . देवमाता अदितीचे अमृत कर्णकुंडले नरकासुराने पळवून नेले . त्रस्त जनता देवाला नरकासुराच्या त्रासापासून लवकरात लवकर सुटका करा असे विनवू लागले . तेंव्हा कालांतराने द्वापार युगात श्रीहरी विष्णूने भगवान श्रीकृष्णाचा अवतार घेतला तेंव्हा कृष्णाची पत्नी सत्यभामा व कृष्ण जनउद्धारा करिता नरकासुराशी युद्ध करतात . युद्ध खूप घनघोर होतं . शेवटी भगवान श्रीकृष्ण आपल्या सुदर्शनाने नरकासुराचा वध करतात . आणि १६,१०० राजकन्यांना नरकासुराच्या कैदेतून मुक्त करतात . त्या मुक्त केलेल्या राजकन्या श्रीकृष्णाला म्हणतात की, 'आम्ही आता पर्यंत नरकासुराच्या कैदेत असल्याने आमच्याशी कुणीच लग्न करणार नाही . आमच्या घरचे लोक आम्हाला घरात घेणार नाही . तसेच इतर लोक आमच्या कडे वाईट नजरेने बघतील' म्हणून त्या आत्महत्या करणार होत्या . तेंव्हा भगवान श्रीकृष्ण त्या १६,१०० राजकन्यांना म्हणाले ,'आत्महत्या करणे हे पाप आहे . मी तुम्हा सर्वांशी लग्न करतो . आणि भगवान श्रीकृष्णाने त्यां राजकन्यांशी विवाह केला . या पहिले श्रीकृष्णाच्या आठ धर्मपत्नी होत्या . आता १६,१०० राजकन्येशी विवाह केल्याने श्रीकृष्णाच्या भार्या १६,१०८ झाल्यात . नरकासूराच्या त्रासापासून सर्व जनतेचे श्रीकृष्णाने रक्षण केले . अश्वीन महिन्यात कृष्ण चतुर्दशी च्या दिवशी ही घटना द्वापरयुगात घडली . म्हणून दिवाळीच्या पाच दिवसात एक 'नरक चतुर्दशी' हा एक दिवस आपण अत्याचारावर त्रासवर दुष्टतेवर विजय म्हणून आनंदाने हा नरकचतुर्दशी सण म्हणून साजरा करतो .



**डॉ. मिलिंद इंदूरकर**
मो.९५५२६०७६४६

# नरकासुराचा वध



दिवाळीचा सण जवळ येत आहे आणि संपूर्ण उत्तर भारत त्याच्या उत्साहाने जोरदार तयारी करत आहे. नवरात्रीनंतरच्या करावा चौथपासून दिवाळीचे दिवस मोजण्यास सुरुवात होते. तसेच, दक्षिणेत दिवाळी साजरी करण्याची परंपरा उत्तर भारतात तितकी प्रचलित नाही. दक्षिण भारतातही हा सण साजरा केला जातो, पण थोड्या वेगळ्या पद्धतीने.

उत्तर भारतात, दिवाळीचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे फटाके. शिवाय, दिवाळी ही हिंदू आर्थिक वर्षाची सुरुवात देखील दर्शवते. म्हणून व्यापारी देखील हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. उत्तर भारतातील अनेक भागात रामायणातील दृश्ये दर्शवणारी पथनाट्ये देखील सादर केली जातात. दिवाळीला फटाके फोडण्याची परंपरा बऱ्याच काळापासून चालत आली आहे. परंतु दक्षिणेत दिवाळी खूप वेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते.

दक्षिण भारतातील राज्यांमध्ये दिवाळी साजरी करण्याची परंपरा थोडी वेगळी आहे. त्या संबंधित वेगवेगळ्या श्रद्धा आहेत. तमिळनाडूमध्ये दिवाळी नरक चतुर्दशी म्हणून साजरी केली जाते. तमिळनाडूप्रमाणेच केरळमध्येही असा विश्वास आहे की हा सण भगवान श्रीकृष्णाने नरकासुर राक्षसाच्या वधाचे प्रतीक आहे. शिवाय, दक्षिण भारतात या दिवशी राजा बालीची पूजा केली जाते.हा उत्सव नरकासुराच्या वधाचे प्रतीक आहे.

दक्षिण भारतात, उत्तरेपेक्षा दिवाळी कमी थाटामाटात साजरी केली जाते. खरं तर, भारतातील दक्षिणेकडील राज्यांमध्ये, दिवाळी त्या दिवशी साजरी केली जाते जेव्हा भगवान श्रीकृष्णाची पत्नी सत्यभामा हिने त्यांना नरकासुराचा वध करण्यास सांगितले होते. ही तारीख सहसा दिवाळीच्या एक दिवस आधी येते. दिवाळी आमवस्येच्या दिवशी साजरी केली जाते. दक्षिण भारतात, नरक चतुर्दशी ही उत्सवाची खरी सुरुवात आहे.

# दीपावली : ज्ञानाच्या प्रकाशातून अज्ञानाच्या अंधाराचे दहन

**अज्ञानाचा अंधार नाहीसा करून मानवी जीवनात ज्ञानाचा प्रकाश उजळवणारा दिवाळीचा सण. सोनपावलांनी येणाऱ्या दिवाळीच्या प्रत्येक दिवसाला आध्यात्मिक-सांस्कृतिक महत्त्व आहे. त्याविषयी...**



दीपावली म्हणजे स्नेहाच्या-प्रेमाच्या प्रकाशाची उधळण होय. दिवाळी-दीपोत्सव म्हणजे खऱ्या अर्थाने आनंदाचा-प्रकाशाचा सण आहे. वास्तवात हा उत्सव समृद्धी देणारा सण आहे. वर्षभरातल्या चिंता, भय, ताणतणाव, महामारी यांची मरगळ झटकून टाकत नव्या उमेदीने जीवनाला सुखमय-आनंदमय करणारा हा सण आहे. अज्ञानाचा अंधार नाहीसा करून मानवी जीवनात ज्ञानाचा प्रकाश फैलवणारा हा सण आहे.

सोनपावलांनी येणाऱ्या दिवाळीच्या प्रत्येक दिवसाला आध्यात्मिक-सांस्कृतिक महत्त्व आहे.धनत्रयोदशीपासून ते भाऊबीजेपर्यंत प्रत्येक क्षणाक्षण हर्षोल्हासात साजरा केला जातो. तथापि दीपावलीचा शुभारंभ हा खऱ्या अर्थाने 'वसुबारस'पासून होत असून, सायंकाळी गाय-वासराची पूजा करून त्यांना नैवेद्य खाऊ घातला जातो.

त्यानंतर 'धनत्रयोदशी'ला म्हणजेच मुहूर्तानुसार देवापुढे धनधान्य व धने ठेवून त्याची पूजा करतात अन् सायंकाळी दक्षिण दिशेला कणकेचे दिवे लावून त्यांची पूजा केली जाते.

'नरक चतुर्दशी'च्या दिवशी म्हणजेच घरातील सर्व लहान-मोठे सदस्य पहाटे अभ्यंगस्नान करतात अन् त्यानंतर अंगणात फटाके फोडतात. २१ ऑक्टोबर रोजीच 'लक्ष्मीपूजन'देखील असून वद्य अमावस्येला सायंकाळी लक्ष्मी-कुबेराचे पूजन केले जाते. धनधान्य समृद्धी व सौख्य नांदावे हे त्याचे प्रतीक असते.

त्यानंतर कार्तिक शुद्ध प्रतिपदा म्हणजेच बलिप्रतिपदा. ज्यास आपण 'दीपावली पाडवा' असेही म्हणतो. हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक असून या दिवशी कोणत्याही शुभकार्याची सुरुवात केली जाते. या शुभदिनी पत्नी ही पतीला ओवाळून त्याच्यासाठी दीर्घायुष्य चिंतिते. तिला याप्रसंगी तिच्या आवडीची साडी भेट म्हणून दिली जाते. योगायोगाने या वर्षी याच दिवशी 'भाऊबीज'देखील असून, बहीण आपल्या भाऊरायाला ओवाळून पेढा भरवते अन् त्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी देवाला प्रार्थना करते. भाऊसुद्धा बहिणीला तिच्या आवडीची भेटवस्तू देतो. दागदागिन्यांची खरेदीही मोठ्या प्रमाणात केली जाते. वास्तवात हा सण म्हणजे आनंदाची पर्वणीच!

दीपावलीच्या चार-पाच दिवसांच्या काळात घरोघरी रोषणाई केली जाते. तसेच घरांच्या ओट्यावर-गॅलरीत मातीच्या पणत्या लावून सभोवतालचा परिसर प्रकाशमय केला जातो. वास्तवात हा दिव्यांचा-रोषणाईचा सण आहे. आपल्या आया-भगिनी अंगणात आकर्षक रंगोळ्या काढून सर्वांचे लक्ष वेधित असतात. रंगबेरंगी आकाश कंदिलांची उभारणी, नातेवाईक-मित्रमंडळींना फराळाची मेजवानी अन् फटाक्यांची आतषबाजीमुळे तर सारा परिसर दुमदुमून जातो. प्रत्येक जण पारंपरिक वेशभूषा करून इतरांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत असतो. चमचमीत फराळावर ताव मारून दिवाळीचा आनंद लुटण्याची मजा काही औरच असते. याशिवाय नातेवाईकांना-आप्तमित्रांना दिवाळीनिमित्त दिल्या जाणाऱ्या शुभेच्छांना तर पारावारच उरत नाही. 'ग्रीटिंग कार्ड' देऊन वा मोबाईलद्वारे मेसेज पाठवूनही दीपावलीच्या शुभेच्छा व्यक्त केल्या जातात. येनकेनप्रकारे आपल्या मित्रांना, सगेसोयऱ्यांना आपल्या दीपावली शुभेच्छा पोहोचविण्याचा हा सर्वकष प्रयत्न असतो, हे दृष्टोत्पत्तीस येते.

दीपावली हा पारंपरिक भारतीय सण मतभेद-मनभेद विसरून तुम्ही आम्ही सर्वजण आपली हजारो वर्षांपूर्वीची संस्कृती, परंपरा अधिकाधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न करत असतो. खरंतर दीपावली हा सण आता धर्ममर्यादा ओलांडून त्याने एक राष्ट्रीय उत्सवाचे स्वरूप प्राप्त केले आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. यातूनच खऱ्या अर्थाने धार्मिक सहिष्णुता प्रस्थापित होऊन 'सर्वधर्मसमभाव' निर्माण होण्यास चालना मिळते. समस्त युवक-युवतींचे भवितव्य उज्ज्वल होवो, तर ज्येष्ठांना निरोगी स्वास्थ्य लाभो, याच दीपावलीनिमित्त अनंत शुभेच्छा! मित्रहो, आपणा सर्वांना यंदाची दीपावली सुखा-समाधानाची,आनंदाची व भरभराटीची जावो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना!

# खरा प्रकाशोत्सव: फटाके नाही, दिव्यांचा प्रकाश...



प्रभू श्रीरामांनी रावणाचा पराभव करून चौदा वर्षांच्या वनवासानंतर अयोध्येला परतल्याचा आनंद म्हणून दिवाळी साजरी केली जाते, असे रामायणात सांगितले आहे. दिवाळी म्हणजे प्रकाशाचा उत्सव! दिवे लावून, आनंदाने हा सण साजरा करणे हीच खरी परंपरा आहे. परंतु आजकाल फटाके उडविल्याशिवाय दिवाळी साजरी होत नाही, असे चित्र दिसते. खरे पाहता, फटाके फोडून सण साजरा करण्याला कोणताही शास्त्रीय अथवा धार्मिक आधार नाही. कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांमुळे आजारी व्यक्ती, वृद्ध आणि नवजात बालके यांना प्रचंड त्रास होतो.ध्वनीप्रदूषणामुळे डोकेदुखी, रक्तदाब, हृदयविकार यांसारखे विकार वाढतात. फटाक्यांमुळे वातावरणात पसरलेला विषारी धूर आरोग्यास घातक ठरतो. अशा परिस्थितीत फटाके फोडणे कितपत योग्य आहे, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा.याहूनही दुर्दैवी बाब म्हणजे, आज बाजारात श्री लक्ष्मी, श्रीकृष्ण, श्रीविष्णू अशा देवतांची तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळक इत्यादी महान व्यक्तींची चित्रे असलेले फटाके विकले जातात. हे फटाके फोडल्यानंतर त्या चित्रांचे तुकडे रस्त्यावर, नाल्यात किंवा कचऱ्यात पडलेले दिसतात. यामुळे देवतांचा घोर अनादर आणि महापुरुषांचा अपमान होतो. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आपण श्री लक्ष्मीची कृपा मिळवण्यासाठी तिची पूजा करतो, आणि त्याच दिवशी तिचे चित्र असलेले फटाके फोडून तिचाच अनादर करतो. हा किती विरोधाभास आहे.देवतांची चित्रे असलेले फटाके फोडल्यास आपल्यावर देवतेची कृपा होईल कि अवकृपा ? देवतांचा अनादर करणे, हे पापच आहे आणि हे पाप आपण कळत-नकळतपणे प्रतिवर्षी करत असतो.दरवर्षी देशभरात फटाक्यांवर अब्जावधी रुपयांचा अपव्यय केला जातो, पण त्यातून केवळ प्रदूषण आणि आरोग्याचे नुकसानच होते. त्यामुळे आता बदल घडवण्याची वेळ आली आहे. दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे अंधारावर प्रकाशाचा विजय!

यावर्षी आपण फटाक्यांऐवजी दिव्यांच्या प्रकाशाने दिवाळी साजरी करू या. तेव्हाच दिवाळीचा खरा 'प्रकाशोत्सव' साकार होईल!

**प्रिया बागडदेव**

# चला आनंद वाटू या..

दिवाळी सण मोठा.. नाही आनंदाला तोटा ..असे आपण म्हणतो. गुलाबी थंडीच्या वातावरणात सर्वत्र उत्सवाचे वातावरण संचारले असते. परंतु दुसरीकडे आपण आनंदाच्या भरात वातावरण प्रदूषित तर करत नाही ना? असा प्रश्न निर्माण होतो आहे. विशेषता:फटाके उडविल्याने धुर ,हवा , पाणी प्रदूषित होताना दिसत आहे.त्याचबरोबर आवाजाचे सुद्धा प्रदूषण होत आहे. याचा गंभीर परिणाम मानवी जीवनावर होत आहे . आवाजाचे तथा बिगर आवाजाचे फटाके ,अनार ,फुलझडी भुई चक्र या पासून मोठ्या प्रमाणात रासायनिक धूर वातावरणात मिसळतो. विशेष म्हणजे याचा कमालीचा त्रास लहान बालक, वृद्ध व्यक्ती याना होतो. फटाके फोडताना काळजी न घेतल्यास भाजने ,आग लागणे असे अपघात सुद्धा घडतात. तेव्हा फटाक्यांचं प्रदूषण टाळू या ..निसर्गाला सुंदर बनवूया.. हा मंत्र जगण्याची निताँत गरज आहे. सोबत इतर गरिबांची अंधारलेली दिवाळी दूर करू या.. चला आनंद वाटू या..

**संजय वाघुळे**
मो.९८२३९३३१२०

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखव

अकोला
जिल्हा विशेष

# विद्युत खांब उभारणीसाठी झाडांची कत्तल : वन विभागाकडे तक्रार

## चान्नी रस्त्यावरील प्रकारामुळे पर्यावरणप्रेमींचा संताप



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील आलेगाव वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत चरणगाव ते चान्नी रस्त्याच्या बाजूने गेल्या काही दिवसांपासून विद्युत खांब उभारणीचे काम सुरू आहे. मात्र या कामासाठी कंत्राटदाराकडून झाडांची सर्रास कत्तल करण्यात येत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते राजरत्न कांबळे यांनी केला आहे.

या संदर्भात त्यांनी दिनांक १७ ऑक्टोबर रोजी आलेगाव वन विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. अनेक ठिकाणी झाडांच्या अगदी जवळ विद्युत खांब उभारण्यात आले असून काही ठिकाणी झाडांची थेट कत्तल करून खांब बसविण्यात आले आहेत. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याची चिंता स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.राजरत्न कांबळे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, 'चरणगाव ते चान्नी मार्गावरील झाडांची कत्तल करून खांब उभारणी केली जात आहे. या कृत्याविरुद्ध तातडीने कारवाई करण्यात यावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात येईल.'

सदर प्रकरणाची चौकशी करून झाडांची कत्तल करणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात वन विभागाकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

**झाडांची कत्तल – वन विभाग झोपेत! :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शासन दरवर्षी वृक्षलागवडीवर कोट्यवधी रुपये खर्च करत आहे. तरीसुद्धा चरणगाव ते चान्नी मार्गावरील विद्युत खांब उभारणीदरम्यान मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल केली जात आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून, काम कायदेशीर आहे की गैरकायदेशीर याची पडताळणी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### जाहिर सुचना

सर्व जनतेस व वित्तिय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री संगीता प्रविण लामतुरे रा. मोठी उमरी अकोला ता. अकोला व जि अकोला यांनी होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड अकोला येथे खालील वर्णनाचि मालमत्ता गहाण ठेवून कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला आहे.ष्शेत सर्वे नं ३१, गट नं १०२, प्लॉट नं ७५ मौजे उमरी प्रगणे बाळापूर क्षेत्रफळ ९०० चौ फूट ता. अकोला व जि अकोला. '

येणे प्रमाणे वर नमुद मालमत्ते ची खरेदी जिचा दस्त क्रमांक ५६७७/२०१३ दि. ०९.१२.२०१३ ज्यात लिहुन घेणार चंद्रकलाबाई नामदेवराव पानझडे व लिहुन देणार देवलाल मोतीराम पद्माने हे आहेत सदर दस्त १६.१०.२०२५ रोजी श्री संगीता प्रविण लामतुरे द्वारे गहाळ झाला असुन रामदासपेठ पोलीस स्टेशन ता. अकोला व जि अकोला येथे रोजी दस्त गहाळ झाल्याचा रिपोर्ट दि १७.१०.२०२५ रोजी नोंद्विला आहे.

ज्या अर्थी वरील मालमत्ते वर कोणाचे काही कर्ज हक्क, बोजा , गहाण, अधिकार ताबा / आक्षेप असेल त्यांनी सदर सूचना प्रकशित झाल्यापासून ७ दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्रि पुराव्यासह आक्षेप नोंद्वावा अन्यथा कोणाचाही कसलाही स्वरूपाचा आक्षेप नाही असे समजुन होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड अकोला हे वरिल मालमत्ता गहाण संगीता प्रविण लामतुरे रा. मोठी उमरी अकोला ता. अकोला व जि अकोला याना कर्जाचि रक्कम वितरीत करतील त्यानंतर कोणाचीहि कसलीहि हरकत वा उजर चालनार नाही, याचि नोंद घ्यावी.

अकोला
दि :- १८.१०.२०२५

अधिवक्ता
विरेंद्र सुरेशकुमार नान्दे
पत्ता : रामधन प्लॉट रामदासपेठ अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०१/२०२५ प्रोसेस नं.१७६६६/२०२५
चौ.ता. २५/११/२०२५ दिनांक : १८/१०/२०२५

**अर्जदार :** Dilip Brijmohan Gupta R/o Gaurakshan Road, Akola Tq dist Akola

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** 1. Smt. Vijay Sitaram Purwar R/o Pratap Chowk, Saraf Bazar, Amravati, Tq Dist Amravati 2.Jagdish Brijmohan Gupta R/o Khoja Khan Road, Near sindhi Dharmshala, Gandhi Bag Nagapur Tq dist Nagpur 3.Jawahar Brijmohan Gupta R/o Mangalam Pratap Chowk Saraf Bazar, Amravati tq Dist Amravati. 4. Asha Omnarayan Gupta R/o Rajiv Gandhi Lane, Shivkarta Road, Lal Bangla Harjindar Nagar Kanpur - 208007 5. Santosh Brijmohan Gupta- R/o C/o Bhagwandas Gopicharan House, Sakkarsath, Amravati, Tq Dist Amravati. 6. Purushottam Brijmohan Gupta R/o Sai Sadan Gourakshan road Akola Tq And Dist Akola

**मयताचा पत्ता :-** मयत : १. मिराबाई ब्रिजमोहन गुप्ता २. ब्रिजमोहन गोपीचंद गुप्ता

**पत्ता :-** रा. बालाजी मंदीर जवळ अमरावती

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयान वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, १. मिराबाई ब्रिजमोहन गुप्ता यांचे दि. १९/०२/२०११ रोजी अमरावती येथे निधन झाले. तसेच २. ब्रिजमोहन गोपीचंद गुप्ता यांचे दि. ०८/०९/२००९ रोजी रा. अमरावती येथे निधन झाले. वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

अर्जक्रमांक :-११६/२०२५ कलम- १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :** - हनुमान मंदिर मनात्री बु. ता. तेल्हारा, जि. अकोला.

**अर्जदार :-** श्री. प्रशांत भगवान थोरात रा. मनात्री बु. ता. तेल्हारा, जि. अकोला.

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदर चा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? २ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? **अ) जंगम मिळकत (वर्णन) :** निरंक

**आ) स्थावर मिळकत ( वर्णन ) :-** मौजे - मनात्री बु. ता. तेल्हारा जि. अकोला येथील मालमत्ता क्रमांक - २६ ऐकून जागेचे क्षेत्रफळ 46x34 = 1564 चौरस फुट त्यावर बांधकाम केलेले हनुमान मंदिर 30x34 = 1020 चौरस फुट उर्वरित खुली जागा आहे.

**जागेची चतुः सिमा :-** पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : रस्ता, दक्षिणेस : ग्रा.पं. कार्यालय स्थावर मालमत्तेची किंमत रु.१९, ५५, ११५/-

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सही निशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-०१-१०- २०२५ रोजी दिली.

शिक्का
**प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८८२/२०२५ प्रोसेस नं.१७२७९/२०२५
चौ.ता. २८/११/२०२५ दिनांक : १३/१०/२०२५

**अर्जदार :** १. शोभा भरतराव पारतवार २. संतोष भरतराव पारतवार दोघेही रा. माँ रादंल रेन्सीडेन्सी, आर–७, गिता नगर, दुबे एस. डी. टी. जवळ, अकोला. ता. जि. अकोला. ३. पदमशाली वर्षाबेन रा. आदर्श अपार्टमेंट, हाडकेश्वरजवळ, खोखरा, अहमदाबाद, ता. जि. अहमदाबाद ४. कुमुद रवि गड्डमवार रा. दत्तात्रय नगर, सर्वेश्वर मंदिराजवळ, अयोध्या नगर, नागपूर, ता. जि. नागपूर ५. मंगेश भरतराव पारतवार रा. द्वारा चंद्रकला इंगळे, प्लॉट क. १६, श्रीराम नगर, अयोध्या नगर, नागपूर ता. जि. नागपूर.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : भरत केशवराव पारतवार

**पत्ता :-** रा. माँ रादंल रेन्सीडेन्सी, आर–७, गिता नगर, दुबे एस. डी. टी. जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भरत केशवराव पारतवार यांचे दि. ०४/०२/२०२३ रोजी विघ्नहर्ता हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८७३/२०२५ प्रोसेस नं.१७२८९/२०२५
चौ.ता. १५/११/२०२५ दिनांक : १३/१०/२०२५

किरकोळ अर्ज क्र./४०१/२०२५ — दिनांक १०.११.२०२५

**अर्जदार -**
१. रामभाऊ लक्ष्मण माहोरे, वय ६८ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त
रा.भारत माता नगर, एन-१२, सिडको कॉलनी, औरंगाबाद (छ.संभाजी नगर) ता.जि.औरंगाबाद (छ.संभाजी नगर)
२. विजय लक्ष्मणराव माहोरे, वय ५४ वर्षे, धंदा - मजुरी
रा.नारायण नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. कांता बळीराम कंटाळे, वय ७२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.खाटीकपुरा बाभळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. लता बाळू पारडे, वय ५९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.राजपुत पुरा, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
५. प्रमिला सुभाष मंडवे, वय ५९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.मानकर पुरा शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **लक्ष्मण तुकाराम माहोरे उर्फ लक्ष्मण तुकाराम माहुरे** हे दिनांक **१७.०९.२०२४** रोजी मरण पावले आहेत. तसेच त्यांची पत्नी सुभद्राबाई लक्ष्मण माहोरे ही दिनांक **१२.०८.२०१५ रोजी मरण पावली आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** - मयत **लक्ष्मण तुकाराम माहोरे उर्फ लक्ष्मण तुकाराम माहुरे** यांचे नांवे मौजा येवदा, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील नझूल शिट नं.५, प्लॉट नं.८२४ क्षेत्र ६४.२० चौ.मी.(ग्रा.मा.क.१४५६) अशी मिळकत असून त्याची अंदाजे किंमत २५,००० रु.आहे.

आज दि.**१५.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज **दि. २६/०९/२०२५** रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्रा.थडी** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्रा.थडी** यांनी बोलाविल्यानुसार **ग्रामपंचायत कार्यालय** येथे हजर झालो. **जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी** ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नाव **हयातुलीसा अब्दुल बशीर** अर्जात नमूद जन्म/मृत्यू दि.३/७/१९८५ च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्रा.थडी** येथील स्थनिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादींबद्दल आम्हांला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहित वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर- योग्य ते नमूद करा)

४)....

करिता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नाव | सही |
|---|---|
| १. सौ. पद्माताई सं. मेसकर (सरपंच) | |
| २. श्री. अतुल सा.दारोकार (उपसरपंच) | |
| ३. इजाज्जोदीन मो.इनामदार (त.यु.अ.) | |
| ४.क्रांतीकुमार श.काळे (पो.पा.) | |
| ५ . नंदकिशोर भि. वासनकर (ग्रा.स.) | |

समक्षः

शिक्का

**निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी, तथा**
**ग्रामपंचायत नोंदणी अधिकारी**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक ०६.१०.२०२५

आज दिनांक ०६.१०.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी, यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **हसिनाबी शेख इनायत** अर्जात नमुद **जन्म**/मृत्यू दिनांक --------------------- च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१. **जन्म** /मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२. सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटूंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३. सदरील जन्म/मृत्यू नोद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करावे)

४.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही, |
|---|---|
| १. सौ.पद्माताई सं.मेसकर (सरपंच) | सौ.पद्मा सं.मेसकर |
| २. श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच) | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३. श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार (त.भू.अ.) | श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार |
| ४. श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | श्री.कांतीकुमार रा.काळे |
| ५. श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.स.) | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

समक्ष

शिक्का

निबंधक,
जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत, ब्राम्हणवाडा थडी

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दिनांक १०.१०.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी, यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अ.राजीक** अर्जात नमुद **जन्म**/मृत्यू दिनांक **०१/०७/१९६३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१. **जन्म** /मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२. सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटूंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३. सदरील जन्म/मृत्यू नोद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता/नजरचूक** हे आहे. (नोदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करावे)

४.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही, |
|---|---|
| १. सौ.पद्माताई सं.मेसकर (सरपंच) | सौ.पद्मा सं.मेसकर |
| २. श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच) | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३. श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार (त.भू.अ.) | श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार |
| ४. श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | श्री.कांतीकुमार रा.काळे |
| ५. श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.स.) | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

समक्ष

शिक्का

निबंधक,
जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत, ब्राम्हणवाडा थडी

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दिनांक १०.१०.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी, यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अ.सादीक अ. कदीर** अर्जात नमुद **जन्म**/मृत्यू दिनांक **०१/०७/१९६३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१. **जन्म** /मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२. सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटूंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३. सदरील जन्म/मृत्यू नोद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करावे)

४.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही, |
|---|---|
| १. सौ.पद्माताई सं.मेसकर (सरपंच) | सौ.पद्मा सं.मेसकर |
| २. श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच) | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३. श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार (त.भू.अ.) | श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार |
| ४. श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | श्री.कांतीकुमार रा.काळे |
| ५. श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.स.) | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

समक्ष

शिक्का

निबंधक,
जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत, ब्राम्हणवाडा थडी

प्रो.नं.४०३८/२०२५
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१७.१०.२०२५

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./४१७/२०२५ — दिनांक २४.११.२०२५

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. शेख फरीद शेख मुनीर, वय ६२ वर्षे, धंदा - मजुरी
२. महेरुन्निसा शेख कय्यूम, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
३. शेख दानिश शेख कय्यूम, वय २६ वर्षे, धंदा - घरकाम
४. शेख आतिक शेख कय्यूम, वय ७९ वर्षे, धंदा - शिक्षण
सर्व रा.राणीपुरा बाभळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **शे.मुनीर शे.रहीम उर्फ शेख मुनीर शेख रहीम** हे दिनांक **१२.०१.१९९०** रोजी मरण पावल्या आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **शे.मुनीर शे.रहीम उर्फ शेख मुनीर शेख रहीम** यांचे नांवे मौजा दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील नगर भूमापन क.६००, शिट नं.२५, प्लॉट नं.६०० क्षेत्र १४० चौ.मी. अशी मिळकत असून त्याची अंदाजे किंमत २५,००० रु.आहे.

आज दि.**१७.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक ०६.१०.२०२५

आज दिनांक ०६.१०.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, **जन्म** व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी, यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अब्दुल कलाम शेख इनायत** अर्जात नमुद **जन्म**/मृत्यू दिनांक **०४/०५/१९६५** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१. **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२. सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटूंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३. सदरील जन्म/मृत्यू नोद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करावे)

४.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही, |
|---|---|
| १. सौ.पद्माताई सं.मेसकर (सरपंच) | सौ.पद्मा सं.मेसकर |
| २. श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच) | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३. श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार (त.भू.अ.) | श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार |
| ४. श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | श्री.कांतीकुमार रा.काळे |
| ५. श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.स.) | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

समक्ष

शिक्का

निबंधक,
जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत, ब्राम्हणवाडा थडी

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक २०.०९.२०२५

आज दिनांक २०.०९.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी, यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मो.मुस्तकिन शेख अमीन** अर्जात नमुद **जन्म**/मृत्यू दिनांक **२८/०६/२०११** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१. **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२. सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटूंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३. सदरील जन्म/मृत्यू नोद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करावे)

४.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही, |
|---|---|
| १. सौ.पद्माताई सं.मेसकर (सरपंच) | सौ.पद्मा सं.मेसकर |
| २. श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच) | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३. श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार (त.भू.अ.) | श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार |
| ४. श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | श्री.कांतीकुमार रा.काळे |
| ५. श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.स.) | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

समक्ष

शिक्का

निबंधक,
जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत, ब्राम्हणवाडा थडी

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक २०/०९/२०२५

आज दिनांक **२०.०९.२०२५** रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, **जन्म** व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी, यांनी बोलाविल्यानुसार **ग्रामपंचायत कार्यालय** येथे हजर झालो. **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अब्दुल कदीर शेख मन्सुर** अर्जात नमुद **जन्म**/मृत्यू दिनांक **०१/०७/१९५९** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१. **जन्म** /मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२. सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटूंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३. सदरील जन्म/मृत्यू नोद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता/नजरचुक** हे आहे. (नोदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करावे)

४.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही, |
|---|---|
| १. सौ.पद्माताई सं.मेसकर (सरपंच) | सौ.पद्मा सं.मेसकर |
| २. श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच) | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३. श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार (त.भू.अ.) | श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार |
| ४. श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | श्री.कांतीकुमार रा.काळे |
| ५. श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.स.) | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

समक्ष

शिक्का

निबंधक,
जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत, ब्राम्हणवाडा थडी

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दिनांक **२६.०१.२०२५** रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी, यांनी बोलाविल्यानुसार **ग्रामपंचायत कार्यालय** येथे हजर झालो. **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शाहीस्ता परविन अ.रफिक** अर्जात नमुद **जन्म**/मृत्यू दिनांक **१९/०९/१९७६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१. **जन्म** /मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हा **पथ्रोट** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२. सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटूंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३. सदरील जन्म/मृत्यू नोद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करावे)

४.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही, |
|---|---|
| १. सौ.पद्माताई सं.मेसकर (सरपंच) | सौ.पद्मा सं.मेसकर |
| २. श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच) | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३. श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार (त.भू.अ.) | श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार |
| ४. श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | श्री.कांतीकुमार रा.काळे |
| ५. श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.स.) | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

समक्ष

शिक्का

निबंधक,
जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत, ब्राम्हणवाडा थडी

## जाहीर सुचना

सर्व आम जनतेस या जाहीर सुचनेद्वारा सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **सचिन रामचंद्र वानखडे**, रा.कान्होली, ता.दर्यापूर, जि.अमरावती यांचे मौजे-हुसेनपूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती भोगवटदार वर्ग-१, भूमापन क्र.२३३, क्षेत्रफळ १.१५ हे.आर, आकार ५.६५ असलेली मालमत्ता **अमोल अशोक गवई** रा.तपोवन, अमरावती या आतेभावाने मयत **अशोक बापुराव गवई** मयत झाल्यावर गैरकायदेशीररित्या माझे पक्षकाराची परवानगी तसेच संमती न घेता परस्पर अपराधिक संगनमताने शेत विक्रीस काढले आहे. सदर वर्णनाची शेती ही वादग्रस्त असून तिचा कचेरी वाद, कौटुंबिक वाद चालू आहे. माझे पक्षकाराचे सदर शेतात कापसाचे उत्पन्न आहे. त्यामुळे सदर शेताचा खरेदी-विक्रीचा सौदा, दलालांनी तसेच आम नागरिकांनी करु नये व **अमोल अशोक गवई** सोबत कोणताही व्यवहार केल्यास होणाऱ्या नुकसानास माझे पक्षकार जबाबदार राहणार नाही. तसेच अनधिकृतपणे शेतात आल्यास पिकाच्या संरक्षणासाठी अपमान करुन हाकलून देण्यात येईल व आत्मसंरक्षणाची कायदेशीर कारवाई केली जाईल, याची नोंद घ्यावी.

करीता ही जाहीर सूचना दिली असे.

ठिकाण - अमरावती
दिनांक - १८/१०/२०२५

(ॲड.के.एस.पडोळे)
वडाळी नाका,
अमरावती
मो.८४२१२२११३२

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# विद्यापीठाच्या कुलगुरू, प्र-कुलगुरु आणि उच्च शिक्षण सहसंचालकाचा गौडबंगाल कारभार!

## सेवानिवृत्त व्यक्तीला प्राचार्य पदाची मान्यता शासनाचा निधी हडपण्याचा सामुहिक प्रयत्न उघड

**मुर्तिजापूर**-स्थानिक श्री. गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापूर, जि. अकोला येथील एका प्राध्यापिकेने या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना विद्यापीठ आणि शासनाने दिलेल्या मान्यते विरोधात एल्गार पुकारला असून महामहीम राज्यपाल, मुख्यमंत्री, महिला आयोग, जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, आणि इतर अनेक ठिकाणी तक्रार दाखल केली.

या तक्रारीनुसार, आपल्या अश्लील, अर्वाच्य आणि अत्यंत घाणेरड्या वागणुकीने शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च समजल्या जाणा-या प्राचार्य पदाला काळीमा फासणारे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. संतोष उर्फ भुजंग ठाकरे संपुर्ण राज्यभरात कुप्रसिद्ध आहेत. सर्व समाजमाध्यमांवर त्यांचे कारनामे जनतेने उघड्या डोळ्याने पाहून मोठ्या प्रमाणावर निषेध नोंदवला होता. डॉ. संतोष उर्फ भुजंगच्या जन्म तारखे संदर्भात मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांनी व्दिसदस्यीय समिती गठित करुन सखोल चौकशी केली. सदर समितीने डॉ. संतोष उर्फ भुजंग याने संपुर्ण जीवनामध्ये जिथे-जिथे शासकीय सेवा दिली व जिथे जिथे शिक्षण घेतले अशा सर्व संस्थाना प्रत्यक्ष भेट देवुन प्रत्येक बाबीची सखोल चौकशी, तपासणी करुन सबळ पुरावे जमा केले. या चौकशीचा विस्तृत अहवाल समितीने मा. सहसंचालक यांना सादर केला. या समितीच्या अहवालानुसार डॉ. संतोष उर्फ भुजंग याची जन्म तारिख ही १ ऑक्टोबर १९६२ असल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी शासनाची आणि विद्यापीठ प्रशासनाची दिशाभूल केल्याचे देखील स्पष्ट झाले. त्यानुसार डॉ. संतोष उर्फ भुजंग हे नियमानुसार दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले.

याच काळात महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी डॉ. संतोष उर्फ भुजंग याच्या विरोधात दाखल केलेल्या याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाने, न्याय प्राप्त करण्यासाठी सर्वप्रथम विद्यापीठ ट्रिब्यूनल मध्ये प्रकरण दाखल करावे अशी सूचना केली. परंतु डॉ. संतोष उर्फ भुजंग याने या सूचनेचा गैरअर्थ पसरवला. विद्यापीठातील काही अधिकाऱ्यांना हाताशी घेऊन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेचा वापर चुकीच्या पद्धतीने करून प्राचार्य पदाची मान्यता मिळविण्यासाठी बाध्य केले. हि मान्यता प्रदान करीत असतांना विद्यापीठ प्रशासनाने उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाशी संपर्क साधून माहिती देखील मागविली. परंतु, प्राप्त माहितीला हेतुपुरस्सरपणे दुर्लक्षित करून डॉ. संतोष उर्फ भुजंग याने वापरलेल्या साम, दाम, दंड आणि भेद आयुधांमुळे शरणागती पत्करून मान्यता दिली.हे प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही तर, शासन नियुक्त समितीच्या अहवालाला शासनाच्याच उच्च शिक्षण सहसंचालक पदाची जबाबदारी स्विकारलेल्या डॉ केशव तुपे नामक अधिकाऱ्याने डॉ. संतोष उर्फ भुजंग यांची जन्म तारिख ही १ ऑक्टोबर १९६२ असल्याचे व त्यानुसार डॉ. शासकीय नियमानुसार ३० सप्टेंबर २०२४ रोजी ते सेवानिवृत्त होतात. संबंधित प्राचार्य शासनाची दिशाभूल केली हि बाब लपवून आर्थिक लाभापायी प्राचार्य पदाची मान्यता दिली. यामुळे डॉ. संतोष उर्फ भुजंग याला शासनाकडून प्रचंड मोठी रक्कम मिळवून देण्याची सुपारी विद्यापीठ आणि सहसंचालक कार्यालयाने घेतल्याचा गंभीर आरोप या प्राध्यापिकेने केला आहे.

यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी हेतुपुरस्पर हा गैरव्यवहार केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या तीन अधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालक यांनी या प्रकरणात वेळीच लक्ष न घातल्यामुळे व्यक्तिश: जबाबदार धरले आहे. या प्रकरणामुळे संबंधित प्राध्यापिकेच्या तसेच तिच्या कुटुंबियांच्या आणि सहकाऱ्यांच्या जीविताला धोका असल्याची बाब या निवेदनात स्पष्ट करण्यात आली आहे. या प्रकरणी तात्काळ कार्यवाही न केल्यास, पोलीस तक्रार दाखल करणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.या प्रकरणात प्रचंड मोठी आर्थिक देवाणघेवाण होऊन शासनाचा निधी हडपण्याचा सामुहिक प्रयत्न उघड होत असल्याचे जाणवते. शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे पवित्र मानल्या जाणाऱ्या शिक्षकी पेशाला काळीमा फसल्या जात आहे, हे मात्र नक्की.

# पुनम बंगाळे सुवर्ण पदकाची मानकरी

## १०० व २०० मीटर धाव स्पर्धेत प्रथम क्रमांक

**बुलडाणा**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे नुकत्याच झालेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजची विद्यार्थीनी पुनम बंगाळे हिने १०० व २०० मीटर शर्यतीत प्रथम क्रमांक प्राप्त करुन दोन सुवर्ण पदके मिळविली. पुनम हिने क्रीडा क्षेत्रात महाविद्यालयासह बुलडाणा शहराचा गौरव वाढविला आहे.



पुनम बंगाळे ही बी.एस्सी. भाग-१ ची विद्यार्थीनी असून अतिशय अटीतटीच्या झालेल्या स्पर्धेत तिने १०० मी व २०० मीटरची शर्यत पूर्ण करून आपला वेग आणि कौशल्य सिध्द केले. स्पर्धेत अनेक स्पर्धक आणि विद्यापीठांच्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या दुहेरी विजयामुळे मॉडेल डिग्री कॉलेजचे नाव संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठस्तरावर चमकले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी पुनमचे विशेष अभिनंदन केले. तिचा हा विजय केवळ महाविद्यालयासाठी नव्हे, तर सर्व महिला खेळाडूंसाठी एक प्रेरणास्त्रोत आहे. आता राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामागिरी करण्याचे ध्येय असल्याचे पुनम यावेळी म्हणाली. ती विद्यापीठाचे बेंगलोर येथे होणा-या स्पर्धेत प्रतिनिधित्व करणार आहे. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागप्रमुख प्रा.सुनिता गायकी, डॉ.महेश व्यवहारे, क्रीडा समिती सदस्य प्रा.किशोर बुलकडे, प्रा.तुषार पारवे यांनी पुनमला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय निवड चाचणी व स्पर्धा

**अमरावती/का.प्र.**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे१८ ते १९ ऑक्टो. दरम्यान सकाळी ८ वा. अमरावती जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनतर्फे जिल्हास्तरीय निवड चाचणी व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशन तर्फे आयोजित महाराष्ट्र राज्य सीनियर पुरुष व महिला अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धा २०२५ नागपूर येथे २६ ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान पार पडणार आहे. या स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणी व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



श्री हव्याप्र मंडळाच्या सचिव व अमरावती जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या अध्यक्षा प्रा. डॉ. माधुर्री चेंडके यांच्या मार्गदर्शनाखाली हि निवड चाचणी मंडळाच्या बास्केटबॉल कोर्टावर होणार आहे. अमरावती जिल्ह्यातील सर्व पात्र पुरुष व महिला बास्केटबॉल खेळाडूंनी या निवड चाचणीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे सचिव डॉ. मधुकर बुरनासे व महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशनचे सहसचिव जयंत देशमुख यांनी केले आहे. खेळाडूंनी १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता निवड चाचणीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन विजया खोत – अध्यक्ष, धनंजय विटाळकर – सदस्य, दिलीप वाट – सदस्य, आकांक्षा माहूरे – सदस्य करण्यात आले आहे. अधिक माहिती करिता डॉ. मधुकर बुरनासे – ९४२३६४९४१०, नितीन पोटे – ९४०४३३८४९० यांचेकडे संपर्क साधता येईल. या निवड चाचणीच्या माध्यमातून अमरावती जिल्ह्यातील गुणवंत खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.

# विद्यापीठाच्या सोशल मिडियाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## कुलगुरूंच्या हस्ते सत्कार



**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मिडिया सेलला अवघ्या काही दिवसातच उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला आहे. जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी यासाठी घेतलेल्या पुढाकारामुळे विद्यापीठाचा नावलौकीक वाढत असून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व सोशल मिडियाचे काम पाहणारे अनिकेत ठाकरे यांचा कुलगुरू कार्यालयात पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे उपस्थित होते. सोशल मिडियाच्या कार्यामध्ये जनसंपर्क विभागातील ओम जगताप, रजनी चपाटे, सुनिल महल्ले, अशोक मोरे, मयूर डांगे, विजय झाडे या सर्वांचे सहकार्य लाभले आहे.

# कौंडण्यपूर येथील कार्तिक यात्रेमध्ये रंगारंग कार्यक्रमांची मेजवानी

## अंबा रुख्मिणी महोत्सव २०२५ ची पहिली बैठक



**कौंडण्यपूर**-विदर्भाची पुरातन राजधानी, भगवान श्रीकृष्णाचे सासर, माता रुक्मिणीचे माहेरघर आणि कुलस्वामिनी अंबिका मातेचे शक्तीपीठ असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील कार्तिक यात्रेमध्ये दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा या यात्रेमध्ये विविध रंगारंग कार्यक्रमांची मेजवानी घेऊन येणाऱ्या ''महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा'' नामक ''अंबा-रुख्मिणी महोत्सव-२०२५'' ची पहिली बैठक अंबिका देवी मंदिर मंगल कार्यालय येथे संपन्न झाली. अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष श्री रविराजजी देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सदर बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये तीन दिवस साजरे होणारे विविध उपक्रमांची माहिती महोत्सव समितीचे सचिव अक्षय पुंडेकर यांनी दिली.

बैठकीमध्ये सर्वप्रथम यावर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाबद्दल चर्चा करण्यात आली. ज्यामध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठा बोटिंग शो म्हणजेच नयनरम्य नौका स्पर्धा, एक लाख दिव्यांचा दीपोत्सव, संगीत मैफिल, लोककला व सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छता अभियान, शासकीय योजनाविषयक विविध उपक्रम, विदर्भस्तरीय भव्य एकता मॅरेथॉन स्पर्धा अशा विविध क्षेत्रातील बहारदार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून विजेता स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे सुद्धा वितरित करण्यात येणार आहे. बैठकीमध्ये उत्सव समितीच्या सभासदांकडून यावर्षी काही नवीन उपक्रम ठरविले. त्याचबरोबर यावर्षीच्या कार्यक्रमाची तारीख ८ ते १० नोव्हेंबर ही निश्चित करण्यात आली असून कार्यक्रम पत्रिका लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. सदर बैठकीचे संचालन गजानन बांबल यांनी केले.सत्कार समितीचे अध्यक्ष व अंबिका देवी संस्थानचे पुजारी श्री नरेंद्र महाराज पुरी, सौ. नायर (सरपंच कुऱ्हा) यांची विशेष उपस्थिती होती. त्याचबरोबर अमोल शेंडे, संतोष मठिये, दिनेशराव ठाकरे, शरद तालन, पांडुरंगजी सराडे, अतुल ठाकरे, विनायकराव कडू, अमोल पुंडेकर, मुकेश पवार, अंकुश देऊळकर (तंटामुक्ती अध्यक्ष, कौंडण्यपूर), प्रशांत कडू, बाळूभाऊ ठाकरे, प्रदीपराव डुबे, गजानन सुखदाम, संतोष अंबाडकर, दिलीपराव मेहकर, गणेश बांबल, आशिष डुबे, संदीप सोटे, मोरेश्वरराव मुळे, रामप्रभु खापरे, विनोद महल्ले, निखिल ठाकरे, संतोष साठवणे, श्रीरामजी केवदे, सुभाष खंडारे, सोनाजी खडसे, गोपी वेरुळकर, दादाराव सर्जे, आकाश ठाकरे, वैभव ठाकरे, आनंद मनोहर, पवन नागमोते, अर्पित डुबे, अक्षय निहाटकर, प्रफुल कडू, शुभम अर्मळ, अभय मेहकर, दक्ष खंडारे, ओम राऊत, रोहित जुमडे, तेजस वानखडे, प्रतीक नेवारे, वैभव हेटे, चेतन नेमाडे, प्रयास भाकरे, राहुल गोहत्रे, सार्थक कदम, संकेत धोटे, हर्षल क्षीरसागर, ओम बोन्डाने, तेजस राजगुरे, यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिवसा तालुक्यातील जि.प.तीन सर्कलमध्ये ८२ हजार ३६ मतदार

## मतदार यादीवर एकही आक्षेप नाही

**तिवसा/वार्ताहर**

जिल्हापरिषद व पंचायतसमिती निवडणुकी संदर्भात गट व गणाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाली असून यावर आक्षेप घेण्याच्या मुदतीपर्यंत कुठलाही आक्षेप - नसल्यामुळे ही यादी आता अंतिम प्रारूप मतदार यादी म्हणूनच मानल्या जाईल. यामध्ये तिवसा तालुक्यातील जि.प.व पं. स. सर्कलमध्ये एकूण ८२ हजार ३६ मतदार आहे.

तालुक्यात जिल्हापरिषदेचे ३५ तळेगाव ठाकूर, वहा, कुहा असे तीन गट असून तळेगाव ठाकूर जि. प. गटात १२ हजार ४७६ पुरुष, तर १२१४५ स्त्री असे एकूण २४६२१ मतदार असून पैकी वरखेड पंचायतसमिती गटात पुरुष - स्त्री असे १२ हजार ७७३ मतदार आहे. तळेगाव ठाकूर गटात ११ हजार ८४८ मतदार आहे. ३६ वन्हा जि.प. या गटात १४७१२ पुरुष, १४२२७ स्त्री असे एकूण २८ हजार ९३९ मतदार असून पैकी वहा गणात पुरुष- स्त्री मिळून १४ हजार ६८ मतदार आहे. मोझरी गणात १४ हजार ८७१ मतदार आह ३७ कुन्हा जि.प. गटात १४ हजार ३७३ पुरुष, १४१०३ स्त्री असे एकूण २८ हजार ४७६ मतदार असून पैकी मारडा या गणात १३ हजार ७५७ स्त्री-पुरुष मतदार आहे, तर कुन्हा या गणात १३ हजार ७५७ स्त्री-पुरुष मतदार आहे.




एकंदरीत जिल्हापरिषद पंचायतसमिती निवडणुकीचे वारे जोरात वाहत असून उत्सुक उमेदवारांच्या नावाची चर्चा होत असून निवडणुकीच्या तारखेकडे डोळे लागले आहे.

# संक्षिप्त

## थेट कर्ज योजनेतील लाभार्थ्यांची ईश्वर चिठ्ठीद्वारे निवड

**अमरावती**- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत थेट लाभाची योजना राबविण्यात येते. या योजनेतील लाभार्थ्यांची ईश्वर चिठ्ठीद्वारे निवड करण्यात येणार आहे. ही सोडत मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी दुपारी चार वाजता काढण्यात येणार आहे.यात १२५ लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. निवड करण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांमध्ये ६३ पुरुष व ६२ महिला लाभार्थी राहणार आहेत. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत प्रकल्प मर्यादा एक लाख रुपये आहे. या योजनेंतर्गत एकूण १७५ कर्ज मागणी अर्जांपैकी १७३ अर्ज पात्र झाले आहेत. त्यामध्ये ११९ पुरूष व ५४ महिला आहेत. यातील ६३ पुरूष आणि ६२ महिला लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.ही सोडत दि. २८ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पोलिस आयुक्त कार्यालयामागे, कॅम्प, अमरावती काढण्यात येणार आहे, अशी माहिती साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक एम. टी. खडसे यांनी दिली आहे.

## राष्ट्रीय परदेश शिष्यवृत्ती योजना

**अमरावती**-समाजातील आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत करणाऱ्या केंद्र शासनाच्या राष्ट्रीय परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अनुसूचित जाती, विमुक्त, भटक्या आणि अर्ध-भटक्या जमाती, भूमिहीन शेतमजूर आणि पारंपारिक कारागीर यांसारख्या कमी उत्पन्न असलेल्या श्रेणीतील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी किंवा पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी परदेशात उच्च शिक्षण घेता यावे यासाठी ही योजना राविण्यात येते आहे.अर्जदार हा अनुसूचित जाती, विमुक्त, भटक्या आणि अर्ध-भटक्या जमाती किंवा भूमिहीन शेतमजूर आणि पारंपारिक कारागीर या घटकातील असावा. विद्यार्थी भारताचा रहिवासी असावा. निवड वर्षासाठी एप्रिलच्या पहिल्या दिवशी वय ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा जास्त नसावे. पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी पदवी परीक्षेत किमान ६० टक्के गुण आवश्यक आहे. पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर परीक्षेत किमान ६० टक्के गुण आवश्यक आहे.परदेशातील शिक्षण संस्था जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असावी. या योजनेत पात्र विद्यार्थ्यांना विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या शिक्षण फीची पूर्ण रक्कम, निर्वाह भत्यामध्ये अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी १५,४०० डॉलर वार्षिक, यू. के. साठी ९,९०० पाऊंड वार्षिक, तसेच आकस्मिक खर्च म्हणून पुस्तके, अभ्यासदौरा व इतर खर्चासाठी अमेरिका व इतर देशांसाठी १,५०० डॉलर, यू. के. साठी १,१०० पाऊंड देण्यात येतात. विद्यार्थ्यांना आरोग्य विमा आणि व्हिसा शुल्क अनुज्ञेय असणार आहे. परदेशात जाताना आणि अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर परत येताना प्रवासाचा खर्च देण्यात येतो.या योजनेसाठी अर्ज ऑनलाइन उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी nosmsje.gov.in या संकेतस्थळावरून अर्जाचा नमुना आणि अधिक माहिती मिळवावी. योजने संबंधित अधिक माहितीसाठी योगेश तनेजा, अवर सचिव, शास्त्री भवन, डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, नवी दिल्ली-११०००१. फोनः ०११-२३३८४०२३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांनी केले आहे.

## स्वयंरोजगारनिर्मिती कार्यशाळा



**परतवाडा** - भारतीय विद्यामंदिर अमरावती द्वारा संचलित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय परतवाडा ,येथील गृहअर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींनी कार्यशाळेचे आयोजन केले. त्यात स्वयंरोजगाराच्या दृष्टिकोनातून स्वतःच्या कला कौशल्याचा वापर करून निरनिराळ्या वस्तू दिवाळीनिमित्त बनविण्यात आल्या यात आयुर्वेदिक उटणे,रंगीबेरंगी पणत्या, सुशोभीत मापलं इत्यादी वस्तू बनविण्यात आल्या या वस्तू बनविण्या मागचा मुख्य उद्देश मुलींच्या कलागुणांना वाव देणे तसेच त्यांच्यामध्ये स्वयंरोजगार निर्माण करणे हा होता. विद्यार्थिनींनी वस्तूला लागणारा खर्च व मिळालेलं उत्पन्न यातून स्वयंरोजगाराला सुरुवात केली यातून विद्यार्थिनीचा आनंद द्विगुणीत झाला. प्रास्ताविक गृहअर्थशास्त्र प्रमुख डॉ.दयाश्री कोकाटे यांनी केले. प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली तसेच प्रा . प्रीती नवरे यांनी संचालन तर प्रा . शारदा निंभोरकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थिनी या बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## वर्षवासानिमित्य ग्रंथ वाचन सोहळा

**अमरावती**-स्थानिक, मानव विकास बहुउद्देशीय मंडळ तथा महिला उपासक मंडळातर्फे , कांबळे लेआऊट मनकर्णा नगर येथील बुध्द् विहारामध्ये वर्षावासानिमित्त् 'मिलिंद प्रश्न' या ग्रथांचे वाचन करण्यात आले. तीन महिने चाललेल्या ग्रंथवाचन कालावधीमध्ये ग्रंथ प्रवाचक आशा मेश्राम यांनी बौध्द् तत्वज्ञानावर आधारित झालेल्या प्रबोधनात्मक माहिती उपस्थितीतांना दिली.वाचनाचा समापन सोहळा कार्तिकी पौर्णिमेचे औचित्य् साधुन आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी नेहा खडसे तर प्रमुख प्रा. उज्वला वासनिक होत्या. तसेच कल्पना ईंगळे प्रमुख पाहुण्या म्हणुन उपस्थित होत्या. प्रमुख वक्त्या्ल प्रा. उज्व्लला वासनिक यांनी 'डॉ. आंबेडकरांना अपेक्षित बौध्द् धम्म् उत्थानासाठी महिलांचे योगदान' या विषयावर सविस्त्र व हृदयस्पर्शी मार्गदर्शन केले. महिला वर्गामध्ये आशाताई मेश्राम, रेखा सपकाळे, सिंधु गजभिये, पुष्पाताई घरडे, अर्चना वंजारी, सरिता नागदिवे, नम्रता घरडे, माया कोष्टी, शोभाताई वानखडे,उज्व्रलाताई मोहाळे,ललिताताई घोडेस्वार, ईंदुताई रंगारी, पल्लवी सहारे, पौर्णिमा मकेश्वर्, अनिता जंवजाळ, सुनिता उके, ज्योती नागले, नेहा खडसे, भारती गुडधे, सारिका सिरसाट, चंद्रकला बांबर्डे, गंगा ढोके, निलिमा गवई, शारदा शेंडे, सुनिता वानखडे, रंजना गवई, रत्नप्रभा दंदे, संगिता ढाणके, अर्चना मनवर, विमला साबळे,मंगला तेलंग,लता ढोले, सुनिता बनसोड,लता माहोरे, शारदा बोरकर,अर्चना गुडधे ह्या व नगरातील समस्त् महिलावर्ग नियमित ग्रंथ वाचनासाठी उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वीतेकरीता दीपक खडसे, सुनिल वंजारी, चंद्रकांत कोष्टी, सिध्दार्थ नागदिवे, अजय थुल,सिध्दार्थ रामटेके, परशराम ढोले, यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रास्तिाविक दीपक प्र.खडसे संचालन आणि आभारप्रदर्शन रेखा सपकाळे यांनी केले.

# धनत्रयोदशीला झाला कोट्यावधीचा व्यवहार

## बाजारात खरेदीसाठी उडाली झुंबड , सोने, चांदी, दुचाकी, फोरविलरची विक्री जोरावर





**अमरावती/प्रतिनिधीः-** पाच दिवसीय दीपावली पर्व आरंभ झाला असून वसुबारस नंतर आज शनिवार १८ ऑक्टोबर रोजी धनत्रयोदशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. धनत्रयोदशीच्या पावन मुहूर्तावर बाजारात धन वर्षा झाली. कोट्यावधीचे व्यवहार झाल्याचे व्यापारी व दुकानदारांनी सांगितले. धनतेरसच्या दिवशी सोने चांदी चे दागिने घेण्यासह भांडे खरेदिची परंपरा असल्याने नागरिकांनी आपापल्या क्षमतेनुसार खरीदी केली. यांच्यासह कापड, इलेक्ट्रॉनिक साहित्य दुचाकी आणि फोरविलर ची विक्री पण जोरावर झाली. जीएसटी मुळे भाव कमी झाल्याने नागरिकांनी अ?क्टिवा दुचाकी मोठ्या प्रमाणात खरेदी केली. नागरिकांमध्ये अपार उत्साह दिसला. बाजारात खरेदीसाठी नागरिकांची झुंबड दिसली.

धनतेरसला शास्त्रीय आणि धार्मिक महत्त्व आहे. या दिवशी सोने चांदी किंवा स्टील, अ?ल्युमिनियमचे भांडे खरेदी करण्याची ☞(पान २ वर)

### ■ दीपावलीचे सर्वत्र स्वागत

दीपावलीचे सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे. घरोघरी आकाश कंदील लावण्यात आले आहे. त्याच प्रमाणे क्षमतेनुसार लाइटिंग, रंगबिरंगी प्रकाश देखील पाहायला मिळत आहे. लोकांनी धनतेरसचा मुहूर्त साधून लक्ष्मीपूजनची ही खरेदी केली. सायंकाळी दिव्यांची आरास सर्वत्र पहावयास मिळाली. त्याच प्रमाणे दिवाळीचा फराळ प्रत्येक घरात गृहिणी कडून बनवण्यात येत असल्यामुळे त्याचा सुगंध देखील दरवळत होता.

# रामगाव शेतशिवारात युवकाची गळा चिरून निर्घृण हत्या

## परिसरात खळबळ,एक संशयित अटकेत



**नांदगाव पेठ/प्रतिनिधी-** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रामगाव शेत शिवारात शुक्रवारी रात्री एका युवकाची चाकूने गळा चिरून हत्या करण्यात आली.शनिवारी सकाळी ८ वाजताच्या सुमारास रहाटगाव–रामगाव मार्गाने जाणाऱ्या काही प्रवाशांना रस्त्याच्या कडेला असलेल्या झुडपांत रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह दिसला. त्यांनी तत्काळ याची माहिती नांदगाव पेठ पोलिसांना दिली. मृतकाची ओळख सै. शाहरुख उर्फ नजीम सै. फारूक (वय ३५, रा. अकबर नगर, लालखडी, अमरावती) अशी झाली आहे.

माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे हे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करून श्वानपथक आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. प्राथमिक तपासात मृताच्या गळ्याजवळ धारदार चाकूने खोल वार केल्याचे स्पष्ट झाले असून, त्यातच त्याचा मृत्यू झाला असल्याचे दिसून आले.या घटनेची माहिती मिळताच शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, डीसीसी गणेश शिंदे तसेच फ्रेजरपुरा विभागाचे एसीपी कैलाश पुंडकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविला. ☞(पान २ वर)

# हरविलेले मोबाईल मुळ मालकांना केले परत



**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर गेट पोलिसांनी सीईआयआर पोर्टलवर हरविलेले मोबाईलचा शोध घेऊन ते आज शनिवार १८ ऑक्टोंबर रोजी धनतेरसच्या दिवशी मूळ मालकांना परत केले. नागपुरी गेट पोलीस स्टेशनमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार यांच्या आदेशाने सीईआयआर पोर्टल नेमण्यात आले आहे. ☞(पान २ वर)

# पैशाच्या वादातून सेंट्रींग मजूरावर चाकूने हल्ला

## जेवड नगर परिसरातील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** उसने घेतलेले पैसे परत न केल्यामुळे झालेल्या वादात एका सेंट्रींग मजुरावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना शुक्रवारच्या सायंकाळी समोर आली आहे. युवराज तांबट (वय ४२) हल्ल्यात जखमी झालेल्या मजुराचे नाव आहे. त्याच्या तक्रारी वरून राजापेठ पोलिसांनी आरोपी गुड्डू रोंघे (वय ३५, मंगलधाम कॉलनी ) व राहुल शिवप्रसाद पटेल (वय २६,जेवड नगर) यांच्या विरुद्ध कलम १०९,३५२ व ३(५) अन्वये दाखल केला आहे. माहितीनुसार युवराज तांबटच्या पत्नीने काही दिवसापूर्वी आरोपी गुड्डू रोंघे याच्याकडून काही रक्कम उसने घेतली होती. ते पैसे अजून पर्यंत परत नाही☞(पान २ वर)

# हनुमानगढीमध्ये आजपासून दीपोत्सव



## -अखंड सात फुटाचा दिवा जळणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** दीपावलीच्या शुभपर्वात हनुमान चालीसा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने हनुमान गडी परिसरात दीपोत्सव आज रविवार १९ ते २२ ऑक्टोबर पर्यंत साजरा करण्यात येत आहे. या दिवशी अयोध्या येथील श्रीराम मंदिरातून आलेला जवळपास अखंड ७ फुट दिवा जळणार आहे. नागरिकांनी आपल्या परिवाराच्या सुख शांती आरोग्य व उज्वल भविष्यासाठी प्रत्येकाने या दिव्यामध्ये दोन थेंब तेल टाकावे असे आवाहन आज शनिवार ☞(पान २ वर)

### आरएसएसला १०० वर्ष पूर्ण झाल्यामुळे वर्षभरात १०० कार्यक्रम

पत्रकार परिषद मध्ये सांगण्यात आले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्ष पूर्ण झाल्यामुळे वर्षभरात शंभर कार्यक्रम घेतले जाणार आहे. आरएसएसने सनातन धर्माचा विश्वभर प्रचार प्रसार केला आहे. यामुळे लप्पीभैया जाजोदिया यांच्यामार्फत वर्षभरात हिंदू संघटना आणि सनातन धर्म प्रती प्रेम असणाऱ्या सर्वांना ☞(पान २ वर)

# दुचाकी-ऑटोच्या धडकेत मनपा कर्मचारी जखमी

## प्रभात चौकातील घटना




अमरावती/प्रतिनिधीः- ऑटोने दुचाकीला दिलेल्या धडकेत मनपा आरोग्य विभागातील जिल्हा समन्वयक पदावर कार्यरत कर्मचारी जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. राजेंद्र शंकरराव देशमुख (वय ४४,टोपे नगर) असे जखमी झालेल्या कर्मचारी चे नाव आहे. माहितीनुसार राजेंद्र देशमुख नेहमी प्रमाणे सोमवारी आपल्या होंडा शाईन दुचाकी एमएच २७ एए ०६६० ने जयस्तंभ चौक ते जवाहर गेट कडे जात होते. त्यावेळी प्रभात चौक येथील☞(पान २ वर)

# अचलपूर बाजार समितीसमोर आंदोलन

## मका पिकाला हमीभावाची मागणी

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात आज १८ ऑक्टोबर रोजी मका पिकाला हमीभाव मिळण्यासाठी शेतकरी ,सामाजिक कार्यकर्त्यांनी धरणे आंदोलन पुकारले होते .यावेळी सामाजिक कार्यकर्ते बंड्या साने ,राम दहिकर ,गुलाब दहिकर ,वामन खडके , राम किसन कासदेकर आदी उपस्थितीत होते .यावेळी अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रतिभा ठाकरे ,उपसभापती अमोल चीमोटे, प्र.सचिव मंगेश चव्हाण ,मंगेश भेटाळू यांनी आंदोलन कर्त्याशी सवांद साधला .आणि हा प्रस्ताव गेल्या १५ दिवसापूर्वीच शासन स्तरावर पाठविण्याची माहिती दिली आहे .या निवेदनाची प्रतीलीपी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय,अचलपूर उपविभागीय अधिकारी कार्यालय ,अचलपूर तहसील कार्यालय यांना दिले आहे .या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,अचलपूर ☞(पान २ वर)



# शुभम तिप्पट असिस्टंट जिओलॉजिस्ट



**अमरावती /प्रतिनिधीः-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासनाच्या ग्राउंड वॉटर सर्व्हे अ?ण्ड डेव्हलपमेंट एजन्सी (जीएसडीए) येथे शुभम लता अतुल तिप्पट यांची असिस्टंट जिओलॉजिस्ट पदासाठी निवड झाली आहे.

शुभमचे शालेय शिक्षण अस्मिता प्राथमिक शाळेत झाले. बारावीपर्यंतचे मणिबाई हायस्कूलमध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षण हे चिखलदरा☞(पान २ वर)




### मराठा विवाह मंडळाचे वतीने २३ ला दिवाळी विशेष उपवर युवक - युवती व पालक परिचय मेळावा

अमरावती – मागील ३५ वर्षापासून विश्वास पात्र ठरलेल्या, मराठा विवाह मंडळ व वाचनालयाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे दिवाळी विशेष ‘उपवर युवक- युवती व पालक परिचय मेळावा’ गुरुवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० यावेळात मंडळाचे कार्यालय, नारायण नगर बगीचा, रूक्मिणी नगर अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. मंडळाचे ☞(पान २ वर)






शुभ दीपावली
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
# सारांश
❑ रविवार,१९ ऑक्टोबर २०२५ ❑ E-paper - www.janmadhyam.com

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता ही आजच्या तंत्रज्ञानाच्या जगात एक क्रांतिकारी बदल घडवत आहे. ओपनएआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी सॅम ऑल्टमॅन यांनी स्पष्ट केले आहे की, एआय इतक्या वेगाने प्रगत होत आहे की, लवकरच ते सुपर इंटेलिजन्सच्या स्तरावर पोहोचू शकते. सुपर इंटेलिजन्स म्हणजे अशी यंत्रणा जी मानवी बुद्धीपेक्षा अधिक सक्षम असेल, वैज्ञानिक संशोधनात मानवी क्षमतांना मागे टाकेल आणि जीवनातील अनेक पैलूंमध्ये आमच्या समजुतीपेक्षा जास्त परिणामकारक ठरेल.**

# वरदान की धोका?



ओर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता ही आजच्या तंत्रज्ञानाच्या जगात एक क्रांतिकारी बदल घडवत आहे. ओपनएआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी सॅम ऑल्टमॅन यांनी स्पष्ट केले आहे की, एआय इतक्या वेगाने प्रगत होत आहे की, लवकरच ते सुपर इंटेलिजन्सच्या स्तरावर पोहोचू शकते. सुपर इंटेलिजन्स म्हणजे अशी यंत्रणा जी मानवी बुद्धीपेक्षा अधिक सक्षम असेल, वैज्ञानिक संशोधनात मानवी क्षमतांना मागे टाकेल आणि जीवनातील अनेक पैलूंमध्ये आमच्या समजुतीपेक्षा जास्त परिणामकारक ठरेल.

सध्या ओपनएआयने विकसित केलेले चॅटजीपीटी-५ हे काही बाबतीत मानवी बुद्धीपेक्षा अधिक सक्षम ठरत असल्याचे बोलले जात आहे. उदाहरणार्थ, माहितीचे विश्लेषण करणे, विविध भाषांमध्ये संवाद साधणे, गणिती आणि तांत्रिक समस्यांचे निराकरण करणे अशा अनेक कामांमध्ये हा चॅटबोट मानवापेक्षा वेगवान आणि अचूक ठरतो. अर्थात, काही साध्या कामांमध्ये मानवी बुद्धी अजूनही श्रेष्ठच आहे, परंतु एआयची प्रगती आणि विकास व त्याची गतिशीलता पाहता आगामी काही वर्षांत ती सर्वसाधारण कामातही मानवाला मागे टाकू शकते. आज शैक्षणिक किंवा वैज्ञानिक क्षेत्रासह आरोग्य, उद्योग, वाहतूक, वित्तीय सेवा, शिक्षण आणि रोजच्या जीवनातील अनेक क्षेत्रांमध्ये एआयची उपयुक्तता वाढत आहे. उदाहरणार्थ, रुग्णालयांमध्ये एआयआधारित प्रणाली रुग्णांच्या लक्षणांचे विश्लेषण करून डॉक्टरांना निर्णय घेण्यात मदत करत आहेत. तसेच आर्थिक व्यवहारांमध्ये एआय धोके ओळखून संभाव्य नुकसान टाळण्यास सक्षम ठरत आहे. यामुळे मानव आणि यंत्रणेमधील सहकार्याची नवी संकल्पना निर्माण होत आहे.

एआयच्या वाढीमुळे रोजगारावर काय परिणाम होईल, हा प्रश्न सतत चर्चेचा विषय ठरत आहे. काही लोकांचा अंदाज आहे की, एआय माणसांच्या नोक-यांना पूर्णपणे विस्थापित करू शकते, परंतु ऑल्टमॅन यांच्या मते, एआय काही नोक-या खरोखरच बदलेल किंवा समाप्त करू शकते, परंतु सर्व रोजगार नष्ट होतील असा अर्थ नाही. त्यांच्या अंदाजानुसार, पुढील काही वर्षांत अर्थव्यवस्थेतील सुमारे ३० ते ४० टक्के काम एआय करू शकेल. याचा अर्थ असा नाही की, सर्व लोक बेरोजगार होतील. उलट नवीन प्रकारच्या नोक-या आणि उद्योग निर्माण होतील.

उदाहरणार्थ, डेटा विश्लेषक, एआय प्रशिक्षण तज्ज्ञ, रोबोटिक्स अभियंते, सॉफ्टवेअर विकासक, तसेच एआय व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या नैतिक आणि कायदेशीर तज्ज्ञांची मागणी वाढणार आहे. त्यामुळे लोकांनी आपले कौशल्य वाढवणे, नवीन तंत्रज्ञान शिकणे आणि बदलत्या परिस्थितीसाठी तयार राहणे आवश्यक आहे. भविष्यातील कार्यसंस्कृती ही मानव आणि यंत्रणेमधील सहकार्यावर आधारित असेल.

ओपनएआय आता फक्त सॉफ्टवेअर विकसित करण्या पुरते मर्यादित राहणार नाही. कंपनी नवीन प्रकारच्या स्मार्ट डिव्हाईसवर काम करत आहे, जे आपल्याला वेगवेगळ्या ॲप्स आणि नोटिफिकेशनच्या गोंधळातून मुक्त करेल. या डिव्हाईसमध्ये फक्त एक कमांड दिल्यावर एआय आपले काम स्वयंचलितपणे करेल. ऑल्टमॅन यांच्या मते, ही तंत्रज्ञान संगणक क्षेत्रातील माऊस-कीबोर्ड आणि टचस्क्रीननंतरची तिसरी मोठी क्रांती ठरेल. या स्मार्ट डिव्हाईसमुळे व्यक्तीचा वेळ वाचेल, कार्यक्षमता वाढेल आणि दैनंदिन कामकाज अधिक सुलभ होईल. याशिवाय शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, कार्यालयीन कामकाज आणि घरगुती कामांमध्ये देखील एआय आधारित डिव्हाइस महत्त्वपूर्ण योगदान देतील.

सुपर इंटेलिजन्स म्हणजे अशी यंत्रणा जी मानवी बुद्धीपेक्षा अधिक वेगवान, अचूक आणि व्यापक विचारक्षम असते. याचे परिणाम केवळ तांत्रिक नाहीत, तर सामाजिक, आर्थिक, नैतिक

**महेश कोळी**

आणि राजकीय क्षेत्रातही भयंकर प्रभाव टाकू शकतात. २०३० पर्यंत हे तंत्रज्ञान पाहायला मिळण्याची शक्यता असल्यामुळे मानवजातीने यासाठी तयारी करणे अत्यावश्यक आहे. सुपर इंटेलिजन्सच्या युगात, वैज्ञानिक संशोधनात, औषधनिर्मितीत, अंतराळ संशोधनात आणि जल, अन्न, ऊर्जा यांसारख्या मूलभूत क्षेत्रांमध्ये मानवपेक्षा जास्त परिणामकारक यंत्रणा कार्यरत राहू शकते. यामुळे मानवी जीवनाची गुणवत्ता वाढेल, परंतु त्याच वेळी नैतिक, सामाजिक आणि कायदेशीर नियमांची आवश्यकता भासेल. एआयद्वारे सृष्टीच्या संसाधनांचा उपयोग अधिक न्याय्य आणि कार्यक्षम पद्धतीने केला जाऊ शकतो.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही आजच्या आणि उद्याच्या जगातील सर्वात मोठी क्रांती ठरत आहे. ही मानवी बुद्धीला वाढवणारी, रोजगाराच्या स्वरूपात बदल करणारी आणि जीवनाच्या अनेक पैलूंमध्ये सुधारणा करणारी साधन आहे. ऑल्टमॅन यांच्या मते, २०३० पर्यंत एआय सुपर इंटेलिजन्सच्या स्तरावर पोहोचण्याची शक्यता आहे. यासाठी मानवजातीने नवीन कौशल्ये आत्मसात करणे, नैतिक मूल्यांची जपणूक करणे आणि एआयचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे.

**हिंटन यांचा इशारा**

नोबेल पारितोषिक विजेता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील अग्रगण्य संशोधक जिओफ्री हिंटन यांनी यापूर्वीच इशारा दिला आहे की, एआय सुपर इंटेलिजन्स मानवतेसाठी अस्तित्वाशी संबंधित धोका निर्माण करू शकते. हिंटन यांना अनेक जण कृत्रिम बुद्धिमत्तेचे गॉडफादर असेही म्हणतात. २०२४ मध्ये त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिकही मिळाले. त्यांनी मानवतेसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता संभाव्य धोका ठरू शकतो, याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. हिंटन यांचा सुपर इंटेलिजन्सबाबतचा दृष्टिकोन १९७० च्या दशकापासून खूप बदलला आहे. त्यांनी पूर्वी असा विश्वास केला की, खरी सुपर इंटेलिजन्स अजून अनेक दशकांनी येईल. मात्र चॅटजीपीटीसारख्या लार्ज लँग्वेज मॉडेलच्या विकासामुळे हिंटन आता मानतात की, यासाठी आता ५ ते १० वर्षांचा कालावधी पुरेसा आहे.

मानवी मेंदू, ऊर्जा कार्यक्षमतेसाठी ऑप्टिमाईज्ड आहे, पण ज्ञान मिळवण्याची आणि शेअर करण्याची मर्यादा आहे. मानवी मेंदूत सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेलपेक्षा जास्त कनेक्शन्स असले तरी आपला मर्यादित जीवनकाल व अनुभवांची संख्या या गोष्टी ज्ञान गोळा करणे आणि शेअर करणे यामध्ये अडथळा निर्माण करतात. या तुलनेत डिजिटल मॉडेल मानवापेक्षा जास्त हुशार ठरू शकतात. त्यामुळे काळजी घेणे आवश्यक आहे. हिंटन यांचे २०२३ च्या सुरुवातीला झालेल्या निरीक्षणानुसार, डिजिटल मॉडेल आधीच मानवी मेंदूच्या क्षमतांपर्यंत पोहोचत आहेत आणि त्याला पार करण्याची तयारी करत आहेत. यामुळे त्यांनी अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींच्या विकासाला लगाम घातला पाहिजे, जेणेकरून नियंत्रण यंत्रणा विकसित करता येतील आणि संभाव्य धोके समजून घेतले जातील.

हिंटन मानतात की, कृत्रिम बुद्धिमत्ता औद्योगिक क्रांतीसारखे रोजगार विस्थापित करू शकते, जिथे यंत्रांनी मानवी श्रमाची जागा घेतली. त्यांनी भविष्यवाणी केली की, बौद्धिक श्रमाच्या नोक-या प्रभावित होतील. यामुळे मोठय़ा प्रमाणावर बेरोजगारी निर्माण होऊ शकते.

# प्रवाळांचे 'जग'



दसरा झाला. आता तरी पाऊस 'सीमोल्लंघन' करून परतीच्या प्रवासाला लागला असावा. तसे त्याचे हिमालय ओलांडून तिबेटपर्यंतचे सीमोल्लंघन पहिल्यांदाच झालंय. तरीही अनेक नैसर्गिक कारणांमुळे तो हिंदुस्थानी द्वीपकल्पात रेंगाळतोय. आता मात्र शेतकऱ्यांची दया येऊन त्याने काढता पाय घ्यावा आणि पुढच्या वर्षी वेळेवर आगमन करावे. दिवाळी उंबरठ्यावर असताना सणासुदीच्या दिवसात त्यावर 'पाणी' पडायला नको.

सणासुदीवरून आठवण झाली ती दागदागिन्यांची. सोनं, चांदी, प्रवाळ (पोवळं) किंवा हिरे या दागिने घडवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व वस्तू म्हणजे आपल्या पृथ्वीची देणगी. भूगर्भात दडलेल्या अनेक धातू आणि इतर मौल्यवान वस्तूंपैकी दागिन्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या गोष्टींचे मोल अधिक. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची दुर्मिळता. या वस्तू सर्वत्र प्रचंड प्रमाणावर मिळत असत्या तर त्याचे अप्रूप वाटलेच नसते. पुठल्याशा कथानकातल्या नगरीत 'सोन्याचे दगड' असल्याच्या कल्पनारम्य प्रतिमा असतात. एवढय़ा प्रमाणात सोनं सापडत असते आणि कदाचित अग्निजन्य खडक दुर्मिळ असते तर त्याचेच 'दागिने' घडवले गेले असते. तसेही शंख-शिंपले, कवडय़ा यांचे दागिने बनतातच.

प्रवाळ किंवा पोवळंसुद्धा त्याचे मणी तयार करून माळ बनवण्यासाठी किंवा अंगठीत जडवण्यासाठी वापरले जाते. केशरी रंगाचं पोवळं दिसतंही छान. त्याला पावित्र्याचा सांस्पृतिक संबंध असतो, तर आयुर्वेदात 'प्रवाळभस्म' हे महत्त्वाचे औषध मानले जाते. एवम्गुणविशिष्ट प्रवाळ किंवा पोवळं कसे तयार होते? तर हे कवचासारखे पोवळं शिंपल्यातल्या नैसर्गिक मोत्यांप्रमाणेच समुद्रात आणि समुद्राकाठी वाढते. आता 'वाढते' म्हटले तर सजीव असणार हे उघडच आहे. जगात ठिकठिकाणी प्रवाळांच्या (कोरल) लांबच लांब वसाहती (रीफ) आहेत. प्रवाळाचे सजीव 'अपृष्ठवंशीय' म्हणजे पाठकणा नसणाऱ्या प्राण्यांची एक विशेष प्रजाती आहे. केवळ काही मिलिमीटर जाडीचे आणि काही सेंटिमीटर लांबीचे हे पॉलीप प्रकारचे जीव समुद्राकाठच्या खडकांवर किंवा समुद्राच्या तळाशीही वाढतात. त्यांचे अनेक जीवशास्त्रीय प्रकार आहेत. त्यांचे वैशिष्ट्य असे की, ते पॅल्शियम कार्बोनेट निर्माण करतात.

सागरकिनारी जे प्रवाळ खडक असतात ते त्यातूनच निर्माण झालेले असतात. फोटोसिंथेसिस किंवा हरितद्रव्य तयार करून झाडांची वाढ होते तशीच प्रवाळांचीही होते. उन्हामध्ये त्यांना 'रंग' मिळतो. सामान्यतः प्रवाळ किंवा पोवळी गडद केशरी रंगाचीच असतात, पण 'ऑक्टोपॅव्हिलिया' प्रकारची पोवळी निळ्या रंगाचीही असतात. त्यांची किंमत खूप असते. हेक्झॅपॅव्हेलिया प्रकारच्या 'कोरल'चे अगदी समान स्वरूपाचे सहा थरही आढळतात.

प्रवाळांमध्ये काही अगदी कठीण, तर काही मऊ असतात. त्यांच्या १२० प्रजाती असून कोरल-रीफ किंवा प्रवाळ वसाहतींजवळ मासे भरपूर मिळतात. अशा 'रीफ'पाशी आजकाल स्पुबा डायव्हिंगसारखे खेळही आयोजित केले जातात. कृत्रिम पद्धतीने प्रवाळांची आणि मोत्यांचीही निर्मिती होते. प्रवाळाचा व्यवसाय करण्यातून जगातल्या कितीतरी कोटी लोकांची उपजीविका होते.

माणसाच्या हव्यासापायी निसर्गाचा होणारा ?हास प्रवाळ खडकांनाही त्रास देतो. काही वेळा पर्यटकांच्या चालण्याने, कुतूहलाने त्यांचा नाश केला जातो, परंतु जैविक निसर्गचक्रात प्रवाळांना फार महत्त्व आहे. समुद्रांतर्गत किंवा सागरकिनारी असणारे प्रवाळ खडक सुमारे २५ टक्के सागरी सजीवांचे वसतीस्थान असते. प्रवाळखंड, कांदळवन किंवा तिवरांप्रमाणेच सागरी लाटांकडून होणारी जमिनीची धूप रोखतात. सागरी लाटांची सुमारे ९७ टक्के ऊर्जा शोषण्याचे कार्य हे प्रवाळ खडक जिथे असतात तिथे होते. त्यामुळे किनारपट्टीचे संरक्षण होत असते.

पृथ्वीवरचे सर्वाधिक प्रवाळ खडक (रीफ) ऑस्ट्रेलियात 'ग्रेट बॅरिअर' म्हणून ओळखले जातात. ॲटलॅन्टिक समुद्रकिनारी मेसोअमेरिकन भागातही कोरल रीफ मोठ्या प्रमाणावर आढळतात. लाल समुद्रसुद्धा प्रवाळांचे मोठे वसतीस्थान आहे. हिंदुस्थानात अंदमान-निकोबार, लक्षद्वीप, कच्छमधील पिरोटन येथे बऱ्याच प्रवाळ रीफ आहेत. महाराष्ट्रातही तळकोकणाच्या सागरकिनारी प्रवाळ सापडते. तामीळनाडूमध्ये पाल्कची समुद्रधुनी आणि गल्फ मॅनॉर येथेही प्रवाळांची पैदास होते.

असंख्य जैविक प्रजातींना आश्रय देणाऱ्या आणि 'कोरल पॉलिप'मधून तयार झालेल्या 'रीफ' एकातून एक अशा वाढतच जातात.

मात्र हवामान बदल, वाढते प्रदूषण, समुद्री पाण्याची आम्लता वाढ आणि माणसांचा अवास्तव वावर प्रवाळांना घातक ठरतो. लाखो वर्षांपासून सागरकिनारी वाढणाऱ्या या 'जिवांचं' रक्षण केले तरच 'दागिन्यां'साठी पोवळी मिळतील.

# अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग सज्ज आहे. कुशल मनुष्यबळ हे देशाच्या विकासात मोठे योगदान देत असते. सर्वांना व्यावहारिक आणि दर्जेदार शिक्षण देणे, देशातील उद्योग तसेच आवश्यक त्या क्षेत्राला अनुसरून गरजेनुसार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण प्रणाली विकसित करणे, युवक-युवतींचे विकसित माहिती तंत्रज्ञानासह ज्ञान अद्ययावत करणे, काळाच्या मागणीनुसार शिक्षण धोरण तयार करणे, केंद्र आणि राज्य शासनाच्या कौशल्य विकास विभागांतर्गत येणाऱ्या सर्व योजना तसेच शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकासाच्या योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. याचाच एक भाग म्हणून अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच उद्घाटन करण्यात येणार आहे.

राज्यात कौशल्य विकासाच्या योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जात आहेत. राज्यातील युवक, युवतींना अधिकाधिक चांगल्या प्रशिक्षणानंतर रोजगार प्राप्त व्हावा यासाठी कौशल्य रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचा पदभार घेतल्यापासून विविध निर्णय व योजना राज्यात सुरू करण्यात आल्या असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महाराष्ट्राला देशाचे कौशल्य केंद्र म्हणून विकसित करणे ध्येय आहे. आयटीआय हा एक उच्च कौशल्य गुणवत्ता ब्रँड म्हणून प्रस्थापित करून औद्योगिक आस्थापनांच्या सहयोगाने प्रशिक्षण व प्रशिक्षण सुविधा वाढविणे, प्रतिवर्षी पाच लाख युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, स्थानिक पारंपरिक कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणे, यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या आनुषंगाने कौशल्य अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील युवकांना कौशल्याधारित रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २,५०६



तुकड्यांच्या 'अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे' उद्घाटन लवकरच ऑनलाईनच्या माध्यमातून होणार आहे.

**मंगलप्रभात लोढा मंत्री,**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्रालय, महाराष्ट्र शासन**

अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे उमेदवारांना त्यांच्या आवडीचा अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश' या तत्त्वावर प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार असून, इच्छुक उमेदवारांना गावात किंवा शहरात जवळच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश घेता येईल.

या योजनेत जनतेलाही सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहन दिले गेले आहे. नागरिक आपल्या परिसरात कोणते रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू व्हावेत हे सुचवू शकतात आणि शासन त्यांच्या सूचनांचा अभ्यास करून त्या अभ्यासक्रमांचा देखील समावेश या योजनेत करणार आहे. यामुळे स्थानिक रोजगाराच्या गरजेनुसार प्रशिक्षण देण्यास मदत होईल. या उपक्रमांतर्गत तीन महिन्यांच्या कालावधीचे अल्पमुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहेत. हे अभ्यासक्रम तरुणांना अल्पावधीत रोजगारक्षम बनविण्यासाठी तयार करण्यात आले असून, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील मागणी लक्षात घेऊन त्यांचे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

या कार्यक्रमांतर्गत कार्यक्रमाच्या उद्घाटनादिवशी प्रत्येक प्रशिक्षण केंद्रावर स्थानिक दोन हजार नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे. प्रशिक्षणार्थ्यांसोबत स्थानिक युवक, पालक आणि समाजातील विविध घटकांचा सहभाग सुनिश्चित करून या कार्यक्रमाला जनसहभागाचे रूप देण्यात येत आहे.

अल्पमुदतीचे हे अभ्यासक्रम शिकविण्यासाठी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच शासकीय तंत्रनिकेतनांमधील सेवानिवृत्त शिक्षकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे.

# काजोलचे वादग्रस्त वक्तव्य



बॉलिवूड अभिनेत्री काजोल पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. कारण, तिने आपल्या नव्या सेलिब्रिटी चॅट 'Too Much With Kajol and Twinkle' मध्ये केलेल्या वक्तव्यामुळे सोशल मीडियावर वाद निर्माण झाला आहे. काजोलने म्हटले आहे की, '९ ते ५ नोकरी करणाऱ्या लोकांपेक्षा अभिनेते खूप जास्त मेहनत करतात.'

तिच्या या विधानाला शोच्या सूत्रसंचालिका ट्विंकल खन्ना आणि पाहुणे वरुण धवन व आलिया भट्ट यांनी विरोध दर्शवला, परंतु काजोल आपल्या मतावर ठाम राहिली.

'अभिनय म्हणजे पूर्णपणे सक्रिय काम'

प्राइम व्हिडिओ इंडियावर प्रसारित होत असलेल्या या शोमध्ये काजोलने आपले मत स्पष्ट करताना सांगितले की,

'अभिनय हा खूपच ॲक्टिव्ह काम असतो. सेटवर असताना तुम्हाला तुमचं १००% द्यावं लागतं.'

तिने 'The Trial' या वेब सीरिजच्या दुसऱ्या सीझनचं उदाहरण देत सांगितले की,

तीने सलग ३५ ते ४० दिवस शूटिंग केलं होतं आणि दररोज लवकर उठून १२ ते १४ तास काम केलं होतं.

'आमच्यासाठी दबाव खूप असतो'

**काजोल म्हणाली,**

'या काळात आम्हाला व्यायाम, आहार आणि शरीराची काळजी घ्यावी लागते. एका इंचानंही वजन वाढलं तर कपडे फिट होत नाहीत. आमच्यावर सतत दबाव असतो.'

तिने सांगितले की, शूटिंग नसतानाही कार्यक्रम, जाहिराती आणि इव्हेंट्ससाठी सतत सक्रिय राहावे लागते.

'डेस्क जॉबमध्ये मिळतो आराम' तुलनेसाठी काजोलने ९ ते ५ नोकरी करणाऱ्यांचा उल्लेख करत म्हटलं, 'डेस्कवर बसून काम करणाऱ्यांना थोडा आराम मिळतो. ते चहा ब्रेक घेऊ शकतात, थोडं बोलू शकतात, चालू शकतात, आणि त्याचवेळी कामही करतात. पण आम्हाला ते शक्य नाही.' तिचा अर्थ असा होता की, अभिनयात शारीरिक आणि मानसिक सक्रियतेचा स्तर खूप जास्त असतो.

**सोशल मीडियावर टीकेचा भडका**

काजोलच्या या वक्तव्यावर सोशल मीडियावर प्रचंड टीका होत आहे.

युजर्स म्हणत आहेत की,

'काजोलने इतर व्यावसायिकाच्या मेहनतीला कमी लेखल आहे.' त्यांच्या मते, डेस्क जॉब करणारे लोकही मोठ्या मानसिक ताणाखाली काम करतात, अनेकदा जास्त तास ऑफिसमध्ये राहतात, आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत त्यांचा मोठा वाटा असतो.

बऱ्याच जणांनी म्हटलं की,

'प्रत्येक व्यवसायात वेगळ्या प्रकारचे आव्हानं असतात, त्यामुळे एकाला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ ठरवणं योग्य नाही.' एकूणच, काजोलच्या या विधानाने नव्या वादाला सुरुवात झाली असून, नेटिझन्सनी तिच्यावर 'अवास्तव आणि असंवेदनशील' वक्तव्य केल्याची टीका केली आहे.

# 'दे दे प्यार दे-२' सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित

२०१९ मध्ये दे दे प्यार दे हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. सिनेमाला चांगला प्रतिसाद प्रेक्षकांनी दिला. आता चार वर्षानंतर या सिनेमाचा सीक्वल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे आता कॉमेडीचा डोस डबल होणार आहे. आजच दे दे प्यार दे २ सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून, ट्रेलर प्रेक्षकांना खूपच आवडला आहे. हा ट्रेलर पाहून प्रेक्षकांचे हसून हसून पोट दुखेल अशा पद्धतीने तयार करण्यात आला आहे.

या सिनेमात अभिनेता अजय देवगण आणि रकुल प्रीत सिंग पुन्हा एकदा एकमेकांसोबत स्क्रिन शेअर करणार आहेत. मागील सिनेमात, रकुल प्रीत सिंग अजय देवगणच्या घरात जाते.

यावेळी मात्र अजय देवगण रकुल प्रीत सिंहच्या कुटुंबीयांकडे




राहायला येतो.

या भागात आर माधवनची एन्ट्री झाली असून, तो रकुल प्रीत सिंहच्या वडिलांच्या भूमिका साकारतान दिसणार आहे.

अजय देवगण आणि रकुल हे सिनेमाच्या कथेत एकमेकांच्या प्रेमात आहेत.

पण अनेक अडचणी समोर उभ्या ठाकलेल्या आहेत, या अडचणींचा सामना ते कसे करणार? यासाठी १४ नोव्हेंबरची वाट पाहावी लागेल.

गेल्या काही दिवसांपूर्वी अजय देवगणचा सन ऑफ सरदार हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर सपशेल फेल ठरला.

या सिनेमातील कॉमेडीमुळे अजय देवगणवर टीका करण्यात आली होती. त्या टीकेला उत्तर म्हणून दे दे प्यार दे २ सिनेमा असल्याचे दिसत आहे.

ट्रेलरमध्ये दाखवण्यात आलेल्या कॉमेडीने प्रेक्षकांना हसू येते, ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे.

त्यामुळे या सिनेमाबद्दल प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे.

या सिनेमाचे दिग्दर्शन मीजान जाफरी यांनी केले आहे. १४ नोव्हेंबरला थिएटरमध्ये हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

त्यामुळे आता या सिनेमाला कसा प्रतिसाद प्रेक्षक देतात हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

# ...माझी मान शरमेने खाली गेली

तालिबानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी नुकतेच हिंदुस्थान दौऱ्यावर येऊन गेले. त्यांनी हिंदुस्थानचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. मुत्ताकी यांचे ज्या प्रकार स्वागत झाले, त्यावरून अनेक जण संताप व्यक्त करत आहेत. प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर यांनी देखील मोदी सरकारला फटकारले.

जगातील सर्वात क्रूर दहशतवादी संघटना असलेल्या तालिबानच्या प्रतिनिधीचे आपल्या देशात झालेले आदरातिथ्य पाहून माझी मान शरमेने खाली गेली. जे लोक प्रत्येक प्रकारच्या दहशतवादविरोधात उभे राहतात, तेच आज या दहशतवादी



संघटनेच्या प्रतिनिधीचा सन्मान करत असल्याचे दिसत आहे. हे अतिशय दुःखद आहे, अशा शब्दांत त्यांनी मोदी सरकारचा निषेध केला. मुत्ताकी हे हिंदुस्थान दौऱ्यावर असताना त्यांनी उत्तर प्रदेशमधील दारुल उलूम देवबंद या संस्थेलादेखील भेट दिली होती.

त्यावरूनही जावेद अख्तर यांनी या संस्थेला खडे बोल सुनावले आहेत.

# 'सैय्यारा'ची जोडी रिलेशनशिपमध्ये!

हित सूरी दिग्दर्शित 'सैय्यारा हा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. या सिनेमाने बॉलीवूडला एक फ्रेश जोडीही दिली. अहान पांडे आणि अनीत पड्डाची ही जोडी आता रियल लाईफमध्येही एकत्र दिसते आहे. याला निमित्त आहे ते अनीतच्या वाढदिवसाचे.



अहानने सोशल मीडियावर काही अनसीन फोटो शेअर केले होते. एका कॉन्सट 'दरम्यानच्या या फोटोत दोघेही धमाल करताना दिसतात. एका रिपोर्टनुसार हे दोघेही रिलेशनशिपमध्ये आहेत. 'सैय्यारा'च्या सेटवर दोघांमध्ये झालेल्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आहे. अर्थात दोघांनी या नात्याबाबत एक शब्दही शेअर केलेला नाही.

दोघेही आपले नाते प्रायव्हेट ठेवण्याला प्राधान्य देत आहेत. अनीतने अभिनेत्री कियारा आडवाणीला रीप्लेस करत 'शक्तिशालिनी' चित्रपटासाठी दावेदारी सिद्ध केली आहे. याशिवाय 'कोर्टरूम ड्रामा' मध्येही ती दिसणार आहे, तर अहान हा अली अब्बास जफरच्या सिनेमात शर्वरी वाघ हिच्यासोबत झळकणार आहे.

# टेलर स्विफ्टच्या अल्बमने रचला इतिहास

सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय अमेरिकन सिंगर आणि सॉन्गरायटर टेलर स्विफ्ट सध्या आपल्या संगीत करिअरमधील एका ऐतिहासिक क्षणाचा अनुभव घेत आहे. तिच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'द लाईफ ऑफ अ शोगर्ल' या १२ व्या स्टुडिओ अल्बमने पहिल्याच आठवड्यात विक्रमी विक्री करत संगीत विश्वात नवा इतिहास रचला आहे.

या अल्बमने अवघ्या एका आठवड्यात ४.००२ दशलक्ष (मिलियन) कॉपीज विक्रीचा टप्पा पार करत आतापर्यंतचा सर्वाधिक विक्रीचा विक्रम केला आहे. याआधी ॲडेलच्या '२५' या अल्बमने २०१५ मध्ये एक आठवड्यात ३.३७८ दशलक्ष कॉपीज विकून विक्रमी कामगिरी केली होती. मात्र, टेलरच्या या नव्या अल्बमने तो विक्रम मागे टाकत नवा मानदंड प्रस्थापित



केला आहे. यामुळे टेलर स्विफ्टने बिलबोर्ड २०० चार्टवर एकूण पंधरा नंबर १ अल्बम मिळवले आहेत. यामुळे तिने रॅपर ड्रेक आणि जे-झेड यांना मागे टाकले असून, ती ही कामगिरी करणारी एकमेव कलाकार ठरली आहे. या आधी ड्रेक आणि जे-झेड यांच्याकडे प्रत्येकी चौदा नंबर १ अल्बम्स होते. सध्या टेलर स्विफ्ट केवळ द बीटल्स यांच्या मागे आहेत, ज्यांचे एकूण १९ अल्बम्स बिलबोर्ड चार्टवर नंबर १ वर राहिले आहेत.

टेलरने तिच्याच मागील अल्बम 'द टॉर्चर पोएटस् डिपार्टमेंट' चा विक्रमदेखील मोडला आहे. त्या अल्बमच्या एक आठवड्यात ८,५९,००० कॉपीज विकल्या गेल्या होत्या. मात्र, नवीन अल्बमने त्यापेक्षा पाच पटींनी अधिक विक्री केली आहे.

टेलर स्विफ्टच्या गाण्यांना जगभरातील चाहत्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळतो. तिचे 'यू बिलॉन्ग विथ मी', 'लव स्टोरी', 'ब्लँक स्पेस' आणि 'इट इज ओव्हर नाऊ' यांसारखी गाणी सुपरहिट ठरली. तिने आपला संगीत प्रवास २००६ मध्ये 'टेलर स्विफ्ट' या पहिल्या अल्बमपासून सुरू केला होता.

त्यानंतर २००८ मध्ये फीयरलेस, २००९ मध्ये स्पीक नाऊ, २०१२ मध्ये रेड, २०१४ मध्ये १९८९, २०१७ मध्ये रेप्युटेशन अशा एकापेक्षा एक सुपरहिट अल्बम्स तिने दिले आहेत. वैयक्तिक आयुष्यामुळेही ती चर्चेत राहिली. अलीकडेच ती अमेरिकन फुटबॉलपटू ट्रेव्हिस केल्से सोबतच्या साखरपुड्यामुळे प्रकाशझोतात होती.

# ७ वर्षांनी लहान अभिनेत्यासोबत जेनिफर विंगेट रोमान्स करणार?

सोनी टीव्हीचा लोकप्रिय आणि थ्रिलिंग शो 'बेहद' आता तिसऱ्या सीझनसह प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची जोरदार चर्चा आहे. हा रोमँटिक थ्रिलर शो २०१६ मध्ये पहिल्यांदा प्रदर्शित झाला होता, ज्यात अभिनेत्री जेनिफर विंगेटच्या अभिनयाला लोकांनी भरभरून दाद दिली. 'बेहद'मधील माया या नकारात्मक पण आकर्षक भूमिकेमुळे जेनिफर केवळ इंडस्ट्रीतच नव्हे, तर घराघरात लोकप्रिय झाली. आता या शोच्या तिसऱ्या सीझनबद्दल एक मोठी अफवा चर्चेत आहे: ती म्हणजे, जेनिफर विंगेट तिच्यापेक्षा सात वर्षांनी लहान असलेल्या एका लोकप्रिय अभिनेत्यासोबत पडद्यावर रोमान्स करणार आहे. या अफवेमागची नेमकी वस्तुस्थिती काय आहे, हे जाणून घेऊया.

'बेहद ३' मध्ये जेनिफरचा खास अंदाज



'बेहद'च्या पहिल्या सीझनमध्ये जेनिफर विंगेट आणि कुशल टंडन यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. जेनिफरने 'माया'ची भूमिका इतकी प्रभावीपणे साकारली की तिला केवळ लोकप्रियताच नव्हे, तर अनेक पुरस्कारही मिळाले. या शोच्या लोकप्रियतेमुळेच निर्मात्यांनी काही काळातच 'बेहद'चे दुसरे सीझन आणले, पण तेव्हा अपेक्षित यश मिळाले नाही. आता निर्माते चित्रपटांप्रमाणेच 'बेहद'चे तिसरे सीझन आणण्याच्या तयारीत आहेत आणि शो सुरू होण्यापूर्वीच तो चर्चेत आला आहे. 'बेहद सीझन ३' मध्ये जेनिफर पुन्हा एकदा एका खास आणि प्रभावी अंदाजात दिसणार आहे.

जेनिफर विंगेट आणि तिच्यापेक्षा सात वर्षांनी लहान असलेल्या अभिनेत्याच्या रोमान्सच्या अफवेमागील वास्तव म्हणजे, टीव्ही अभिनेता मोहसिन खान 'बेहद ३' या मालिकेत जेनिफर विंगेटसोबत स्क्रीन शेअर करणार असल्याची चर्चा आहे.

मोहसिन खानने 'ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकेत कार्तिक गोएंकाची भूमिका साकारून प्रत्येक घरात आपली ओळख निर्माण केली होती. गेल्या काही दिवसांपासून मोहसिन खान टीव्ही पडद्यापासून दूर आहे. आता तो 'बेहद' मध्ये जेनिफरसोबत स्क्रीन शेअर करेल, अशा जोरदार अफवांना बाजारामध्ये उधाण आले आहे. सोशल मीडियावर हे वृत्त लीक होताच, जेनिफर आणि मोहसिनच्या चाहत्यांनी आनंद व्यक्त केला आहे. सध्या जेनिफर विंगेट

## रितेश देशमुखांच्या स्वयंपाक घरात तेल वापरतच नाही तर जेवणात टाकतात हा खास पूदार्थ



अभिनेता रितेश देशमुख आणि अभिनेत्री जिनिलीया देशमुख हे चाहते खूप आवडणारे सेलिब्रिटी जोडपे आहेत. दोघेही प्रत्येक सण पारंपरिक पद्धतीने साजरे करतात. ख्रिश्चन पार्श्वभूमीची जिनिलीया, मराठमोळ्या रितेश देशमुखांनी लग्नानंतर मराठी परंपरा खूपच आवडीने जपते. ती आपल्या सणांचे फोटो व व्हिडिओ इंस्टाग्रामवर शेअर करते. जिनिलीया सासूबाईंपासून आणि घरातील इतर सदस्यांकडून मराठी संस्कृती शिकली आहे. प्रत्येक उत्सव ती मराठी पद्धतीने आनंदाने साजरा करते. महाराष्ट्राचे दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची सून असलेल्या जिनिलीया उत्तम मराठी बोलते आणि स्वादिष्ट जेवण बनवते, असे तिने स्वतःही सांगितले आहे. व्हिगन असलेल्या जिनिलीया देशमुखला मराठी जेवण तयार करणे आणि चव घेणे आवडते. तिने सांगितले, 'पिठल्यामध्ये नैसर्गिक प्रोटीन असतो. मी जेवण बनवताना तेल वापरत नाही, त्याऐवजी शेंगदाण्याचा कुट वापरते, कारण त्यात आपोआप तेल असते. पिठलं आणि भाजीत: शेंगदाण्याचे बारीक कुट करून पिठलं किंवा भाजीमध्ये टाका. त्यामुळे पदार्थात नैसर्गिक तेल आणि युनिक चव येते. पुरणपोळी आणि पराठ्यांमध्ये: पुरणपोळी किंवा शेंगदाण्याच्या पराठ्यात शेंगदाण्याचे पेस्ट घालून चव आणि पोषण वाढवता येते. सूप आणि सॅलडमध्ये: हलके भाजून बारीक केलेले शेंगदाणे सूप किंवा सॅलडवर टाकल्यास पौष्टिकता आणि स्वाद वाढतो.

शेंगदाणे नेहमी थंड, कोरड्या जागी ठेवा. ओलसर किंवा उष्णकटिबंधीय वातावरणात शेंगदाणे लवकर खराब होऊ शकतात. हवाबंद कंटेनर: शेंगदाणे हवाबंद डब्यात किंवा जारमध्ये साठवा, ज्यामुळे त्यांची ताजगी आणि चव टिकून राहते. फ्रीजमध्ये साठवणूक: जर शेंगदाणे लांब कालावधीसाठी साठवायचे असतील, तर फ्रीजमध्ये ठेवणे उत्तम. हे त्यांना किडी आणि फफूंदीपासून सुरक्षित ठेवते.

कुट केलेले शेंगदाणे: जर शेंगदाणे आधीच कुट केलेले असतील, तर त्यांना हवाबंद बाटली किंवा झिप लॉक पिशवीत ठेवा. कच्चे शेंगदाणे आणि भाजलेले शेंगदाणे वेगळे साठवा: भाजलेले शेंगदाणे लवकर खराब होतात, म्हणून ते कच्च्या शेंगदाण्यापासून वेगळे ठेवणे आवश्यक आहे. शेंगदाणे लगेच खराब होऊ शकतात.

# पाचवीतील इशित भट्टचा उद्धटपणा सोशल मीडियावर चर्चेत

'अतिशहाणा त्याचा बैल रिकामा' या म्हणीचे उत्तम उदाहरण खँण शो मध्ये बघायला मिळाले. बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांचा 'कौन बनेगा करोडपती' या लोकप्रिय शोचा १७ वा सीझन सध्या सुरु आहे. या शोमध्ये नुकताच एक लहान स्पर्धक सहभागी झाला होता. गांधीनगर (गुजरात) येथील इशित भट्ट नावाच्या पाचवीत शिकणाऱ्या मुलाने हॉट सीटवर बसून बिग बींसोबत बोलताना केलेल्या असभ्य वर्तनामुळे तो सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे.

कार्यक्रमात इशितने सुरुवातीलाच अमिताभ बच्चन यांना थेट म्हटलं, 'मला नियम माहिती आहेत, आता तुम्ही मला




नियम समजावत बसू नका.' त्यानंतर, जेव्हा प्रश्न विचारण्यास सुरुवात झाली, तेव्हा त्याने पर्याय ऐकण्याआधीच उत्तर लॉक करण्यास सांगितले. इशितचा आत्मविश्वास खूप होता, मात्र अनेकांना त्याचे वागणे उद्धट वाटले.

एक कठीण प्रश्न आल्यावर इशितने बिग बींना पर्याय देण्याची विनंती केली. उत्तर देताना त्याने म्हटलं, 'सर, एक काय, सगळी चार ऑप्शन्स लॉक करा, पण लवकर लॉक करा.' अखेर त्याचं उत्तर चुकलं आणि तो कोणतीही रक्कम न जिंकता परत गेला. या संपूर्ण प्रसंगाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. स्वतः अमिताभ बच्चन यांनीही हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला असून, त्याला 'बोलण्यासारखं काही नाहीष्ठ' अशी टिप्पणी दिली आहे.

अमिताभ बच्चन यांनी विचारलेला प्रश्न होता : 'वाल्मिकी रामायणाच्या प्रथम कांडाचं नाव काय आहे?' पर्याय होते : अ. बाल कांड ब. अयोध्या कांड क. किष्किंधा कांड ड. युद्ध कांडइशितने अयोध्या कांड लॉक करण्यास सांगितले, मात्र योग्य उत्तर होतं बाल कांड. हा प्रश्न २५,००० च्या स्तरावरील होता. इशितच्या या वागणुकीवर नेटकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. अनेकांनी लिहिलं आहे की, 'ज्ञान असून उपयोग नाही जर वडीलधाऱ्यांशी वागणंच शिकवलं नसेल.'

# शरीरातील प्लेटलेट्सची संख्या कमी आहे?

डेंग्यू किंवा इतर काही संसर्गजन्य आजारांमुळे शरीरातील प्लेटलेट्सची संख्या कमी होणे ही गंभीर बाब ठरू शकते. अशावेळी योग्य आहार घेतल्यास प्लेटलेट्स वाढण्यास मदत होऊ शकते. शरीरात रक्ताच्या गाठी तयार होण्यासाठी आणि जखमा लवकर भरून येण्यासाठी प्लेटलेट्स अत्यंत आवश्यक असतात. विशेषतः अशा काळात काही जीवनसत्त्वे आणि खनिजयुक्त अन्नपदार्थांचा समावेश केल्यास प्लेटलेट्सची पातळी लवकर सुधारू शकते. चला तर मग जाणून घेऊया अशा कोणत्या नैसर्गिक घटकांचा समावेश तुम्ही तुमच्या आहारात करायला हवा.



**हे पदार्थ प्लेटलेट्स वाढवण्यात प्रभावी ठरतात**

व्हीटग्रास (गव्हाच्या पात्या) व्हीटग्रासमध्ये व्हिटॅमिन्स, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. रोज व्हीटग्रास ज्यूसचे सेवन केल्याने रक्तशुद्धी होते आणि प्लेटलेट्सची पातळी सुधारते. आवळा व्हिटॅमिन सीने भरपूर असलेला आवळा रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो आणि शरीराला बळकटी देतो. रोज आवळा खाणे किंवा रस घेणे फायदेशीर ठरते.

गिलोय आयुर्वेदात गिलोयला अमृता म्हणतात. हे एक रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे औषध आहे. गिलोयच्या वेलीची काढा करून घेतल्यास प्लेटलेट्स वाढण्यास मदत होऊ शकते. पपईची पाने पपईच्या पानांमध्ये असलेले विशेष एंझाइम प्लेटलेट्स वाढवण्यास मदत करतात. या पानांचा रस काढून नियमित सेवन केल्यास लक्षणीय सुधारणा दिसू शकते. भोपळा भोपळ्यामध्ये असलेले व्हिटॅमिन अस्थिमज्जेला सक्रिय करते, ज्यामुळे प्लेटलेट्सची निर्मिती वाढते. गाजर, रताळे, पालक हेही या कामी फायदेशीर आहेत.

दूध दूधामध्ये कॅल्शियम, प्रथिने आणि व्हिटॅमिन ख् असते. हे रक्त गोठवण्यासाठी आवश्यक असून प्लेटलेट्स वाढवण्यासही सहाय्यक ठरते. डाळिंब लोह आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असलेले डाळिंब प्लेटलेट्स वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. यामुळे रक्तातील हिमोग्लोबिनही सुधारते. फोलेटयुक्त पदार्थ फोलेट म्हणजेच व्हिटॅमिन ९ रक्तातील निरोगी पेशी निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. यासाठी हिरव्या पालेभाज्या, भात, बीन्स, आणि सोयाबीन खाणे लाभदायक ठरते. जर प्लेटलेट्स खूप कमी असतील, तर डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे.

हे घरगुती उपाय केवळ सौम्य ते मध्यम स्थितीत उपयुक्त ठरतात. योग्य वैद्यकीय उपचारांसोबतच योग्य आहार घेतल्यास रोगप्रतिकारशक्ती वाढवता येते.

# चेहऱ्यावर नैसर्गिक तेज हवंय?



त्वचा निरोगी आणि चमकदार ठेवण्यासाठी फक्त महागडे स्किनकेअर प्रॉडक्ट्स वापरणे पुरेसे नाही. त्वचेची काळजी आतून घेणं तितकंच महत्त्वाचं आहे. त्वचा नैसर्गिकरीत्या चमकदार व्हावी, यासाठी डिटॉक्स ड्रिंक्स रोज पिण्याचा सल्ला न्यूट्रिशनिस्ट देतात.

**१. आल-हळदीची चहा**

सकाळी रिकाम्या पोटी आल आणि हळदीची चहा प्यायल्यास शरीरातील सूज कमी होते, इम्यूनिटी वाढते आणि त्वचेला निखार येतो.

कृती: १ कप पाणी उकळवा, छोटा चमचा हळद आणि १½ छोटा चमचा किसलेले आले घाला. ५ मिनिटे शिजवा, गाळून घ्या.

**२. एप्पल साइडर विनेगर + दालचिनी पाणी**

हे ड्रिंक त्वचेचे पीएच संतुलित ठेवते, मुरूम कमी करते आणि त्वचा चमकदार बनवते.

कृती: १ कप गरम पाण्यात १ मोठा चमचा एप्पल साइडर विनेगर आणि ½ छोटा चमचा दालचिनी पावडर मिसळा.




**३. दुधी भोपळ्याचा रस**

पचन सुधारतो, सूज कमी करतो आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढतो.

कृती: दुधी भोपळा सोलून कापून ½ कप पाण्यासह मिक्स करा, आणि गाळून प्यायचे.

**४. कोरफडीचा रस**

याने शरीर डिटॉक्स होते, हायड्रेटेड राहते आणि त्वचेचा निखार वाढतो.

कृती: १ कप पाणी + २ मोठे चमचे कोरफडेचा गर ब्लेंड करा आणि लगेच प्या.

**५. ग्रीन टी**

मेटाबॉलिज्म सुधारतो, गट हेल्थ टिकते आणि त्वचेला नैसर्गिक तेज मिळतो.

नियमित हे ड्रिंक्स प्यायल्यास त्वचा चमकदार होते, शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि इम्यूनिटी मजबूत राहते.

# मायग्रेन का होतो?

मायग्रेन ही एक प्रकारची तीव्र डोकेदुखी आहे जी सामान्य डोकेदुखीपेक्षा वेगळी असते. त्यामुळे डोक्याच्या एका भागात तीव्र वेदना होतात, जी अनेक तासांपासून अनेक दिवसांपर्यंत टिकू शकते. मायग्रेन ही फक्त डोकेदुखी नाही तर एक न्यूरोलॉजिकल समस्या आहे, ज्यामध्ये मळमळ, उलट्या आणि प्रकाश आणि आवाजाचा त्रास यासारखी लक्षणे देखील दिसून येतात. मायग्रेनचे प्रामुख्याने दोन प्रकार आहेत: ऑरा असलेले मायग्रेन आणि ऑरा नसलेले मायग्रेन. ऑरामध्ये, रुग्णाला डोकेदुखीपूर्वी चमकणे किंवा अंधुक दृष्टी, मुंग्या येणे किंवा बोलण्यात अडचण येणे अशी लक्षणे जाणवतात. याशिवाय, क्रॉनिक मायग्रेन म्हणजेच १५ दिवसांपेक्षा जास्त काळ टिकणारे, हेमिप्लेजिक मायग्रेन आणि सायलेंट मायग्रेन हे देखील काही इतर प्रकार आहेत. लक्षणे वेळेवर ओळखणे आणि योग्य उपचार घेणे महत्वाचे आहे.



मायग्रेनची कारणे पूर्णपणे स्पष्ट नाहीत, परंतु असे मानले जाते की अनुवांशिक आणि पर्यावरणीय घटक दोन्ही भूमिका बजावतात. मेंदूतील रासायनिक बदल, जसे की सेरोटोनिनची पातळी कमी होणे, नसा अधिक संवेदनशील बनवतात आणि डोकेदुखीला कारणीभूत ठरतात. जास्त ताण, झोपेचा अभाव, हार्मोनल बदल, विशेषतः महिलांमध्ये मासिक पाळी किंवा गर्भधारणेदरम्यान, तेजस्वी प्रकाश, मोठा आवाज, चॉकलेट, चीज, वाइन यासारखे काही पदार्थ आणि पेये आणि खराब जीवनशैली यामुळे देखील मायग्रेन वाढू शकते. मायग्रेनचा कौटुंबिक इतिहास असल्याने तो होण्याचा धोका वाढतो. पुरुषांपेक्षा महिलांना मायग्रेन होण्याची शक्यता जवळजवळ तिप्पट असते. शिवाय, १५ ते ५५ वयोगटातील लोकांमध्ये मायग्रेन सर्वात सामान्य आहे.

**मायग्रेनची सुरुवातीची लक्षणे कोणती?**

डोकेदुखी सुरु होण्याच्या काही तास किंवा दिवस आधी मायग्रेनची सुरुवातीची लक्षणे दिसून येतात, ज्याला प्रोड्रोम स्टेज म्हणतात. या स्टेजमध्ये अचानक मूड स्विंग, वारंवार जांभई येणे, वारंवार लघवी होणे, वाढलेला थकवा किंवा भूक यांचा समावेश असू शकतो. काही लोकांना अंधुक दृष्टी, चमकणारे दिवे किंवा झिगझॅग लाईन येऊ शकतात, ज्याला ऑरा स्टेज म्हणतात.

मायग्रेन डोकेदुखीमध्ये डोक्याच्या एका भागात तीव्र, जड वेदना होतात आणि हळूहळू वाढत जातात. त्यासोबत मळमळ, उलट्या, प्रकाश आणि आवाजाची संवेदनशीलता, घसा घट्ट होणे आणि लक्ष केंद्रित करण्यात अडचण येणे अशी लक्षणे असतात. कधीकधी, अगदी हलकी शारीरिक हालचाल किंवा आवाज देखील वेदना वाढवू शकतो. सुरुवातीची लक्षणे ओळखणे, वेळेवर औषधे घेणे आणि विश्रांती घेणे यामुळे मायग्रेनच्या हल्ल्याची तीव्रता लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते.

**स्वतःचे रक्षण कसे करावे**

पुरेशी झोप घ्या आणि निरोगी आहाराचे पालन करा.

ताण कमी करण्यासाठी योगासने, ध्यान किंवा ध्यान करा.

तेजस्वी दिवे, मोठा आवाज आणि तीक्ष्ण वास टाळा.

शरीरात पाण्याची कमतरता होऊ देऊ नका, हायड्रेटेड रहा.

चॉकलेट, वाइन, चीज इत्यादी उत्तेजक पदार्थ टाळा.

गरज पडल्यास, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार प्रतिबंधात्मक औषधे घ्या.

नियमित व्यायाम करा.

# आयुर्वेदाचे वरदान 'हळद'

आयुर्वेदात अनेक नैसर्गिक औषधी वनस्पती आणि मसाले आहेत, जे आपल्या दैनंदिन जीवनात आरोग्य टिकवून ठेवण्याचे कार्य करतात. त्यापैकी सर्वात उपयुक्त आणि गुणकारी औषध मानली जाते हळद. हळदीला संस्कृतमध्ये हरिद्रा असे म्हणतात. धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही हळदीचे महत्त्व विशेष आहे. प्रत्येक शुभकार्य, पूजा किंवा मंगलप्रसंगी हळदीचा वापर आवश्यक मानला जातो.



हळदीतील पोषक घटक

हळद ही पोषक तत्वांनी समृद्ध आहे. त्यामध्ये करक्यूमिन, तेल, लोह, पाणी आणि थोड्या प्रमाणात चरबी असते. यातील करक्यूमिन हा एक प्रभावी अँटीऑक्सिडंट असून तो शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो.

हा घटक कर्करोगासारख्या गंभीर आजारांपासून बचाव करण्यात मदत करतो, तसेच शरीरातील सूज आणि संधिवाताची समस्या कमी करतो. हळद त्वचा आणि हृदयाच्या आरोग्यासाठीही लाभदायक आहे.

आयुर्वेदातील हळदीचे गुणधर्म

आयुर्वेदात हळद ही त्रिदोष संतुलित करणारी औषधी मानली गेली आहे. ती कफ आणि वात दोष कमी करते आणि शरीरात समतोल राखते.

**१. घाव भरून काढण्यात उपयोगी**

प्राचीन काळापासून हळदीचा वापर जखमा भरून काढण्यासाठी केला जातो. ती संक्रमण कमी करते आणि पचनक्रिया सुधारते.

**२. सर्दी- खोखल्यावर प्रभावी उपाय**

हळद रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि सर्दीपासून बचाव करते.

घरगुती उपाय म्हणून अर्धा चमचा हळद आणि एक चमचा मध एकत्र घेणे फायदेशीर ठरते. यामुळे घसा स्वच्छ होतो आणि कफ कमी होतो.

**३. हळदीचा काढा**

हळदीसोबत आलं, तुलसी, मध आणि काळी मिरी घालून बनवलेला काढा सर्दी, ताप आणि घशातील त्रास कमी करण्यात मदत करतो.

**४. हळदीचे दूध**

रात्री झोपण्यापूर्वी अर्धा चमचा हळद उकळलेल्या दुधात घेणे आरोग्यासाठी हितावह आहे. हे दूध शरीरातील सूज कमी करते, आतील जखमा भरते आणि शरीर उबदार ठेवते.

**सौंदर्य आणि आरोग्य दोन्हीसाठी उपयुक्त**

हळदीचा लेप त्वचेवरील डाग, मुरुम आणि जखमा कमी करण्यास मदत करतो. त्यामुळे हळद ही केवळ औषधी नव्हे तर सौंदर्यवर्धक घटकही आहे.

एकूणच, हळद ही निसर्गाने दिलेली अमूल्य देणगी आहे. तिचा योग्य प्रमाणात वापर केल्यास शरीर मजबूत राहते, रोगांपासून संरक्षण मिळते आणि सौंदर्य खुलते.

# वारंवार येणाऱ्या तापावर आयुर्वेदिक उपचार

सध्याच्या बदलत्या हवामानामुळे अनेकांना वारंवार सर्दी, खोकला, अंग दुखणे आणि ताप याचा त्रास होतो. पावसाळा, हिवाळा आणि अगदी उन्हाळ्यात सुद्धा वातावरणातील बदलांमुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते आणि आजार पटकन जडतो. विशेषतः वारंवार येणाऱ्या तापामुळे शरीर थकते, कामात अडथळा येतो आणि औषधांवर अवलंबित्व वाढतं.

यावर बहुतांश लोक तात्पुरता उपाय म्हणून तापाच्या गोळ्या, अँटीबायोटिक्स किंवा इतर औषधांचा वापर करतात. मात्र ही औषधं वारंवार घेतली तर त्याचे दुष्परिणामही होऊ शकतात. काही लोकांना या औषधांचा प्रभाव तात्पुरता वाटतो, आणि ताप परत परत येत राहतो. अशावेळी आयुर्वेदात दिलेले नैसर्गिक उपाय अधिक प्रभावी आणि आरोग्यदायी ठरू शकतात.

**गोकर्ण** – एक उपयुक्त औषधी वनस्पती

आयुर्वेदात गोकर्ण, ज्याला अपराजिता असंही म्हटलं जातं, ही एक अत्यंत उपयुक्त आणि बहुगुणी औषधी वनस्पती मानली जाते. निळ्या किंवा पांढऱ्या फुलांची ही वेल स्वरूपात आढळणारी वनस्पती विविध आजारांवर फायदेशीर मानली जाते.

गोकर्णच्या मुळांचा काढा तयार करून घेतल्यास वारंवार येणाऱ्या तापावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. हा काढा शरीरातील उष्णता नियंत्रित करतो, प्रतिकारशक्ती वाढवतो आणि ताप पुन्हा पुन्हा येण्याची शक्यता कमी करतो.



**गोकर्णचे इतर आरोग्यदायी फायदे**

१. मासिक पाळीतील त्रास: हा रस घेतल्यास मासिक पाळीतील अस्वस्थता कमी होते आणि हार्मोनल संतुलन सुधारते.

२. बुद्धी आणि एकाग्रता वाढवते: गोकर्णाच्या फुलांपासून तयार केलेले पाणी किंवा चहा मेंदूच्या कार्यक्षमतेसाठी लाभदायक मानला जातो. विद्यार्थ्यांसाठी आणि सतत मानसिक काम करणाऱ्यांसाठी हे एक नैसर्गिक टॉनिक आहे. हे पाणी रोज घेतल्यास स्मरणशक्ती आणि एकाग्रतेत सुधारणा होते.

**३. संधीवात आणि सांधेदुखी:** गोकर्णाचा काढा संधिवात, सांधेदुखी, आणि जॉईंट पेनमध्ये अत्यंत उपयोगी ठरतो. शरीरातील सूज कमी करतो आणि सांध्यांना लवचिकता प्रदान करतो.

**४. दृष्टी सुधारते: ज्यांना दृष्टिदोष** किंवा नजर कमजोर होत असल्याचा अनुभव येतो, अशांसाठी गोकर्णाचा काढा उपयुक्त ठरतो. डोळ्यांच्या आरोग्यासाठी हा एक उत्तम आयुर्वेदिक उपाय मानला जातो.

**गोकर्ण काढा तयार करण्याची पद्धत:**

**साहित्य:**

गोकर्णचे मुळे (कोरडी किंवा ताजी) आणि २ कप पाणी

**कृती:**

एका पातेल्यात पाणी उकळायला ठेवा. त्यात गोकर्णची मुळे टाका. १०–१५ मिनिटे मंद आचेवर उकळा. अर्धे पाणी राहिलं की गाळून घ्या. काढा थोडासा कोमट असताना सेवन करा.

हे दररोज सकाळी आणि संध्याकाळी घेतल्यास शरीरातील उष्णता नियंत्रणात राहते आणि वारंवार होणाऱ्या तापाची तीव्रता कमी होते.

**सूचना आणि काळजी:**

कोणत्याही आयुर्वेदिक उपायाची सुरूवात वैद्यकीय सल्ल्याने करावी.

गोकर्ण वनस्पती नैसर्गिक असूनही, प्रत्येकाची शारीरिक प्रकृती वेगळी असते. त्यामुळे काहींना त्रास होऊ शकतो.

गर्भवती महिलांनी, स्तनपान करणाऱ्या मातांनी किंवा गंभीर आजारांनी त्रस्त असलेल्या व्यक्तींनी गोकर्णचा काढा घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.सतत गोळ्या आणि औषधांवर अवलंबून राहण्यापेक्षा, आयुर्वेदात सांगितलेले सोपे आणि नैसर्गिक उपाय वापरणे शरीरासाठी अधिक लाभदायक ठरते. गोकर्णसारख्या औषधी वनस्पतींचा समावेश आपल्या दैनंदिन आरोग्यात केल्यास रोगप्रतिकारशक्ती सुधारते आणि वारंवार होणाऱ्या तापासारख्या समस्यांपासून आराम मिळू शकतो.

# ग्लोबल वॉर्मिंगनंतर हिमयुग

**सध्या जागतिक हवामानबदलाची चर्चा सुरू आहे, मात्र यानंतर हिमयुग अवतरण्याची शक्यता आहे. अलीकडेच कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या संशोधकांनी पृथ्वीच्या नैसर्गिक कार्बनचक्रातील एक मोठी त्रुटी शोधून काढली. ही त्रुटी पृथ्वीच्या तापमानात असामान्य बदल कसे होऊ शकतात आणि दीर्घकालीन जागतिक तापमानवाढीनंतर हिमयुगासारखे अत्यंत थंडीचे युग कसे येऊ शकते, हे स्पष्ट करण्यास मदत करते.**



पृथ्वीचे तापमान प्रामुख्याने खडकांच्या नैसर्गिक क्षरणामुळे नियंत्रित होते. या प्रक्रियेत पाऊस वातावरणातून कार्बन डायऑक्साइड शोषून घेतो. पावसामुळे तो खडकात मिसळतो. खडक हळूहळू विरघळतात आणि कार्बन आणि कॅल्शियमच्या रूपात समुद्रात पोहोचतात. समुद्रात हे कार्बन साठे एकत्र होऊन शंख, कोरल आणि चुनखडीचे खडक तयार होतात. त्यामुळे समुद्राच्या तळावरील कार्बन दीर्घकाळ स्थिर राहतो. शास्त्रज्ञांनी या कार्बनचक्राचा एक नवीन पैलू शोधला आहे. तो पृथ्वीला अत्यंत थंड वातावरणाकडे ढकलू शकतो. पृथ्वी गरम होताना खडकांची झीज वेगाने होते. त्यामुळे जास्त कार्बन डायऑक्साइड शोषले जाते आणि वातावरणातून ते बाहेर पडते. यामुळे पृथ्वी थंड होते. संशोधकांनी म्हटले आहे, की पृथ्वी गरम होताना खडक कार्बन जलद शोषून घेतात आणि पुन्हा थंड करतात. जुने भूगर्भीय पुरावे दर्शवतात, की पृथ्वीचे सुरुवातीचे हिमयुग इतके तीव्र होते की संपूर्ण ग्रह बर्फाने झाकलेले होते. संशोधकांना आढळून आले आहे, की समुद्रातला कार्बनसंचयदेखील या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतो.

वातावरणातील कार्बन डायऑक्साइड वाढत असताना आणि पृथ्वी गरम होत असताना फॉस्फरससारखे अधिक पोषक घटक समुद्रात जातात. हे पोषक घटक प्लॅक्टनच्या वाढीस चालना देतात. प्लॅक्टन सूर्यप्रकाशाच्या मदतीने कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. प्लॅक्टन मरतात, तेव्हा त्यांचे शरीर कार्बनसह समुद्राच्या तळाशी पडते आणि कार्बन कायमचा साठवला जातो; पण उष्ण, पोषकतत्त्वांनी समृद्ध महासागरांमध्ये ऑक्सिजनची पातळी कमी होते. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे समुद्राच्या तळाशी जमा होण्याऐवजी फॉस्फरसचा समुद्रात पुनर्वापर केला जातो. अधिक पोषक तत्त्वे, अधिक प्लॅक्टन, अधिक कार्बन संचय, अधिक थंड होणे ही प्रक्रिया हळूहळू संतुलित होण्याऐवजी पृथ्वीला अत्यंत थंड होण्यास कारणीभूत ठरू शकते. या प्रक्रियेचे स्पष्टीकरण देताना संशोधक सांगतात की, तुम्ही आपल्या घरात एअर कंडिशनर (एसी) चालू करून तापमान २५ अंश सेल्सिअसवर ठेवू इच्छिता. बाहेरील तापमान वाढल्यास एसी अधिक थंडी निर्माण करतो. काही प्रकरणांमध्ये ही थंडी जास्त असू शकते.

त्याचप्रमाणे पृथ्वीचा थर्मोस्टॅट कधी कधी जास्त थंडी निर्माण करतो. संशोधनात असेही आढळून आले आहे, की प्राचीन काळात वातावरणातील ऑक्सिजनची पातळी खूपच कमी होती. त्यामुळे हे थर्मोस्टॅट आणखी अनियमित आणि अस्थिर बनले. म्हणूनच मागील हिमयुग इतके तीव्र होते. आज उच्च ऑक्सिजन पातळी बदलाचा परिणाम कमकुवत करेल; परंतु तरीही पुढील हिमयुगाच्या प्रारंभास काही प्रमाणात विलंब होऊ शकतो. याचा अर्थ असा आहे का, की मानववंशीय जागतिक तापमानवाढीनंतर पृथ्वी पुढील हिमयुगात प्रवेश करू शकतात? याबाबत संशोधकांचे म्हणणे हो असे आहे; परंतु ते लवकर होणार नाही. त्यांचे मॉडेल असे सूचित करते, की जास्तीत जास्त थंडी असा परिणाम नक्कीच निर्माण करेल; परंतु सध्याचे हवामान संकट कमी करण्यासाठी हे पुरेसे नाही. संशोधन पत्रात म्हटले आहे, की पुढील हिमयुग पन्नास हजार वर्षांमध्ये सुरू होईल की दोन लाख वर्षांमध्ये हा खरा प्रश्न आहे. पृथ्वीचे नैसर्गिक थर्मोस्टॅट या आयुष्यात आपल्याला मदत करू शकत नाही.

या संशोधनातून स्पष्ट होते, की पृथ्वीवरील नैसर्गिक प्रक्रिया गुंतागुंतीच्या आहेत. जागतिक तापमानवाढीच्या सध्याच्या युगात आपल्या क्रियाकलापांवर आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवणे आपल्यासाठी अत्यावश्यक आहे. नैसर्गिक प्रणाली अखेरीस ग्रह थंड करतील; परंतु ही प्रक्रिया खूप मंद आहे आणि त्याचे परिणाम आपल्या आयुष्यात जाणवणार नाही. म्हणूनच सतत प्रयत्न आणि जागरूकता ही आजची सर्वात तातडीची गरज आहे.

शास्त्रज्ञांचा विश्वास आहे, की आपल्याला अजूनही आपल्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. हे खरे आहे, की उष्ण झालेली पृथ्वी पुन्हा कधी तरी थंड होईल; परंतु ती इतकी मंद असेल, की या पिढीला त्याचा काहीही उपयोग होणार नाही. म्हणून आपल्याला आजच कृती करण्याची गरज आहे, कार्बन उत्सर्जन कमी करणे, पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करणे आणि शाश्वत ऊर्जास्रोतांकडे वाटचाल करणे. जागतिक तापमानवाढ उलटवल्याने थेट हिमयुग सुरू होण्याची शक्यता नाही. त्याऐवजी, पृथ्वीचे नैसर्गिक चक्र आणि हरितगृह परिणाम पुढील हिमयुग सुरू होण्यास विलंब करू शकतात, जे पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये अपेक्षित आहे. काही सिद्धांत सूचित करतात, की जागतिक तापमानवाढ समुद्राच्या प्रवाहांना, विशेषतः गल्फ स्ट्रीमला विस्कळीत करून हिमयुग सुरू करू शकते. त्यामुळे युरोपमध्ये नाट्यमय थंडी पडते.

कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन ताबडतोब थांबले, तरी सध्याच्या जागतिक तापमानवाढीचे आणि महासागरातील बदलांचे परिणाम पुढील हजार वर्षांमध्ये अपरिवर्तनीय असतील. आपल्या आयुष्यात हिमयुग सुरू होणे अशक्य होईल. १९७० दशकाच्या सुरुवातीला सलग अनेक वर्षी थंडी जास्त होती, तेव्हा काही शास्त्रज्ञांनी तापमानातील घट ही पृथ्वी एका नवीन हिमयुगात प्रवेश करत असल्याचे लक्षण आहे, असा अर्थ लावला; परंतु त्या दशकाच्या अखेरीस भाकिते उलटली आणि तज्ज्ञ वाढत्या तापमानाबद्दल काळजी करू लागले. तेव्हापासून सरकारे आणि पर्यावरणीय गट वातावरणातील हरितगृह वायू आणि जागतिक तापमानवाढ कमी करण्यासाठी सार्वजनिक ऊर्जेच्या वापरात नियम आणि बदल करण्यासाठी दबाव आणत आहेत. आपण आपल्या ऊर्जावापराच्या सवयी बदलण्याचा प्रयत्न करताना काही शास्त्रज्ञ प्रश्न विचारत आहेत, की जागतिक तापमानवाढ खरोखरच काही उद्देश पूर्ण करत आहे का? ही वाढती उष्णता आपल्याला दुसऱ्या हिमयुगात प्रवेश करण्यापासून रोखत आहे का आणि आपण ही प्रक्रिया उलट केली, तर पुन्हा एकदा बर्फाने झाकले जाऊ का? अतिथंडी आणि उष्णता पृथ्वीच्या इतिहासात नवी नाही. एक अब्ज वर्षांपासून पृथ्वीने उष्णता आणि थंडीच्या कालावधीत तापमानात आलटून पालटून मंद चढ-उतार अनुभवले आहे. समुद्राचे प्रवाह, सूर्याभोवती पृथ्वीच्या कक्षेत बदल आणि वातावरणीय रचना यासह अनेक घटक याला जबाबदार आहेत. यापैकी काही कालखंड इतरांपेक्षा जास्त तीव्र होते.

हिमयुग नावाच्या तीव्र शीतलहरीही येऊन गेल्या आहेत. त्या दरम्यान विशाल हिमनद्यांनी पृथ्वीचा बराचसा भाग व्यापला होता. हिमयुगांदरम्यान पृथ्वी सामान्यतः सापेक्ष उष्णतेच्या काळात प्रवेश करते, त्याला आंतरहिमयुग म्हणतात, जे आपण गेल्या बारा हजार वर्षांपूर्वीच्या हिमयुगाच्या समाप्तीपासून अनुभवत आहोत. आता दिसते की आपण तापमानवाढीच्या ट्रेंडमध्ये आहोत. अनेक शास्त्रज्ञांच्या मते तो पृथ्वीच्या वातावरणात उष्णता अडकवणाऱ्या हरितगृह वायूंचा परिणाम आहे. एका विचारसरणीच्या मते तापमानवाढ करणारा ग्रह म्हणजे असा ग्रह, जो हिमयुगात संपण्याची शक्यता कमी असते. पृथ्वी नेहमीच उष्ण आणि थंड चक्रातून जात असते.

शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे, की पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये कधी तरी आपल्याला आणखी एका मोठ्या थंडीचा सामना करावा लागेल. असे झाले तर युरोप आणि उत्तर अमेरिकेसह जगाचा बराचसा भाग बर्फाच्या जाड चादरीने झाकला जाईल. काही संशोधकांच्या मते हरितगृह वायूच्या परिणामामुळे पृथ्वीच्या वातावरणात अडकलेली उष्णता या थंडीची भरपाई करेल. ती पृथ्वीला दुसऱ्या हिमयुगात प्रवेश करण्यापासून रोखेल. हिमयुग टाळणे ही चांगली बातमी वाटत असली तरी संशोधकांच्या इशाऱ्यानुसार जागतिक तापमानवाढ ही सोपी कामगिरी नाही. त्याचे पृथ्वीवर इतर गंभीर आणि अप्रिय परिणाम होऊ शकतात.

# ग्रंथ हेच गुरू

ग्रंथ कोंडून ठेवू नका, कपाटात सुरक्षित... जिथे ग्रंथ कोंडले जातात तिथे राष्ट्र कोंडले जाते, कपाटाच्या कबरीत गाडले जातात विचारांचे मुडदे. वाचनालय असते एक बाग न कोमेजणाऱ्या असंख्य फुलांनी बहरलेली...



अलीकडे वाचनाची आवड कमी होऊ लागली आहे असे अनेकजण म्हणतात, ते थोडेफार खरे असले तरी दूरदर्शनमुळे वाचण्याऐवजी ऐकण्यात आणि पाहण्यातच अनेकांचे मन गुरफटून जाते. असे असले तरी केवळ प्रेक्षक वा श्रोता होण्याने सर्वांच्या मनाची भूक भागत नाही. एकदा लहानपणी पुस्तकांशी मैत्री झाली की, ती संगत कधी सुटत नाही. जीवनातले अनुभव अधिक डोळसपणे देण्याची शक्ती पुस्तक आपल्याला देतात. आपलं व्यक्तिमत्त्व अधिक सुजाण संपन्न करतात. 'वाचनालयाविना शाळा म्हणजे शस्त्रागाराविना किल्ला होय' पूर्वीच्या काळी देशाभिमानाने प्रेरित होऊन समाज शिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली ही ग्रंथालये म्हणजे स्वातंत्र्यप्रेमाची व जागृतीची प्रतीकेच आहेत. 'पुस्तक वाचल्यावर मस्तक तयार होतं आणि मस्तक तयार झाल्यावर माणूस कुठेही नतमस्तक होत नाही,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. आज विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक तथा समाजातील सर्वच घटकांचे वाचन कमी होत आहे हे वास्तव आपल्याला नाकारता येणार नाही. वाचनाद्वारे व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनेक गोष्टी सहाय्यभूत ठरतात. हे जवळपास प्रत्येक यशस्वी क्षेत्रातील तज्ज्ञ तथा अनुभवी व्यक्तींचे मत आहे. आज विद्यार्थी वर्ग केवळ मिळेल त्या साधनांद्वारे फक्त माहिती गोळा करीत आहे. अभ्यासक्रमाशी पूरक असणाऱ्या उपयुक्त वाचनाकडे अनेकांचा कल आहे; परंतु मूळ कलाकृतीचा अभ्यास करण्याकडे, वाचन वाढवण्याकडे अनेकांचे दुर्लक्ष होत आहे. देशाला महासत्ता बनवण्याचे ज्यांनी प्रथम स्वप्न पाहिले ते आपले राष्ट्रपती भारतरत्न भारताचे मिसाईल मॅन डॉक्टर ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या राष्ट्रीय कार्याची दखल म्हणून त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिनाच्या रूपात आज सर्वत्र सर्व शाळांमध्ये साजरा करण्यात येतो; परंतु हा एक दिवसाचा कार्यक्रम न राहता त्यात सातत्य राहणे गरजेचे आहे.

'वाचाल तर वाचाल, ग्रंथ हेच गुरू, पुस्तक मस्तक घडवतात, प्रसंगी अखंडित वाचीत जावे अशी अनेक वाक्य कानावर येतात. पण कोण लक्षात घेतो? मोबाइल, इंटरनेटच्या जमान्यात वाचन दुर्लक्षित झाले का? अन् असेल तर तो खजिना आजच्या विद्यार्थ्यांना कसा उपलब्ध करून देता येईल. आज जे काही विद्यार्थ्यांकडून वाचले जाते ते केवळ पाठ्यपुस्तकांमधीलच. शिक्षक आपले अभ्यासक्रमामध्ये, तर विद्यार्थी त्यांच्या परीक्षेच्या अभ्यासात गुंग, कुणालाच दोष देता येणार नाही. पण जेवण जसे चौरस असावं तसं वाचन देखील चौफेर असावे. सार्वजनिक तसेच महापालिकेची वाचनालये आज ओस पडत असल्याचे दिसते.

ज्येष्ठ नागरिक सोडता तरुणांनी वाचनालयाकडे पाठ फिरवली आहे. हा सोशल मीडियाचा परिणाम आहे. काही ठिकाणी वाचक आहेत पण वाचनालयात दर्जेदार पुस्तके, साहित्य ग्रंथ, उपलब्ध नाहीत. बऱ्याच वेळा भरमसाट पुस्तके प्रसिद्ध होतात. त्यातील ठरावीक पुस्तकांची विक्री होते मग वाचन कमी झाले अशी ओरड सुरू होते. या ओरडण्याला तसा अर्थ नाही. हा निराशावादी दृष्टिकोन आहे. असे मला वाटते वाचनाचे अनेक पर्याय सध्या आपल्याकडे आलेले आहेत. पारंपरिक छापील पुस्तकांबरोबर आधुनिक अशा ई-बुक सारख्या पुस्तकांमुळे पुस्तकांचे विश्व अधिकच रुंदावले आहे. किंबहुना यामध्ये रोजच भर पडत आहे. आधुनिक साधनांमुळे कमी जागेत, कमी खर्चात जास्त संख्येने पुस्तकं साठवली जातात. आज ऑनलाईन पुस्तकांच्या माध्यमातून अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. विविध पुस्तकांवर भरपूर सूट, प्रदर्शन व ऑनलाइन विक्रीमध्ये मिळत असल्याने वाचक पुस्तक खरेदी करणे पसंत करत आहेत. सध्या वाचकांच्या घरी स्वतःची छोटी छोटी वाचनालये उदयास येत आहेत, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सध्या वाचन संस्कृतीने आपल्या पारंपरिक ढाचा बदलून नवा ढाचा तयार केला आहे. जोपर्यंत मानवाला ज्ञानलालसा आहे तोपर्यंत वाचन संस्कृती लयास जाणे कदापिही शक्य नाही. आताचे जग ऑनलाइन वाचनालयाचे आहे. विविध लेखकांचे ब्लॉग, विविध लेख, पेज, ई-पेपर याद्वारे लेखन वाचकांसाठी उपलब्ध होत आहे. विविध ऑनलाईन ॲप्स, पीडीएफ स्वरूपात उपलब्ध पुस्तके मोबाइलवर उपलब्ध आहेत. यामुळे वाचनालय आपल्या सदैव सोबती अशा परिस्थितीमुळे ग्रामीण व शहरी भागातील वाचनालये सुनी सुनी झाल्याचे आपल्याला पाहायला मिळते. दुसरीकडे मात्र आजही मुंबई-पुणे यांसारख्या शहरात लोकल ट्रेन, एसटी यामध्ये पुस्तके वाचणारी अनेक मंडळी आपल्याला निदर्शनास पडतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त एसटी बसमध्ये वाचनालयाची संकल्पना सध्या पाहायला मिळते. त्याशिवाय पुस्तकांचे गाव भिलार ही याची आदर्श उदाहरणे सांगण्यात येतील.

सध्याचे पालक आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालणे पसंत करतात. त्यामुळे मराठी विषयाची आवड नसल्याने मराठी वाचनालयाकडे त्यांनी पाठ फिरवली आहे. दुर्दैवाने आपली मराठी अन्य भाषेच्या तुलनेत काहीशी मागे पडत आहे. ती पुढे येणे गरजेचे आहे. आजच्या इंटरनेटच्या आभासी युगात वाचनासाठी उसंत थोडीफार कमी झाली आहे. मोबाइल, फेसबुक, व्हॉट्सॲप विविध मनोरंजनात्मक गेम्स, टीव्हीचे शेकडो चॅनल्स यामुळे मनोरंजनाची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. यातून साहित्याची गरज संपुष्टात येईल का? या प्रश्नाचे उत्तर देताना ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोतोपल्लींनी म्हटलंय... उद्या विज्ञान तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या गुंतागुंतीतून सुटकेच्या धडपडीसाठी उन्नत अर्थव्यवस्थेने कोंडलेल्या श्वासाला विरोध करण्यासाठी निर्मळ जगण्यास शेवटी माणसाला साहित्याच्या आश्रयाला यावे लागणार. दुसरा आश्रय कोणता असणार आहे. गुगलमुळे पडलेल्या प्रश्नांना क्षणात उत्तर शोधणे सोपे झाल्यामुळे चिकित्सा व चिकित्सकवृत्ती कमी झाली आहे. गेल्या काही वर्षांत रेडिओ, इंटरनेट, दूरचित्रवाणीचा विकास आणि वापर झपाट्याने वाढला पण वृत्तपत्रे आणि पुस्तकांना जगातून हद्दपार करण्यात माध्यमांना यश आलेले नाही, रेडिओद्वारे ऐकू येणारे शब्द व दूरचित्रवाणीवरील चित्रे यांचा मनावर तत्काळ परिणाम होतो पण तो वरवरचा असतो टिकाऊ नसतो. आजही कमी खर्चाचे व चटकन उपलब्ध होणारे ज्ञानाचे साधन म्हणजे पुस्तकेच आहेत.

पुस्तके वाचून मोठमोठ्या चळवळी उभ्या केलेल्या व्यक्ती वर्तमानकाळात सुद्धा आपल्यासमोर आहेत. साहित्य संमेलन, प्रबोधनवादी मेळावे यात पुस्तकांची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होतच असते व आजही अनेक पुस्तके जन्माला येत आहेत. त्यांचा वेग मंदावलेला नाही यावरून जरी वाचनालय सुनी सुनी झाली तरी वाचन कमी झालेले नाही हे लक्षात येते. आजच्या काळात 'वाचाल तर वाचाल' हे बाबासाहेबांचे शब्द सार्थ वाटतात व अनेक वेळा मार्गदर्शक ठरतात. सध्या प्राथमिक शिक्षण स्तरावर विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन, क्षमता विकसित करण्यासाठी अनेक प्रकारचे उपक्रम देखील शासनाने हाती घेतले आहेत. आपणही सर्वांनी एक पाऊल पुढे टाकत वाचन संस्कृती जोपासण्यासाठी नियमित वाचन करणे गरजेचे आहे.

# दिवाळी गोड व्हावी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या आठवड्यात एका कृषी संशोधन संस्थेच्या कार्यक्रमात बोलताना देशातील शेतकऱ्यांसाठी नवीन दोन योजनांची घोषणा केली. 'शेतकरी धनधान्य योजना' आणि 'कडधान्य आत्मनिर्भरता योजना' या दोन योजनांचे यावर्षी सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये सुद्धा सुतोवाच करण्यात आले होते. नेहमीप्रमाणे योग्य प्रसंग साधून मोदी यांनी या दोन योजनांची घोषणा केली. नेहमीप्रमाणे या योजनांसाठी मोठ्या प्रमाणात निधीचीही तरतूद करण्यात आली आहे. या दोन योजना मिळून तब्बल ३६००० कोटी रुपये वापरले जाणार आहेत, म्हणजे तशी घोषणा तरी करण्यात आली आहे.

पंतप्रधान या योजनांची घोषणा करत असतानाच महाराष्ट्रात गेल्याच आठवड्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी काही आर्थिक पॅकेज जाहीर करण्यात आले आणि या पॅकेजप्रमाणे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदत जमा व्हायला सुरुवातही झाली आहे. ती मदत योग्य आहे की तुटपुंजी आहे हा चर्चेचा विषय असला तरी किमान शेतकऱ्यांना दिलासा देण्यास सुरुवात झाली आहे हेसुद्धा कमी नाही. आणखी आठवड्याभरातच दीपोत्सवाला सुरुवात होणार असल्याने ही दिवाळी बळीराजासाठी काही प्रमाणात का होईना गोड होईल असे संकेत यानिमित्ताने मिळायला हरकत नाही.

अर्थात, नरेंद्र मोदी यांनी ज्या दोन योजना जाहीर केल्या आहेत त्यापैकी एका योजनेच्या नावामध्ये शेतकरी कृषी धनधान्य असे शब्द आहेत म्हणजेच धान्याच्या उत्पादनाच्या निमित्ताने शेतकऱ्याच्या पदरी धन पडावे आणि तो समृद्ध व्हावा अशी अपेक्षा या योजनेच्या नावातून समोर येऊ शकते. दुसऱ्या योजनेत डाळींच्या म्हणजेच कडधान्यांच्या उत्पादनामध्ये आत्मनिर्भरता हा विषय हाताळण्यात आला आहे. या योजनांच्या माध्यमातून देशातील काही जिल्ह्यांची निवड करून त्या ठिकाणी या योजनांची प्राधान्याने अंमलबजावणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजचा विचार करता प्रासंगिक पातळीवर निसर्गाने जो बळीराजाला त्रास दिला आहे त्यातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी ही आर्थिक मदत आहे.

तर नरेंद्र मोदी यांनी ज्या योजना घोषित केल्या आहेत त्यामध्ये चिरंतन पद्धतीने शेतकरी समृद्ध व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. पण सध्या बळीराजाची परिस्थिती खूपच लक्षणीय किंवा चांगली आहे असे म्हणता येत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा प्रथम सत्तेवर आले तेव्हा त्यांनी २०२२ पर्यंत देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट केले जाईल अशी घोषणा केली होती. त्यानंतर नरेंद्र मोदी यांच्या हाती तिसऱ्यांदा सत्ता दिल्यानंतरही अद्याप शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झालेले नाही हे मान्य करावे लागते. भारतीय शेती अद्यापही दुर्दैवाने बहुतांश प्रमाणात पावसावर अवलंबून असल्याने आणि जलसिंचनाच्या सोयी १००३ प्रमाणात उपलब्ध झाल्या नसल्याने कमी झालेला पाऊस किंवा जास्त झालेला पाऊससुद्धा बळीराजाचे संपूर्ण वेळापत्रक विसकटून टाकतो.

एवढेच नाही तर त्याचे आर्थिक नियोजनही बिघडवून टाकतो. महाराष्ट्रासारख्या मोठ्या आणि कृषिप्रधान राज्याप्रमाणे इतर काही राज्यांमध्ये सुद्धा पावसाने जो धुमाकूळ घातला त्यामुळे कृषी क्षेत्राचे वेळापत्रक आणि आर्थिक नियोजन पूर्णपणे बदलून जाणार आहे. तत्कालीन आर्थिक मदत योजनांची घोषणा करून मलमपट्टी केली जात असली तरी अशा प्रकारच्या दुष्काळी किंवा अवकाळी परिस्थितीमधून बळीराजाला सावरण्याचे कायमस्वरूपी बळ देण्याची गरज आहे.

नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या दोन ताज्या योजना असोत किंवा गेल्या अकरा वर्षांच्या कालावधीमध्ये जाहीर केलेल्या विविध योजना असोत त्या सर्वांचा एकत्रित परिणाम साधायचा असेल तर या सर्व योजना गंभीरपणे अमलात आणाव्या लागणार आहेत.

'आत्मनिर्भर भारत' या एका तत्त्वाच्या आधारे जर नरेंद्र मोदी सरकारचा कारभार सुरू असेल तर देशातील शेतकऱ्यालासुद्धा आत्मनिर्भर करण्याची जबाबदारी मोदी सरकारने पार पाडायला हवी. अद्यापही कृषिप्रधान भारत देश अनेक कृषी उत्पादने आयात करतो त्यासाठी मोठ्या प्रमाणावर परकीय निधी चलन वापरला जातो. हे जर कमी करायचे असेल तर देशाची गरज भागवणारे कृषी उत्पादन देशातच निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे.

सरकारने गेल्या ११ वर्षांच्या कालावधीमध्ये जाहीर केलेल्या सर्वच योजनांमध्ये आत्मनिर्भरता हा मध्यवर्ती मुद्दा असला तरी संपूर्णपणे परिणामकारक रित्या अमलात आलेला नाही हे वास्तवही स्वीकारावे लागते.

अर्थात, काही का असेना येत्या आठवड्यात सुरू होणारा दीपोत्सव असो किंवा त्यानंतरच्या कालावधीत येणारी प्रत्येक दिवाळी किंवा इतर सण उत्सव असोत, हा प्रत्येक उत्सवच देशातील बळीराजाला गोडी देणारा ठरेल अशा प्रकारचे गंभीर प्रयत्न केंद्रीय पातळीवर आणि महाराष्ट्र राज्य पातळीवरसुद्धा होणे गरजेचे आहे.



